# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०५/२०१०** **दिनांक २२.०५.२०१०**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ-दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक २२.०५.२०१० रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-७३३२-२०१०, दिनांक १८ मे, २०१० रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा रविवार शंदिनांक २२.०५.२०१० रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१.मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभग
०३. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४. मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०५. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
०६. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०७. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०८. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९. मा.डॉ.पी.एल.तिवारी

मा.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये व मा.जयश्री विष्णू थोरात यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा फॅक्स पत्राद्वारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **दि. १८.०४.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. ४४६** दिनांक १८.०४.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र. ३९८ मध्ये-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ०१ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३०,५८,४६६/- खर्चास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ०१ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ३०,५८,४६६/- खर्चास मान्यता देण्यात आली. **सदरहू निर्णयास मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी विरोध दर्शविला.** (कार्यवाही-स्वच्छता विभागप्रमुख)

**(०२) निर्णय क्र. ४०८ मध्ये-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट जि.सोलापूर यांना यात्रीनिवास बांधकांमासाठी आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट जि.सोलापूर यांना यात्रीनिवास बांधकांमासाठी **रक्कम रुपये १० लाख** आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**(०३) निर्णय क ४०९ मध्ये -**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना पूर्वीचेच अटी शर्ती व मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

**याएवेजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा. श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेकामी मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना पुढील सभेपूढे कक्षामार्फत चालू असलेल्या व कार्यवाही पूर्ण झालेल्या प्रकरणांचे सविस्तर माहितीसह समक्ष चर्चा करणेकामी बोलविण्यात यावे. व त्यानंतर श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेण्यात यावा असे ठरले (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**(०४) निर्णय क्र. ४१७-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि., हैद्राबाद यांना तसेच यापुर्वी मान्यता देण्यात आलेल्या साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना १० ते २० हजार चौ. फुटाचे प्लॉट सर्व्हे नं. १८६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावे, त्यासाठी त्यांना अलोक इंडस्ट्रीज, मुंबई व राजु वेगस्ना ट्रस्ट, हैद्राबाद यांना ज्या अटी शर्ती लागु करण्यात आलेल्या आहेत त्याच अटी शर्तीवर आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि.हैद्राबाद व साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना अटी शर्ती लागू करण्यात याव्यात, अशी आजचे सभेत मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि., हैद्राबाद यांना तसेच यापुर्वी मान्यता देण्यात आलेल्या साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना १० ते २० हजार चौ. फुटाचे प्लॉट सर्व्हे नं. १८६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावे, त्यासाठी त्यांना अलोक इंडस्ट्रीज, मुंबई व राजु वेगस्ना ट्रस्ट, हैद्राबाद यांना ज्या अटी शर्ती लागु करण्यात आलेल्या आहेत त्याच अटी शर्तीवर आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि.हैद्राबाद व साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना अटी शर्ती लागू करण्यात याव्यात, अशी आजचे सभेत मान्यता देण्यात आली. **सदरहू निर्णयास मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी विरोध दर्शविला.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) माहे एप्रिल २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(ब) माहे एप्रिल २०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे एप्रिल,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ८,२३,९२,००५/- देणगीचा तक्ता, तसेच माहे,२०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,७९,८९१/-चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ४४७नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एप्रिल, २०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे एप्रिल,२०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये २१,०९,६०४/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ४४७ नोंद घेण्यात आली.**

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल,२०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे एप्रिल,२०१० मध्ये रुपये ४६,१९,३३५/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ४४७नोंद घेण्यात आली.**

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे मार्च-एप्रिल, २०१० मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे मार्च- २०१० मध्ये आय.पी.डी. रुग्णांच्या उपचारापोटी रु. ३,५५,१५१/- व माहे एप्रिल,२०१० मध्ये रुपये ५८,०५२/- सवलत देण्यात आली. तसेच माहे मार्च- २०१० मध्ये ओ.पी.डी. रुग्णांच्या उपचारापोटी रु.६०,८२६/- व माहे एप्रिल- २०१० मध्ये रुपये ५६,८३९/- सवलत देण्यात आली. त्याच बरोबर माहे मार्च- २०१० मध्ये थॅलसेमिया आणि हिमोफेलिया यावर उपचारासाठी रुपये ५५,४५०/- व माहे एप्रिल- २०१० मध्ये रुपये ४९,७५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ४४७ नोंद घेण्यात आली.**

---

**०५. माहे माहे एप्रिल, २०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) माहे एप्रिल-२०१० संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४४,४७२ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ४४७ नोंद घेण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणाऱ्या अ आणि ब तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४४७ नोंद घेण्यात येऊन पैकी तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) संयुक्त घनकचरा प्रकल्पासाठी राहाता सर्व्हे.नं.३४१,३४८ येथील जागेत शेड व कॉन्क्रीट प्लॉटफॉर्म उभारणेकामी मे.महेंद्र आर टाटीया,श्रीरामपूर यांचे अंतिम बिल रक्कम रुपये ३४,१९,४७९/-.**

**(०२) संस्थान इमारतींना आतील बाजूने रंगकाम करणेकामी मे.ओमसाई एंटरप्राईजेस,पुणे यांचे अंतिम बील रक्कम रुपये २०,४२,००६/-** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ०३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०१०-११ या वर्षाकरीता वार्षिक औषधे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २०१०-२०११ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीकामी अंदाजे रु. २२,८६,८०,२२३/- चे खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेत वार्षिक औषधे खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात यावे तसेच वेबसाईटवर देखील निविदा टाकण्यात यावी, असे ठरले होते.

त्यानुसार उपरोक्त वार्षिक औषधे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस -मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई, लोकमत- औरंगाबाद, नवभारत- नागपुर तर सकाळ - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संस्थानच्या संकेत स्थळावर निविदा टाकण्यात आली होती. त्यानुसार दि.२५/०१/२०१० ते दि. १३/०२/२०१० अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५/०२/२०१० अखेर ठेवण्यात आलेली होती.तसेच एकुण २३५ कंपन्याना इकडील पत्र क्र.१४५८ दि.२३/०१/२०१० अन्वये जाहिरातीबद्दल अवगत करण्यात आले होते .

परंतू दि.०२.०२.२०१० रोजीच्या प्रशासनाकडून प्राप्त आदेशाप्रमाणे सदर निविदा प्रक्रिया स्थगित ठेवणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या होत्या. त्यानुसार सदरची निविदा प्रक्रिया वर्तमान पत्रात जाहिरात देऊन स्थगित ठेवण्यात आली होती. त्यानंतर दि.३०.०३.२०१० पुन्हा सदर निविदाची प्रक्रिया चालू करणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या होत्या. तेंव्हा पुन्हा ज्या वर्तमान पत्रात औषधे खरेदी करणेबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती त्याच वर्तमान पत्रात उपरोक्त जाहिरात संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार दि.०७/०४/२०१० ते दि. २२/०४/२०१० अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/०४/२०१० अखेर ठेवण्यात आलेली होती.

सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण १५६ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे-

| S. N. | Name of Tenderer | S.N. | Name of Tenderer |
|---|---|---|---|
| 1 | Ace Medical Technology, Aurangabad | 79 | Namoh Agencies,Ahmednagar |
| 2 | Advance Cardiologix, Mumbai (2 Envelop) | 80 | Navshakti Ayurvedalya Pvt Ltd., Bhusawal |
| 3 | Advance Technologies, Bhopal | 81 | New Medicon Pharm Lab.Pvt.Ltd., Secundrabad |
| 4 | Advance Vascular Technologies,Thane(W) | 82 | Nirmal Agencies, Ahmednagar |
| 5 | Affiance Medi Tech Pvt.Ltd, Nashik (2 Envelope) | 83 | Om Agencies, Aurangabad |
| 6 | Ajinkya Medical Agencies, Ahmednagar | 84 | Om Medical & General Store, Shrirampur (Received on 26.04.10)( 2 Envelope) |
| 7 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 85 | Om Health Care, Surat |
| 8 | Allwin Life Care, Mumbai | 86 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad |
| 9 | Almet Healthcare Pvt.Ltd.,Mumbai | 87 | Panacea Biomedicals, Pune |
| 10 | Ambica Drug House, Pune | 88 | Pankaj Pharma, Pune |
| 11 | Anand Enterprises, Pune | 89 | Pathak Ayurvedic Pharmacy, Nagpur |
| 12 | Anant Agencies,Kolhapur | 90 | Peral Trading Co., Mumbai |
| 13 | Austin Healthcare, Pune | 91 | Pharmacea Link, Pune |
| 14 | B.Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai | 92 | Pharmaco, Pune |
| 15 | B.L. Lifesciences Pvt.Ltd., New Delhi | 93 | Pharmaveda (I) Pvt.Ltd., Mumbai |
| 16 | Bard India Healthcare(P) Ltd, Mumbai | 94 | Pioneer Enterprises, Ahmednagar |
| 17 | Bharat Agencies, Rahuri | 95 | R.R. Diagnostics, Dhule |

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | Bharat Serum & Vaccinces Ltd., Mumbai | 96 | Radhe Enterprises, Mumbai |
| 19 | Bhawani Enterprises, Ahmedabad | 97 | Rajasthan Distributors, Malegaon |
| 20 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | 98 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai |
| 21 | Biomerieux India Pvt.Ltd., Mumbai | 99 | Ramco Pharma, Mumbai |
| 22 | Bioshields, Goa | 100 | Regency Life Sciences, Bangalore |
| 23 | Blue Neem Medical Devices Pvt. Ltd., Bangalore | 101 | Relysys Medical Devices Ltd., Ibrahimpatnam (M) R.R. Dist Hyderabad A.P. |
| 24 | Cachet Pharmaceuticals Pvt.Ltd., Mumbai | 102 | Renuka Surgical Systems, Aurangabad |
| 25 | Cadila Pharmaceuticals Ltd., Ahmedabad | 103 | Rishab Trading Co, Mumbai |
| 26 | Capro Labs Exports India Pvt.Ltd., Bangalore | 104 | RPG Life Sciences Limited, Mumbai |
| 27 | Cardiotech, Pune | 105 | S.S.Scientific Co, Dhule |
| 28 | Chetna Enterprises, Ahmednagar | 106 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat |
| 29 | Cosmos Enterprises, Mumbai | 107 | Sai Enterprises, Ahmednagar |
| 30 | Critical Care Systems, Pune | 108 | Sai Medical Systems, Jalgaon |
| 31 | Deva Distributor, Shrirampur | 109 | Sairaj Agencies Paramaceuticals Distributors, Kopargaon |
| 32 | Eccare Pharmaceuticals (P) Ltd., Chennai | 110 | Saitrons Medical Equipment, Loni, |
| 33 | Franco Indian Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | 111 | Sanjay Agencies, Ahmednagar.(2 Envelope) |
| 34 | Fujifilm India Private Limited, Mumbai | 112 | Bharat Surgical, Rahuri |
| 35 | G.G. Medicaid, Ahmednagar | 113 | Sanjivani Medical & Gen. Stores, Ahmednagar |
| 36 | Gagan Pharma, Mumbai | 114 | Sanket Distributors, Pune |
| 37 | Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai | 115 | Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai |
| 38 | Gandhi Enterprises, Ahmedngar | 116 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai |
| 39 | Goa Antibiotics & Pharmacuticals Ltd.,Goa | 117 | Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune |
| 40 | Guru Agencies, Ahmednagar | 118 | Shalaks Pharmaceuticals Pvt. Ltd., New Delhi |
| 41 | Gurukripa Agencies, Kopargaon | 119 | Shiddheshwar Medical & General Stores, Ahmednagar |
| 42 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | 120 | Shivam Trading Company, Mumbai |
| 43 | Harshvaibhav Chem Pharma Pvt.Ltd., Aurangabad | 121 | Shri Balaji Medical & Parmaceutical Distributor’s, Nashik |
| 44 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 122 | Shree Distributors, Aurangabad |
| 45 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | 123 | Shree Enterprises, Pune |
| 46 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | 124 | Shree Pacetronix Ltd., Pune |
| 47 | HLL Lifecare Ltd., Mumbai | 125 | Shree Pharma, Shrirampur |
| 48 | Human Touch Technologies, Pune | 126 | Shreeji Agency, Shrirampur |
| 49 | ICDDIS Pvt.Ltd.,Mumbai | 127 | Shreya Enterprises, Ahmednagar |
| 50 | Icon Meditech Pvt.Ltd.,Nagpur | 128 | Shriram Distributors, Pune |
| 51 | Imaging Products Ind. Ltd., Mumbai | 129 | Shushruta Medical Systems, Pune |
| 52 | Indu Pharma, Jejuri | 130 | Siddhi Medical Distributors, Aurangabad |
| 53 | Intas Pharmaceuticals, Ltd., Ahmedabad | 131 | Sino Care Surgical Pvt.Ltd, Mumbai |
| 54 | Inter Medics, Mumbai | 132 | Snehal Enterprises, Nagpur |
| 55 | Ives Drugs(India) Pvt. Ltd., Indore | 133 | Spandan Biotech, Aurangabad. |
| 56 | J.S.P.Surgical, Nashik | 134 | Spandan Medical System, Pune |
| 57 | Jae Pharmacy Pvt.Ltd.,Mumbai | 135 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai |
| 58 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | 136 | Sunbeam Glass Works, Mumbai |
| 59 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Asp Division) | 137 | Surya Surgi Pharma, Nashik |
| 60 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | 138 | Sushrut Natural Health Care Pvt.Ltd., Ahmednagar |
| 61 | Kabra Medicals, Jalgaon | 139 | Svizera Health Care, Mumbai |
| 62 | Kaivalyam Surgicals, Shrirampur | 140 | Swar Enterprises, Pune |
| 63 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 141 | Tirupati Enterprises, Pune |
| 64 | Kapil Medicals, Jalgaon | 142 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai |
| 65 | Karnataka Antibiotics & Pharmaceuticals Ltd., Mumbai | 143 | Trimurti Agencies, Nashik |
| 66 | Karwa Agencies, Sangamner | 144 | Trimurti Enterprises, Sillod |
| 67 | Kaustubh Enterprises, Mumbai | 145 | TTK Healthcare Limited, Mumbai |
| 68 | Keps Pharma, Mumbai | 146 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai |
| 69 | Life Care Medical Systems, Pune | 147 | Unimark Remedies Ltd., Mumbai |
| 70 | M.K.Enterprise, Ahmedabad | 148 | Universal Chemicals, Nashik |
| 71 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 149 | Universal Traders, Pune |
| 72 | Maureen Surgical Company, Aurangabad | 150 | Vascular Concepts Ltd., Mumbai |
| 73 | Mediplus Surgicals, Pune | 151 | Vascular Solution(India) Pvt.Ltd.,Mumbai |
| 74 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai | 152 | Vijay Latex Products Pvt.Ltd., Mumbai |
| 75 | Milan Enterprises, Ahmednagar | 153 | Vikrant Medical & General Store, Pune |
| 76 | MRK Healthcare, Mumbai (2 Envelope) | 154 | Vishal Agencies, Ahmednagar. |
| 77 | Munot Medical Agencies, Manmad. | 155 | Yoga Enterprises, Pune |
| 78 | N.P. Agencies, Mumbai | 156 | Zenith Surgical Co., Mumbai |

वरीलपैकी अ.नं.८४ मे.ओम मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, श्रीरामपुर यांची निविदा दि.२६.०४.२०१० रोजी उशीरा प्राप्त झालेली आहे. ती देखील विचारात घ्यावी असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या १५६ सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४४८ उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा उघडणेकामी उपसमितीची सभा आयोजित करण्यात येऊन या सभेत सदरहू निविदा उघडून निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ०४ श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नवीन लिक्वीड ऑक्सीजन गॅस प्लँट बसविणेकामी प्राप्त निविदा उघडणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात वेगवेगळ्या सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टिम असून सदर सिस्टिमचा ऑक्सीजन व नायट्रस गॅस हा सर्व वार्ड / विभागामध्ये रुग्णांच्या आवश्यकतेनुसार ऑक्सीजन व नायट्रस गॅस वापरण्यात येत आहे. सदरचे दोन्ही सिस्टिम करता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदी हि मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१४(१४) अन्वये निम्नतम दराने मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांच्याकडून ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदी करण्यात येत होता. परंतु लिक्विड ऑक्सीजन गॅस प्लँट बसविल्यास आपणास स्वस्त दरात ऑक्सीजन गॅस उपलब्ध होऊ शकेल. सध्या आपणाकडे असा प्लँट नाही तो नव्यानेच बसवून कार्यान्वित करावयाचा आहे. त्यासाठी अंदाजे रु.२०,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९ अन्वये श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लिक्वीड गॅस प्लँट खरेदी करणेकामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदर खरेदीकामी जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात सकाळ - पुणे, इंडियन एक्सप्रेस - मुंबई, लोकमत - नागपुर या वर्तमान पत्रात देण्यात येऊन तसेच ०३ उत्पादक नामांकित कंपन्यांना वर्तमान पत्रातील जाहिरातीबाबत इकडील पत्र क्रमांक ४८३५ दि.१७/०३/२०१० अन्वये पत्र पाठवुन अवगत करण्यात आले होते. त्यानुसार संस्थानचे मुंबई व शिर्डी कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. निविदा विक्री ही दि.२२/०३/२०१० ते ०३/०४/२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०५/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकुण ४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

1. M/s. Nikhil Medico Gases, Nashik (प्राप्त दि.०६/०४/२०१०)
2. M/s. BOC India Ltd., Mumbai (प्राप्त दि.१०/०४/२०१०)
3. M/s.Inox Air Products Ltd., Mumbai (प्राप्त दि.१०/०४/२०१०)
4. M/s. Praxair India Pvt.Ltd., Mumbai (प्राप्त दि.०५/०४/२०१०)

तरी उपरोक्त ०४ सिलबंद निविदा समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४४९ श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नवीन लिक्वीड ऑक्सीजन गॅस प्लँट बसविणेकामी प्राप्त झालेल्या चार सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ०५ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी मशिनरी/उपकरणे/फर्निचर खरेदीकामी तांत्रिक निविदा उघडणे बाबत**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व श्री साईनाथ रुग्णलयातील ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु., जनरल आय.सी.यु. इ. तातडीने कार्यान्वित करणेकामी स्थानिक विश्वस्त समितीस व वैद्यकिय संचालक यांना सदरचे ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारे मशिनरी/उपकरणे/ फर्निचर /इन्स्ट्रुमेंट /किरकोळ साहित्य इ. सर्व प्रकारचे खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

त्यानुसार तिनही ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारी आवश्यक मशिनरी/उपकरणे/ फर्निचर/ इन्स्ट्रुमेंट /किरकोळ साहित्य इ. ची यादी तयार करण्यात आली असून त्यासाठी अंदाजे खर्च रु.३,००,७२,५००/- (अक्षरी रु. तीन कोटी बहात्तर हजार पाचशे मात्र) चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देण्याचा प्रस्ताव दि.११/०३/२०१० चे स्थानिक विश्वस्त समितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवून घेण्याची उपसमितीने शिफारस केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस -पुणे व महाराष्ट्र टाईम्स ,पुणे या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर सदरची जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत ही दि.०५/०४/२०१० ते १५/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१७/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकुण ८३ उत्पादक / पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र.५५३० दि.०५.०४.२०१० अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालय मिळून एकोनचाळीस (३९) निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Excel Corporation , Nashik | 16.04.2010 |
| 2 | M/s.PSN Instrumentation Pvt.Ltd.,Delhi | 16.04.2010 |
| 3 | M/s.Zenith Surgical Co.,Mumbai | 17.04.2010 |
| 4 | M/s.Qualisurge Surgical Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 5 | M/s.Sai Enterprises,Shrirampur | 17.04.2010 |
| 6 | M/s.Tejas Electronics,Ahmednagar | 17.04.2010 |
| 7 | M/s.Hansaraj Nayyar Medical India,Mumbai | 17.04.2010 |
| 8 | M/s.Seva Medical Equipment Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 9 | M/s.Summit Healthcare (P) Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 10 | M/s.Inter Medics,Mumbai | 16.04.2010 |
| 11 | M/s.Critical Care Systems,Pune | 17.04.2010 |
| 12 | M/s. M.Shah And Company,Pune | 16.04.2010 |
| 13 | M/s.Kanchan Drugs Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 14 | M/s.Saitrons Medical Equipments,Loni | 17.04.2010 |
| 15 | M/s.Gandhi Enterprises,Ahmednager | 17.04.2010 |
| 16 | M/s.Rescare Medisys (I) Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 17 | M/s.Pulmocare Consultants, New Delhi | 17.04.2010 |
| 18 | M/s.Pest Control (I) Pvt.Ltd., Pune | 17.04.2010 |
| 19 | M/s.B.Braun Medical (I) Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 20 | M/s.Janak Healthcare Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 21 | M/s.Karl Storz Endoscopy India Pvt.Ltd.,New Delhi | 17.04.2010 |
| 22 | M/s.Esbee Dynamed Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 23 | M/s. Concept Integrations (I) Pvt.Ltd., Pune | 17.04.2010 |
| 24 | M/s.Vitek Medisystems,Mumbai | 17.04.2010 |
| 25 | M/s.Cyronics Instruments Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 26 | M/s.Kalelkar Surgical Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 27 | M/s.Emergent Medi-Tech (I)Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 28 | M/s.Emco Meditek Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 29 | M/s.Marix Pvt.Ltd.,Thane | 17.04.2010 |
| 30 | M/s.Regency Life Sciences,Bangalore | 17.04.2010 |
| 31 | M/s.Maquet Medical India Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 32 | M/s.Steranco Health Care Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 33 | M/s.B.L.Lifesciences Pvt.Ltd., New Delhi | 17.04.2010 |
| 34 | M/s.Emergent Medi-Tech (I)Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 35 | M/s.Biomedicon Services (I) Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 36 | M/s.Biomedicon Services (I) Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 37 | M/s.Jalaram Steel Furniture Pvt.ltd, Surat | 17.04.2010 |
| 38 | M/s.Imperial Surgical Company,Mumbai | 17.04.2010 |
| 39 | M/s.Unitek Power Solutions (I) Ltd.,Mumbai | 17.04.2010 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या एकोनचाळीस (३९) तांत्रिक निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४५० श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी मशिनरी/उपकरणे/फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकोनचाळीस (३९) तांत्रिक निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांच्या तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ०६ श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन ई.एन.टी व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यू करीता मशिनरी/उपकरणे/फर्निचर /इन्स्ट्रुमेंट/किरकोळ साहित्य खरेदीकामी तांत्रिक निविदा उघडणे बाबत**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व श्री साईनाथ रुग्णलयातील ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु., जनरल आय.सी.यु. इ. तातडीने कार्यान्वित करणेकामी स्थानिक विश्वस्त समितीस व वैद्यकिय संचालक यांना सदरचे ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारे मशिनरी/उपकरणे/ फर्निचर /इन्स्ट्रुमेंट /किरकोळ साहित्य इ. सर्व प्रकारचे खरेदीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

त्यानुसार तिनही ओ. टी. व आय.सी.यु. साठी लागणारी आवश्यक मशिनरी/उपकरणे/ फर्निचर /इन्स्ट्रुमेंट /किरकोळ साहित्य इ. ची यादी तयार करण्यात आली असून त्यासाठी अंदाजे खर्च रु.५८,३०,०००/-( अक्षरी रु. अठ्ठावन्न लाख तीस हजार मात्र) चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात

देण्याचा प्रस्ताव दि.११/०३/२०१० चे स्थानिक विश्वस्त समितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवून घेण्याची उपसमितीने शिफारस केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस -पुणे व महाराष्ट्र टाईम्स ,पुणे या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर सदरची जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत ही दि.०५/०४/२०१० ते १५/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१७/०४/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकुण ८३ उत्पादक / पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र.५५३० दि.०५.०४.२०१० अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेबाबत पत्र पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालय मिळून तेवीस (२३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Excel Corporation , Nashik | 16.04.2010 |
| 2 | M/s.PSN Instrumentation Pvt.Ltd.,Delhi | 16.04.2010 |
| 3 | M/s.Qualisurge Surgical Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 4 | M/s.Gandhi Enterprises,Ahmednager | 17.04.2010 |
| 5 | M/s.Allwin Lifecare,Mumbai | 17.04.2010 |
| 6 | M/s. Saitrons Medical Equipments,Loni | 17.04.2010 |
| 7 | M/s.Esbbe Dynamed Pvt.Ltd, Mumbai | 17.04.2010 |
| 8 | M/s.Summit Healthcare (P) Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 9 | M/s.Jalaram Furniture Pvt.Ltd., Surat | 17.04.2010 |
| 10 | M/s.Cyronics Instruments Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 11 | M/s. M.Shah And Company,Pune | 16.04.2010 |
| 12 | M/s.Janak Healthcare Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 13 | M/s.A.G.Joshi & Co.,Pune | 17.04.2010 |
| 14 | M/s.Biomedicon Services (I) Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 15 | M/s.Sai Enterprises,Shrirampur | 17.04.2010 |
| 16 | M/.Concept Integrations (I) Pvt.Ltd.,Pune | 17.04.2010 |
| 17 | M/s.Life Care Medical Systems,Mumbai | 17.04.2010 |
| 18 | M/s.Life Care Medical Systems,Mumbai | 17.04.2010 |
| 19 | M/s.Life Care Medical Systems,Mumbai | 17.04.2010 |
| 20 | M/s.Emco Meditek Pvt.Ltd., Mumbai | 17.04.2010 |
| 21 | M/s.Kalelkar Surgical Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 22 | M/s.Emergent Medi-Tech (I)Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |
| 23 | M/s.Emergent Medi-Tech (I)Pvt.Ltd.,Mumbai | 17.04.2010 |

तरी प्राप्त झालेल्या तेवीस (२३) तांत्रिक निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४५१ श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन ई.एन.टी व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यू करीता मशिनरी/उपकरणे/फर्निचर /इन्स्ट्रूमेंट/किरकोळ साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या तेवीस (२३) तांत्रिक निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांच्या तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ०७ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅन्टीन भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा हॉस्पिटल कॅन्टीन भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी श्री सुनिल त्रिपाठी, सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर यांना दि. १८/०४/२००९ ते दि. १७/०४/२०१० या १२ महिन्याच्या कालावधीकरीता मासिक भाडे रक्कम रू. ४६०००/- प्रतिमाह याप्रमाणे देणेत आले होते. सदरचे कॅन्टीन चालकाची मुदत दि. १७/०४/२०१० संपुष्ठात आलेली आहे. त्यामुळे श्री साईबाबा रूग्णालयात भाडे तत्वावर १२ महिने कालावधीकरीता कॅन्टीन चालविणेस देणेकामी दि. २५/०३/२०१० रोजी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. सदर जाहीरातीस अनुसरून ०२ निविदा पुढीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत. १) पाकीटावर नाव नसलेली निविदा २) श्री श्रीकांत शांताराम जगताप, शिर्डी.

परंतु आलेल्या निविदा नियमानुसार उघडणेकामी कमीतकमी ०३ निविदा तरी आवश्यक असतात. यामुळे नव्याने कॅन्टीन चालकाची नेमणुक करणेकामी फेरनिविदा मागविणेचे ठरले व नव्याने कॅन्टीनचालकाची नेमणुक होईपर्यंत सध्याचे कॅन्टीनचालक श्री सुनिल त्रिपाठी यांना त्यांचे पुर्वीचेचे करारनाम्याचे अटीशर्तीचे अनुसरून आहे त्याच मासिक परवाना शुल्क आकारून परवानगी देणेत आलेली आहे.

फेरनिविदा मागविणेकामी दि. ०३/०५/२०१० रोजी लोकमत या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आली असुन दि. ०३/०५/२०१० ते दि. १५/०५/२०१० अखेर निविदा रू. १००/- मात्र शुल्क

आकारून विक्रीसाठी ठेवणेत आलेल्या होत्या. सदर कालावधीत विक्री झालेल्या निविदा भरून दि. १९/०५/२०१० रोजी संध्या ०५.०० वाजेपर्यंत स्विकारल्या आहे.

उपरोक्तकामी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| १ | श्रीकांत शांताराम जगताप, शिर्डी |
| २ | येवले प्रदीप रमेश, शिर्डी |
| ३ | सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर |
| ४ | सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| १ | श्रीकांत शांताराम जगताप, शिर्डी | ५१,०००/- | अनुपस्थित |
| २ | येवले प्रदीप रमेश, शिर्डी | १५,०००/- | १८,०००/- |
| ३ | सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अ.नगर | २१,०००/- | २५,०००/- |
| ४ | सदगुरू हरिहर महाराज सहकारी संस्था, अ.नगर | २१,०००/- | |

**निर्णय क्र.४५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईकांकरीता जेवण, नाष्टा, चहा, कॉफी इत्यादी ची व्यवस्था व्हावी याकरीता कॅन्टीन सुरु करण्यात आलेली आहे. सदर कॅन्टीनचा भाडेव्दारे नफा कमविणे हा उद्देश नसून रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना चांगल्या दर्जाचे जेवणाची व नाष्ट्याची व्यवस्था व्हावी हा हेतू आहे. सदगुरु हरिहर महाराज सहकारी संस्था, अहमदनगर यांचे दर उच्चतम आहे परंतू त्यांना यापूर्वी कॅन्टीन चालविणेस दिली असता त्यांचा अनुभव व दर्जा योग्य नसल्याचे वैद्यकीय संचालक यांनी समक्ष सांगितले. हे विचारात घेऊन रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना योग्य प्रकारे चहा, नाष्टा, जेवन इ.ची व्यवस्था होणेचे दृष्टीने येवले प्रदीप रमेश, शिर्डी यांची व्दितीय निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०८** **स.नं. ४/२१ मधील (केशव मंदिर) मोकळ्या जागेस संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उधडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव -** साईनाथ मंगल कार्यालयाचे पश्चिमेकडून जाणाऱ्या शिर्डी- रुई रस्त्यालगत असणाऱ्या (केशव मंदिराजवळील) सर्व्हे नं. ४/२१ मध्ये ४०० चौरस मीटर जागा असून, सदरहू जागेचे कडेने ९८.०० मी. लांबीचे कम्पाउंड भिंतीसाठी आर. सी. सी. पाइल्स व बीम घेऊन जमिन लेव्हलचे वर अंदाजे १.८ मीटर पर्यंतचे वीट बांधकाम करुन एम. एस. गेट बसविणेकामी येणारे अंदाजे रुपये ४,९८,६७८.०० मात्रचे अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन उप समितीचे दि. २५.०२.२०१० रोजीचे सभेत मान्यता देणेत आली आहे. त्यानूसार अशा प्रकारचे बांधकाम करणारे खालील ठेकेदार यांचेकडून इकडील जा. नं. ५८७५/२०१० दि. १४.०४.२०१० रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविणेत आले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | R.L.Bhutada, Kopargaon, | 06. | Mahendra Tatiya, A/p: Shrirampur, |
| 02. | Shree Associates, Nashik | 07. | Milind S. Pachorkar, A/P Kakasaheb nagar,Tal: Niphad, |
| 03. | Nitin Dandwate, Sakuri | 08. | Sagar Construction, Nashik. |
| 04. | Er. Yogesh Suresh Patil,Koparg | 09. | M/s. Krushana Buildcon, Sangamner, |
| 05. | Gunjegaonkar Santosh Nagnath At. post. Nighoj. | 10. | P. B. Jadhav, Sangamner |

उपरोक्त ठेकेदारानां दि. १२.०४.२०१० ते दि. १७.०४.२०१० अखेर पर्यंत कोरे कोटेशन फॉर्म घेऊन दि. १९.०४.२०१० रोजी सादर करणेबाबत कळविणेत आले होते. त्यानूसार विहीत मुदतीत खालील तिन ठेकेदारांनी कोरे कोटेशन फॉर्म घेऊन सिलबंद कोटेशन / निवीदा सादर केल्या आहेत.

| | |
|---|---|
| 01. | Gunjegaonkar Santosh Nagnath |
| 02. | Mahendra Tatiya, A/p: Shrirampur, |
| 03. | Milind S. Pachorkar, A/P Kakasaheb nagar, |

तरी वरिल प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद दरपत्रकापैकी अ. नं. ०३ चे ठेकेदार मिलींद एस. पाचोरकर, काकासाहेब नगर, ता. निफाड यांनी दि. १७.०४.२०१० रोजी विषयांकीत कामासाठीचे दरपत्रकाचे लिफाफामध्ये संस्थानचे डाटा सेंटरचे दरपत्रक सादर केले होते. व डाटा सेंटरचे लिफाफ्यामध्ये विषयांकीत कामाचे दरपत्रक सादर केले होते. सदरचे दोन्ही दरपत्रक दिनांक १८.०४.२०१० रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत आले आहे. करीता विषयांकीत कामाचे उघडणेत आलेले दरपत्रक विचारात घेण्यात येऊन व उर्वरीत ०२ सिलबंद कोटेशन्स आजचे सभेत

उघडणेत आले. या कोटेशन्स सादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/ वाटाघाटी करीता बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्स सादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| १ | Gunjegaonkar Santosh Nagnath | २०% अधिक | १७% अधिक |
| २ | Mahendra Tatiya, Shrirampur, | ६.३०% अधिक | २% अधिक |
| ३ | Milind S. Pachorkar, Kakasaheb nagar, | २०% अधिक | अनुपस्थित |

**निर्णय क्र. ४५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, Mahendra Tatiya, Shrirampur यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९ मनोजकुमार गोस्वामी पथावरील स्ट्रीट लाईटचे दुरुस्तीचे काम करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव -** मनोजकुमार गोस्वामी पथावरील स्ट्रीट लाईटचे दुरुस्तीचे काम कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. २,५३,५९१.८० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१०-०१-२०१० चे सभेतील विषय क्र.२९ निर्णय क्र.२९ अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती.त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत.कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पार्टीचे नांव | आ.क्र. व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ११२४७ / २७-०४-२०१० | ०१ कोटेशन बंद पाकीट.<br>सोबत ईएमडी बंद पाकीट |
| ०२) | मे.तूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १२७७५ / ०८-०५-२०१० | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०३) | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक | १२७७७ / ०८-०५-२०१० | ०१ कोटेशन बंद पाकीट |

उपरोक्तप्रमाणे मनोजकुमार गोस्वामी पथावरील स्ट्रीट लाईटचे दुरुस्तीचे काम करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटी साठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्स सादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ९% कमी | ११% कमी |
| २ | मे.तूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | २८% अधिक | २६% अधिक |
| ३ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक | ७.५% अधिक | २.५% अधिक |

**निर्णय क्र.४५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं. १० श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ऑपरेशन थिएटर व आय.सी.सी.यू विभागामध्ये कराव्या लागणाऱ्या वायरिंगचे काम करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईनाथ हॉस्पीटलकडील ऑपरेशन थिएटर व I.C.C.U. विभागामाध्ये कराव्या लागणा-या वायरींगचे काम कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ४,८८,९४०.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०३-०४-२०१० चे उपसमितीचे सभेत मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पार्टीचे नांव | आ.क्र. व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ११२४८ / २७-०४-२०१० | ०१ कोटेशन बंद पाकीट.<br>सोबत ईएमडी बंद पाकीट |
| ०२) | मे.तूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १२७७४/ ०८-०५-२०१० | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०३) | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक | १२७७६ / ०८-०५-२०१० | ०१ कोटेशन बंद पाकीट |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलकडील ऑपरेशन थिएटर व I.C.C.U. विभागामाध्ये कराव्या लागणा-या वायरींगचे काम करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटी साठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्स सादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १०% कमी | १२% कमी |
| २ | मे.तूर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | २५% अधिक | २३% अधिक |
| ३ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक | १०% अधिक | ५% अधिक |

**निर्णय क्र.४५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन विभागासाठी १६० केव्हीए क्षमतेचे युपीएस खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीकरुन निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा रुग्णालयातातील सी.टी.स्कॅन मशिनचा DMS खराब होऊन नये म्हणून एक १६० के.व्ही.ए. क्षमतेचा यु.पी.एस.ची तातडीने आवश्यकता आहे. सदर यु.पी.एस. ची अंदाजे किंमत रु.२०,००,०००/- असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन खरेदीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० चे सभेत मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात एकुण ०३ तर मुंबई कार्यालयात ११ निविदा विक्री झालेल्या असून वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून १८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदर सिलबंद निविदा ह्या दि.०३/०४/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. सदर तुलनात्मक तक्ता संस्थानचे विद्युत विभाग व रुग्णालयाचे सिनि. बायोमेडीकल इंजिनिअर यांना दाखवून घेण्यात आलेला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यातील तांत्रिक बाबींचा आभ्यास केल्यानंतर त्यांनी आपला खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

**विद्युत विभाग -** रुग्णालयाना पुरवठा केलेले व जवळचे सर्व्हिस सेंटर असलेले UPS पुरवठाधारक असल्यास सोयीचे ठरेल. Tubluar बॅटऱ्यांएवजी Maintenace Free Dry Battery असणे गरजेचे आहे.

**बायोमेडीकल विभाग -** ज्या कंपन्यांनी हॉस्पिटल करीता UPS (High Power KVA)चा पुरवठा केलेला आहे. त्यांचेकडून श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता (सि.टी. स्कॅन मशिनकरीता) SMF Batteries सह UPS घेणेसाठी विचार व्हावा असे मत आहे. त्यास अनूसरुन ज्या निविदाधारकांनी रुग्णालयांना १०० KVA पेक्षा जास्त क्षमता असलेल्या UPS चा पुरवठा केलेला आहे अशा खालील १० निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी बोलविण्यात आले होते

01. Bhawani Digital, Mumbai
02. Consul Conslidated, Mumbai
03. Dubas Engi., Mumbai
04. ower Electronics, Pune
05. Delta Power Solution, Mumbai
06. Gurukrupa Enterprisases, Thane
07. Numeric Power, Mumbai
08. PCI Ltd., Delhi
09. Socomec UPS, Pune
10. Vintech Elect. Sys. Pune

आजचे सभेपुढे वरील सर्व १० (दहा) निविदाधारक उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या सूटीनुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Tenderer | Make | Model | Warranty | AMC | CMC | Rate Per in Rs. Incl. All Taxes (SMF Battery) | Rate After Negotiation Dt.22/05/2010 | Rate Per in Rs. Incl. All Taxes (Tubular Battery) | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Gurukrupa Enterprisases, Thane** | Best Power Equip., Delhi | ep16000 | 1 Year | 6% of UPS cost. | | 1196685.00 Battries Okaya Co. | 1112917.00 | 1196685.00 Battries Okaya Co. | N.Q. |
| 2 | **Consul Conslidated, Mumbai** | Consul | Megaline AS Series | 1 Year | | The CMC charges for UPS after warranty is Rs.1,00,000.00 + Service Tax. | 1243001.00 | 1135000.00 | | |
| 3 | **Socomec UPS,** | Socomec | Delphys MP Elite | 2 Year | 8% per annum | 8% per annum (fixed) after 2 | 1409200.00 batteries1 | 1340000.00 | 1581840.00 batteries 3 | 1560000.00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Pune** | | | | | year warranty period for next 5 year(Service Tax Extra) | Year Warranty | | years warranty. | |
| 4 | **Numeric Power, Mumbai** | Numeric | HPE i 33 | 12 Month | Rs.69 489/- | Rs.69489/- | 1469526.00 | 1280000.00 | | |
| 5 | **Bhawani Digital, Mumbai** | Socomec | Delphys MP | 1 Year | | Rs.95000.00 per year exculdig the cost of new battery. There after 10% increase in the cost from the cost of 1st year. Service tax will be extra if & as applicable at the time of invoice. | 1515280.00 | N.Q. | 1430000.00 | N.Q. |
| 6 | **Delta Power Solution, Mumbai** | Delta | NT 160 | 1 Year | | | 1598705.75 | 1548705.75 | | |
| 7 | **Dubas Engi., Mumbai** | Dubas | GX-11331 60 | 1 Year | | Rs.80,000.00 per year. In CAMC only UPS System is covered and we do battery checking. Incase we find any fault in the batteries, the same will be reported to the end user and replacement shall be at end user account. | 1602297.00 | 1462888.00 | | |
| 8 | **PCI Ltd., Delhi** | | Aros Sentry MPS | 12 Month | | CMC Cost of Rs.110000/- after warranty Period. | 1769780.00 | 1200000.00 | | |
| 9 | **DB Power Electronics, Pune** | DB Ele. | Harmony S+ 3300 | 2 Year Battery 1 Year | | 10% | 1915690.00 | 1149000.00 | | |
| 10 | **Vintech Elect. Sys. Pune** | Emerson Libert | | 1 Year | | | 1936048.55 | 1619179.00 | | |

**निर्णय क्र. ४५६** **यावर चर्चा होऊन मे. सोकोमेक युपीएस, पुणे यांनी सर्वात जास्त हॉस्पिटलमध्ये १०० KVA पेक्षा जास्त क्षमता असलेल्या UPS चा पुरवठा केलेला आहे त्यांचा अनुभव समाधानकारक आहे. तसेच मे. सोकोमेक युपीएस, पुणे यांनी श्री साईबाबा रुग्णालयात देखील एमआरआय मशिन करीता युपीएस चा पुरवठा केलेला आहे त्यामुळे यांचेकडून रु.१३,४०,०००/- (सर्व करांसह) व २ वर्ष वॉरंटी कालावधी संपल्यानंतर ५ वर्षाच्या कालावधीसाठी CMC चार्जेस ८% मुळ किंमतीवर + Service Tax Extra इतक्या रक्कमेत SMF बॅटरेजचा युपीएस घेण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

## दि.२२.०५.२०१० चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-

**विषय नं. १२** **मौजे सवंत्सर ता.कोपरगांव येथे भक्तनिवास (पालखी थांबा ) उभारणे बाबत**

**प्रस्ताव -** **(अ)** सरपंच व ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत संवत्सर, तालुका कोपरगांव यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या व मा.अध्यक्ष व इतर मान्यवरांना अग्रेषित केलेल्या जा. क्र. १३७/२०१० दिनांक ०५ मार्च, २०१० रोजीचे विनंती पत्रानुसार, दिनांक ०५ मार्च, २०१० रोजीचे मौजे संवत्सर येथे झालेल्या ग्रामसभेतील मागणीबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे :

मौजे संवत्सर हे गाव नागपुर - औरंगाबाद हायवे लगत असुन शिर्डी पासून १० कि. मी. अंतरावर आहे. सदर हायवे वरुन साई पालखींचे व मोठया प्रमाणावर साई भक्तांचे पायी ये-जा होते. त्यामुळे पालखींचे व साई भक्तांसाठी मौजे संवत्सर येथे थांबा होणे आवश्यक आहे. त्यामुळे

ग्रामसभेव्दारे साई संस्थान मार्फत ग्रामपंचायत संवत्सर हद्दीत भक्त निवास बांधावे जेणे करुन पालखी तसेच साई भक्तांचे निवास, पाण्याची सोय होईल. सदर भक्त निवास बांधणेकामी ग्रामपंचायत जागा उपलब्ध करुन देण्यास व पाण्याची सुविधा करुन देण्यास तयार आहे. तसेच भक्त निवास पुर्ण झाल्या नंतर देखभाल दुरुस्ती करण्यास ग्रामपंचायत तयार आहे. तरी ग्रामपंचायत हद्दीत भक्त निवास होणेस विनंती.

आता, मा. ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील, विधी व न्याय मंत्री, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक प.व बं./वि.न्या./मंत्री/टिप्पणी/व्हीआयपी/२०/१५७४, दिनांक २० एप्रिल, २०१० अन्वये ग्रामपंचायत कार्यालय, संवत्सर यांनी त्यांना अग्रेषित केलेल्या पत्रावर .. .. अध्यक्षसो., कृपया खास प्रस्ताव म्हणून भक्तनिवास बांधणेबाबत प्रस्ताव मान्य करावा. प्रारुप मान्यतेसाठी आवश्यक असेल तर प्रस्ताव पाठवावा असा अभिप्राय दिला आहे.

**(ब)** यापूर्वी, मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व धोरणानुसार मुंबई - शिर्डी या सिन्नर मार्गे येणाऱ्या पदयात्री साईभक्तांसाठी (०१) सिन्नर-घोटी महामार्गावर मौजे पांढुर्ली येथे साईभक्ताने बक्षिसपत्राने दिलेल्या जमिनीमध्ये, (०२) सिन्नर-शिर्डी रस्त्यावरील मौजे मुसळगांव येथे सिन्नर औद्योगिक वसाहतीचे कार्यालयाजवळील संस्थानने दिघमुदतीच्या भाडेपट्टयाने घेतलेल्या जमिनीमध्ये व (०३) सिन्नर-शिर्डी रस्त्यावरील मौजे पांगरी येथील साईभक्तांने बक्षीसपत्राने दिलेल्या जमिनीमध्ये तसेच (०४) मालेगांव-अहमदनगर या राज्यमार्गावरील मौजे येसगांव येथे ग्रामपंचायतीने विनामोबदला दिलेल्या जमिनीमध्ये अशा विविध चार ठिकाणी सर्वसोयींनीयुक्त असे पालखी थांबे उभारणेत आलेले आहेत.

आता, सरपंच, ग्रामपंचायत संवत्सर यांनी मौजे संवत्सर ग्रामपंचायत हद्दीमध्ये पालखी पदयात्री भक्तनिवास उभारणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि, सदर प्रस्तावासोबत त्यांनी जमीन कुठे व कोणाच्या मालकीची उपलब्ध करुन देणार, त्याचे क्षेत्र किती, जमीन कशी उपलब्ध करुन देणार याबाबत कुठली ही माहिती सादर केलेली नाही. सदर माहिती ग्रामपंचायत संवत्सर यांचेकडून उपलब्ध करुन घेणेत येत आहे.

तसेच सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतींच्या मालकीच्या ज्या जमिनी असतात, त्या शासन मालकीच्या असतात. सदर जमिनी ग्रामपंचायत मा. जिल्हाधिकारी यांच्या पुर्वपरवानगीशिवाय इतर संस्थांना देऊ शकत नाही. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीची मौजे संवत्सर येथे ग्रामपंचायतीच्या हद्दीत पालखी थांबा उभारणेबाबत तत्वत: निर्णय झालेस, ग्रामपंचायत देऊ करत असलेल्या जमिनींविषयी आवश्यक ती माहिती उपलब्ध करवून घेऊन यथायोग्य कार्यवाही करता येईल.

**निर्णय क्र. ४५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १३** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१० निमित्ताने तसेच साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे बाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी गुरुवार दि. २४ जूलै, २०१० ते दि. २६ जूलै, २०१० अखेर "श्रीं" चा गुरुपौर्णीमा उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, धर्मशाळा परिसर, प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसांत उत्सव असल्याने मंडपामध्ये पावसाचे पाणी गळणार नाही करीता मंदिर परिसरामध्ये जी. आय. पत्र्याचे छत असलेले मंडप बांधणे संयुक्तीक होईल. तसेच इतर परिसरात प्लास्टीक ताडपत्रीचे छत असलेले व कापडी मंडप, बिछायतीसह खालील प्रमाणे मंडप उभारणी करणे आवश्यक आहे.

**अ) श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१० निमीत्त करावयाची मंडप व्यवस्था :**

(कालावधी दि. २४.०७.२०१०ते दि. २६.०७.२०१० अखेर)

**०१.पत्र्याचे छत असलेले मंडप. (०३ दिवस)**

उत्सवा निमीत्ताने समाधी मंदिर परिसरात पत्र्याचे छत असलेले उभारवयाचे मडप :

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | | |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त | २८४'x१९'.३" | ५४६७.०० | |
| ०२ | श्रीं चे चावडी समोरील जागेत | ६०'x३०' | १८००.०० | |
| ०३ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ लेंडीबागेत नंदादिप मागील बाजूस गेट न. ५ पर्यंत | १०२'.६"x३५'.३"<br>९७'x८' | ३६१३.१३<br>७७६.०० | |
| ०४ | नंदादिपचे पाठीमागे पालखीसाठी मंडप | ८९'x२६'.६" | २३५८.५० | |
| ०५ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ६०'x४०' | २४००.०० | |
| | | मंडपाचे एकूण क्षेत्रफळ | १६४१४.६३ | ३.०० |

| | |
|---|---|
| अंदाजे अपेक्षित खर्च रु. | **१,४७,७३२.००** |

**०२. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप : (०३ दिवसाकरीता)**

जुने प्रसादालय, साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईउद्यान, इ. परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कपडी मंडप उभारणी करणे. : कालावधी दि. २४.०७.२०१०ते दि. २६.०७.२०१०अखेर ०३ दिवस

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | चौरस फुट | अंदाजे दर रुपये प्रति दिवस प्रति चौ. फुट |
|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** |
| ०१ | साईनगर मैदानावर कनात व बिछायतीसह | १००'x७५' | ७५००.०० | १.७० |
| ०२ | मंगल कार्यालय येथे कनात व बिछायतीसह | १३'x८८' | ११४४.०० | |
| ०३ | साईउद्यान समोर कनात व बिछायतीसह | ३०'x७४' | २२२०.०० | |
| ०४ | समाधि मंदिर गेट नं. ३ पासून वेशीपर्यंत | २०'x१२०' | २४००.०० | |
| ०५ | नविन भक्तनिवासस्थान दक्षिण बाजूस पार्किंगमध्ये कनात व बिछायतीसह | ४५'x३९०' | १७५५०.०० | |
| ०६ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूस | १९'x४१' | ७७९.०० | |
| ०७ | जुने प्रसादालय परिसरात तिकीट काउंटर समोर जेवण रेलींग पूर्व/ पश्चिम बाजू कनात व बिछायतीसह | १३४'x३७' | ४९५८.०० | |
| ०८ | जुने प्रसादालय परिसरात सुलभ प्रसाधनगृहासमोर कनात व बिछायतीसह | ७६'x१३'-३"<br>९३'x४०'-३" | १००७.००<br>३७४३.२५ | |
| ०९ | साईप्रसाद नं.०२ / चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | १५'x६०' | ९००.०० | |
| १० | गेट नं. ३ समोरील मोकळ्या जागेत (१६ आर जागेत) | १९०'x३५'<br>१५'x२०' | ६६५०.००<br>३००.०० | |
| ११ | पालखीसाठी निर्मळ पिंप्री येथे व शिंगवे नाईक येथे कनात व बिछायतीसह | ४०'x६०'<br>४०'x६०' | २४००.००<br>२४००.०० | |
| १२ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीताकनात व बिछायतीसह | २०'x१५' | ३००.०० | |
| १३ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह | १५'x१०' | १५०.०० | |
| १४ | प्रसादालय पार्किंगमध्ये | १००'x१५०' | १५०००.०० | |
| १५ | साईबाबा भक्तनिवास पश्चिम बाजूस बुफे करीता | ३०'x९०' | २७००.०० | |
| १६ | साईनगर मैदानावर माहिती केंद्र करीता | १५'x१५' | २२५.०० | |
| | | मंडपाचे एकूण क्षेत्रफळ | ७२३२६.२५ | १.७० |
| | | | अंदाजे अपेक्षित खर्च रु. | **३,६८,८६४.००** |

**०३. बाथरुमसाठी पत्र्याचे पार्टीशन व्यवस्था :**

बाथरुमसाठी पत्र्याचे पार्टीशन व्यवस्था:कालावधी दि. २४.०७.२०१० ते दि. २६.०७.२०१० अखेर -३ दिवस

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | रनिंग फुट | अंदाजे दर रु. प्रति रनिंग फुट प्रति दिवस |
|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** |
| ०१ | नविन प्रसादालय बाहेरील बाजूस बाथरुम व्यवस्था ६' उंचीचे | २००.००<br>रनिंग फुट | २००.०० | १०.०० |
| अंदाजे अपेक्षित खर्च रु. | | | | **६,०००.००** |

**०४. स्टेज व्यवस्था : (०३ दिवस)**

मंदिर परिसरात स्टेज व्यवस्था : कालावधी दि. २४.०७.२०१०ते दि. २६.०७.२०१० अखेर - ०३ दिवस

| अ.नं. | ठिकाण | आकार | चौरस फुट | अंदाजीत रक्कम रु. ०३ दिवसासाठी |
|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** |
| ०१ | मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था:<br>३"उंचीचे स्टेज, स्टेजवर सिटेंटीक मॅटीन, स्टेजचे मागील बाजूस पडदा, स्टेजचे वरिल बाजूने पन्हाळी पत्रे बसवून स्टेज तयार करणे व आतिल बाजूने सुशोभित कापड बांधणे, व स्टेजचे तिन बाजूने साईडपट्टी लावणे, पुढील बाजूने पडदा लावणे व कलाकारांचे मेकअपसाठी २०ङx१०ङ साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे. तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था. | ३०"x२०" | ६००.०० | १२.०० |

| | |
|---|---|
| अंदाजे अपेक्षित खर्च रु. | **२१,६००.००** |

**५. बॅरेकेटींग व्यवस्था : (०३ दिवस)**

कालावधी दि. २४.०७.२०१० ते दि. २६.०७.२०१० अखेर - ०३ दिवस

| अ.नं. | ठिकाण | आकार | रनिंग फुट | अंदाजीत रक्कम रुपये ०३ दिवसासाठी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेकेटींग | २००० रनिग फुट | २००० | ५.०० |
| | | | अंदाजे अपेक्षित खर्च | १०,०००.०० |

अंदाजे एकूण अपेक्षित खर्च (अ.क्र.१ ते५ नुसार)=**५,५४,१९६/- (अ)**

**ब) पावसाळी पत्र्याचे छत असलेली मंडप व्यवस्था :**

(दि. ०१.०७.२०१० ते दि. ३०.०९.२०१० अखेर एकुण ९२ दिवसाकरीता)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | चौरसफुट | अंदाजे दर रु. प्रति दिवस प्रति चौ. फुट |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | अ) समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग (गुरुस्थान गेट) ते गुरुस्थान समोरील बेसमेंट पर्यंत | ८१'x१७' | १३७७.०० | |
| | ब) गुरुस्थान समोरील बेसमेंटचे दक्षिण बाजूस | ५०'x१९' | ९५०.०० | |
| | क) गुरुस्थान समोरील पश्चिम बाजूस | ५०'x१०' | ५००.०० | |
| | ड) गुरुस्थान समोरील बेसमेंट ते अब्दुलबाबा समाधी पर्यंत (देणगी काउंटर नं. ०२ जवळील गेट) | ११०'x१०' | ११००.०० | |
| ०२ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६०'.९" x६८' | ४१३१.०० | |
| ०३ | समाधी मंदिर दक्षिण बाजूस, व्दारकामाई ते नगरव्दार गेटपर्यन्त | १२५'x२०' | २५००.०० | |
| ०४ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ४५'x२७' | १२१५.०० | |
| | | मंडपाचे एकूण क्षेत्रफळ | ११७७३.०० | ०.४५ |
| | | | अंदाजे अपेक्षित खर्च रु. | **४,८७,४०२.००** |

अंदाजे एकूण अपेक्षित खर्च रु.४,८७,४०२/- (ब)

वरीलप्रमाणे अ नुसार श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०१० निमीत्ताने मंडप व उत्सवानिमित्त इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी रु.५,५४,१९६ /- तसेच मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी रंगकाम करणेकामी येणारे रु.१०,०००.०० मात्रचे खर्चासह एकुण रु.५,६४,१९६ /-मात्र खर्च अपेक्षित आहे. व ब नूसार पावसाळी मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रुपये ४,८७,४०२/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०१० व पावसाळी मंडप व्यवस्था करणेकामी एकूण रू.१०,५१,५९८/- खर्चास व मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०१० व पावसाळी मंडप व्यवस्था करणेकामी एकूण रू.१०,५१,५९८/- खर्चास व मंडप ठेकेदार यांचेकडून ताडपत्री मंडपाचे कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १४ साईप्रसाद निवासस्थान व नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागातील कॉट व टीपॉय रंगकाम करणे बाबत**

**प्रस्ताव -** साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) इमारतीमधील खोल्या साईभक्तांना निवासाकरीता देणेत येतात. सदर रुममध्ये एकुण १७९८ नग कॉट व ४८६ नग टिपॉय आहेत. सदरचे कॉटचा रंग दैनदिन वापरामुळे खराब झ ाालेला आहे. करीता सदरचे कॉटला रंगकाम करणे तसेच ४८६ नग टिपॉय रंगकाम व पृष्ठभागाचा सनमायका टॉप बसविणे तसेच पायाला रबरी बुच बसवून मिळणेबाबत साईबाबा भक्तनिवास यांनी त्यांचेकडील दिनांक ०७ जानेवारी, २०१० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. तसेच श्री साईप्रसाद निवासस्थाने विभागा अंतर्गातील देणेत येणारे रुममधील कॉटला व टिपॉयला रंगकाम करुन मिळणेबाबत त्यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. करीता साईबाबा भक्तनिवास व श्री साईप्रसाद निवासस्थान यांचेकडे खालील तपशिलानूसार कॉट व टिपॉय आहेत.

| अ. नं. | विभागाचे नांव | कॉट | टिपॉय | लगेज रॅक |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम्स) | १७९८ | ४८६ | |
| ०२ | श्री साईप्रसाद निवासस्थान | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ०१. | साईप्रसाद नं. १ | १७४ | २० | ७८ |
| | ०२. | साईप्रसाद नं. २ | १८२ | -- | -- |
| | ०३. | साईउद्यान | ६० | -- | -- |
| | ०४. | सेवाधाम | ४० | -- | -- |
| | ०५. | समर्पण | ०६ | -- | -- |
| एकुण | | | २२६० | २० | ७८ |

उपरोक्त प्रमाणे २२६० नग कॉटला व ७८ नग लगेज रॅकला स्प्रे पेंटींग व्दारे ऑईल पेंटचे रंगकाम व कॉटचे प्लायवूडला टचवूडचे पॉलिशचे काम करता येईल. तसेच टिपॉयचे सध्याचे प्लायवूड टॉपला सनमायका बसवून पायाला रबरी बुच बसवून स्प्रे पेंटींग व्दारे ऑईल पेंटचे रंगकाम करुन घेता येईल. याकामी एकुण अंदाजे रुपये ७,०४,०७०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे रुपये ७,०४,०७०/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद निवासस्थान व नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागातील कॉट व टीपॉय रंगकाम करणेकामी विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून सदरचे काम करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७,०४,०७०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १५ साईनगर जनरेटर रुमला आतील व बाहेरील रंगकाम करणे बाबत.**

**प्रस्ताव -** संस्थानचे साईनगर परिसरातील कर्मचारी वसाहत आणि श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी विजपुरवठा तात्काळ करणेसाठी सबस्टेशनमध्ये २५० के.व्ही.ए., ५०० के.व्ही.ए. क्षमता असलेले जनरेटर करीता दोन वेगवेगळया इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. सदरहू जनरेटर रुमची दुरुस्ती काम तसेच आतिल व बाहेरील रंगकाम करुन मिळणेबाबत विद्युत विभाग प्रमुख यांनी दिनांक ०७/०४/२०१० रोजीचे पत्रान्वये इकडेस कळविले आहे.

विषयांकित कामासाठी बांधकाम विभागाचे प्रतिनिधी यांनी समक्ष पहाणी करुन आवश्यक किरकोळ दुरुस्तीचे काम उपलब्ध असलेले मटेरीअलमधून खात्यामार्फत सुरु केले आहे. तसेच २५० के.व्ही. व ५०० के.व्ही.इमारतींना आतिल व बाहेरील रंगकाम करणेसाठी सोबत जोडलेल्या अंदाज पत्रकानुसारप्रचलित बाजारभावाप्रमाणे अंदाजे रु. ६५,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी विषयांकीत रंगकामासाठी येणारे रुपये ६५,०००.०० मात्रचे अपेक्षित खर्चास आणि मटेरीअल व मजुरीकामाचे कोटेशन्स मागविणेसाठी मंजुरीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र. ४६० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईनगर जनरेटर रुमला आतील व बाहेरील रंगकाम करणेस व याकामी येणारे रुपये ६५,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास आणि मटेरीअल व मजुरीकामाचे कोटेशन्स मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १६ साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे छताचे स्लॅबसाठी वॉटरप्रुफिंग करणेबाबत**

**प्रस्ताव -** संस्थानचे कर्मचारी वसाहतीपैकी साईनगर इमारतीचे तिसऱ्या मजल्यावर राहात असलेले एकूण पाच कर्मचारी यांनी दि.१४/०४/२०१० अर्जान्वये विनंती केली आहे की, तेथील टेरेसचे लिकेज काढून मिळावे आणि पॅसेजमधील निघालेले प्लास्टर करुन मिळावे त्यानुसार इकडील विभागामार्फत समक्ष पहाणी केली असून पॅसेजचे पडलेले प्लास्टर इकडील विभागामार्फत करुन घेता येईल. तथापी टेरेस वॉटरप्रुफींग ठेकेदाराची नेमणूक करुन काम करता येईल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | कामाचे स्वरुप | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्लॅबचे जुने I.P.S. तोडून मटेरियल वहातूक करणे. | ४२४.०० | चौ. मिटर | ५०.०० | २१,२००.०० |
| ०२ | स्लॅबला दोन कोटमध्ये १:२ सिमेंट मॉरटरमध्ये खडी कोबा करुन, त्यावर वॉटर प्रुफ प्लास्टर करणे. | ४२४.०० | चौ. मिटर | ४५५.०० | ६५,७२०.०० |
| ०३ | पॅसेज मधील छतास प्लास्टर करणे ३४.६० x १.२२ x १ नग = ४२.२१ say ४३.०० | ४३.०० | चौ.मिटर | ५३.०० | २२७९.०० |
| ०४ | प्लास्टरसाठी निरु फर्नीशिंकरणे- | ४३.०० | चौ.मिटर | २४.०० | १०३२.०० |
| | | | | एकूण पूर्णांकीत रुपये | ९०,२३१.०० |

उपरोक्त तपशिलावरुन साईनगर इमारतीचे स्लॅबला वॉटरफ्रुफिंग करणे आणि पॅसेज मधील सिलिंगला प्लास्टर करणेसाठी अंदाजे रुपये ९०,२३१/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरहू खर्चास व याकामी ठेकेदार यांचेकडून कोटेशन्स मागवून काम करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४६१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईनगर इमारतीचे स्लॅबला वॉटरप्रुफिंग करणे आणि पॅसेज मधील सिलिंगला प्लास्टर करणेसाठी अंदाजे रुपये ९०,२३१/- मात्र इतके अपेक्षित खर्चास तसेच. याकामी ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १७ केंद्र व राज्य शासनाकडून तिर्थक्षेत्र विकास व इतर विकास योजना प्रकल्पांतर्गत आर्थिक अनुदान/सहाय्य यासाठी श्री अभय शास्त्री असोसिएटस् (चार्टर्ड अकौंटंटस) यांना देऊ केलेल्या फी बाबत पुनर्विचार होणे बाबत**

**प्रस्ताव -** दिनांक ०६/०३/२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये केंद्र व राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र विकास व इतर विकास योजना प्रकल्पांतर्गत शासकीय आर्थिक अनुदान / आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन घेणेबाबत खालील प्रमाणे निर्णय क्रमांक ३५२ संमत करण्यात आलेला आहे.

"केंद्र व राज्य शासनाकडून तीर्थक्षेत्र विकास व इतर विकास योजना प्रकल्पांतर्गत शासकीय आर्थिक अनुदान / आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन घेणेबाबत प्रस्ताव सादर करणेत यावेत. यासाठी या क्षेत्रातील अनुभव असलेल्या पुणे येथील अभय शास्त्री असोसिएटस् (चार्टर्ड अकौन्टटस्), पुणे यांची नियुक्ती करण्यात यावी. याकामी मे. अभय शास्त्री असोसिएटस् (चार्टर्ड अकौन्टटस्), पुणे यांना प्रस्तावित प्रस्ताव किंमतीच्या ०१ (एक) टक्का (अधिक सेवाकर) रक्कम सर्वसमावेशक खर्चासह सल्लागार शुल्क म्हणून आदा करणेत यावी. केंद्र अथवा राज्य शासनाकडून अशा प्रकारचे आर्थिक अनुदानाचे प्रस्ताव मंजूर होऊन, त्याप्रमाणे मंजूर रक्कम संस्थान व्यवस्थापनाला प्राप्त झाल्यास, त्या मंजूर रकमेच्या ०५ (पाच) टक्के रक्कम (अधिक सेवाकर) (पुर्वीची अदा करण्यात आलेली ०१ (एक) टक्का रक्कम वजा जाता ०४ टक्के रक्कम) सल्लागार शुल्क म्हणून संबधीत संस्थेस आदा करणेत यावी, असे ठरले."

मा. विश्वस्त, डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांनी उपरोक्त निर्णय क्रमांक ३५२ बाबत मा. अध्यक्ष सो। यांना अग्रेषित केलेले दिनांक ११/०५/२०१० रोजीचे पत्रान्वये सदरहू आयत्या वेळेचा विषय क्रमांक १७ निर्णय क्रमांक ३५२ रद्द करणेबाबत कार्यवाही करावी असे कळविले आहे. सदरहू पत्राच्या प्रती त्यांनी मा. उपाध्यक्ष, मा. कार्यकारी अधिकारी व सर्व मा. विश्वस्तांना दिलेल्या आहेत.

तरी उपरोक्त विषयाबाबत पुनर्विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४६२ यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त निर्णय रद्द करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८ श्री शत्श्रृंगा विद्या संस्था, कामाक्षीपलया, बंगलोर (Sri Shathashrunga Vidya Samsthe (R), Kamakshipalya, Bangalore) यांचा शिर्डी येथे भक्तनिवासस्थान बांधणेसाठी एक एकर जागा मिळणेबाबतचा तसेच बंगलोर येथे माहिती सुविधा केंद्र सुरु करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव -** **(अ)** श्री शत्श्रृंगा विद्या संस्था, बंगलोर यांनी त्यांचेकडील दिनांक ०६ मे, २०१० रोजीचे दोन स्वतंत्र पत्रानुसार आपले प्रस्ताव सादर केले आहेत. त्याचा थोडक्यात गोषवारा :

**संस्थेची माहिती :**

श्री शत्श्रृंगा विद्या संस्था, बंगलोर ही एक श्री साईबाबांचे तत्वांनुसार गरीब, गरजू व्यक्तिंचे कल्याण करणारी विना नफा, अधार्मिक, बिनराजकिय व बिनसरकारी संस्था आहे. सदर संस्था पुज्य गुरुजी साईरामाप्रसाद यांनी स्थापन केलेली असून, सदर संस्था जात, पात व धर्म न पाळतां समाजातील उपेक्षित घटकांसाठी काम करते.

सदर संस्थेने केवळ दोन साई मंदिरे बांधलेली नसून, तर साईबाबांचे तत्वांचे पालन करुन, तहानलेल्यास पाणी, भुकेलेल्यास अन्न, वस्त्रहीनास वस्त्र उपलब्ध करुन देण्याचे कार्य करीत आहे. शिवाय गरीब व गरजू व्यक्तिंसाठी विविध कार्यक्रम राबवित आहे.

**संस्थेचा प्रस्ताव क्रमांक ०१ :**

संस्थेस शिर्डी येथे कर्नाटक श्री साई भवन उभारणेसाठी, संस्थानमार्फत अलोक इंडस्ट्रिज यांना ज्या अटी शर्तीवर संस्थानने जागा उपलब्ध करुन दिलेली आहे, त्याच अटी शर्तीवर एक एकर जागा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थेने विनंती केलेली आहे.

**संस्थेचा प्रस्ताव क्रमांक ०२ :**

बंगलोर येथून साधारणतः दररोज १००० साईभक्त शिर्डी येथे भेट देत असतात. या गरजू साईभक्तांना संस्थान विषयी माहिती देणेसाठी सदरची संस्था १००० चौरस फुट जागा त्यांचे साई मंदिराचे परिसरात देण्यास तयार आहे. सदर माहिती केंद्राचे व्यवस्थापन संस्थानमार्फत करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे संबंधित संस्थेने सादर केलेल्या प्रस्ताव पत्रांसोबत, मा. श्री. अशोकराव खांबेकर, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक १० मे, २०१० रोजीचे पत्रानुसार अभिप्राय वजा शिफारस केली असून, सदरचे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेबाबत कळविले आहेत.

**(ब-१) प्रस्ताव क्रमांक ०१ बाबत :**

यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीने अलोक इंडस्ट्रिज, मुंबई व साईग्रेस फौडेंशन, मुंबई, एमपीए फायनान्शील सव्हिसेस, कलकत्ता यांना शिर्डी येथे भक्तनिवासस्थान इमारत बांधणेसाठी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील भूसंपादनाचे माध्यमातून मिळालेली व संस्थान मालकीच्या जमिनीमध्ये अंदाजे दहा हजार चौरस फुट ते एक एकर जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. तथापि, संस्थानने उपलब्ध करुन दिलेली जागा या हरित पट्टयात असून, त्याठिकाणी बांधकाम करणेस सक्षम शासकीय कार्यालये मंजूरी देत नाही. अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांचे भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकाम आराखडे मान्यतेस्तव नगररचना कार्यालयाकडे पाठविणेत आलेले आहेत, परंतु त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. तसेच सदरहू जमिनी हरित पट्टयातून निवासी पट्टयात समावेश करणेसाठी शासन स्तरावर संस्थानमार्फत प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, त्यावर कार्यवाही सुरु आहे.

अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांचेशी समझोता करारनामा करणेत आलेला असून, साईग्रेस फौडेंशन, मुंबई व एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस, कलकत्ता यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत मिळालेल्या मान्यतेनुसार समझोता करारनामा वगैरे करणेकामी कार्यवाही सुरु आहे. त्यास अनुसरुन, श्री शत्श्रृंगाविद्या संस्था, कामाक्षीपलया, बंगलोर यांना ०१ एकर जागेऐवजी साधारणत: १०००० चौरस फुट जागा मौजे निमगांव कोऱ्हाळे संस्थान मालकीच्या गट नंबर १८६ मधील जमिनींपैकी उचित ठिकाणी विहीत अटी शर्ती निश्चित करुन जागा उपलब्ध करुन देणे उचित राहील.

**(ब-२) प्रस्ताव क्रमांक ०२ बाबत :**

यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, महाराष्ट्र शासनामार्फत संचलित नवि दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या इमारतीत, आंध्रप्रदेशातील सिकंदराबाद येथे राधास्वामी फौंडेशन यांचेकडून नाममात्र भाडेपट्टयाने घेतलेल्या जागेमध्ये, तामिळनाडूतील चेन्नई येथे शिर्डी साई ट्रस्ट यांचे इमारतीमध्ये माहिती सेवा केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. तसेच कर्नाटकातील बंगलोर शहरातील श्री साई मंडळी ट्रस्ट मल्लेश्वरम येथे त्यांनी माहिती केंद्र सुरु करणेसाठी देऊ केलेल्या जागेची पहाणी करुन ती योग्य असल्यास त्याठिकाणी माहिती केंद्र सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे.

आता, श्री शत्श्रृंगा विद्या संस्था, कामाक्षीपलया, बंगलोर यांनी त्यांनी उभारलेल्या साई मंदिराच्या परिसरात संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी १००० चौरस फुट जागा देऊ केली आहे. तथापि त्यांनी सदर जागा नेमकी कोठे आहे, त्या जागेच्या आसपास काय सुविधा आहेत, जागेचा नकाशा आदि बाबींबाबत सविस्तर प्रस्ताव सादर केलेला नाही. तथापि त्यांनी प्रस्तावात सदर माहिती केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन संस्थानमार्फत केले जाईल, असे सुचविले आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन, श्री शत्श्रृंगा विद्या संस्था, कामाक्षीपलया, बंगलोर यांनी माहिती केंद्रासाठी सुचविलेल्या जागेची समक्ष पहाणी करुन व त्याविषयी अधिक माहिती संबंधीत संस्थेकडून उपलब्ध करुन घेता येईल. तसेच सदर संस्था धर्मादाय न्यास आहे किंवा कसे याबाबत त्यांचेकडून उपलब्ध करुन, त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**(क)** उपरोक्त परिच्छेद ब-१ व ब-२ मध्ये नमूद केलेप्रमाणे, श्री शत्श्रृंगा विद्या संस्था, कामाक्षीपलया, बंगलोर (कर्नाटक) यांना शिर्डी येथे कर्नाटक श्री साई भवन उभारणेसाठी १०००० चौरस फुट जागा विहीत अटी शर्तीवर उपलब्ध करुन देणेत यावी किंवा कसे ? तसेच सदर संस्थेने सुचविलेप्रमाणे बंगलोर येथे त्यांचेमार्फत उभारण्यात आलेल्या श्री साई मंदिर परिसरात साईभक्तांच्या सोयीसाठी संस्थानमार्फत माहिती सुविधा केंद्र सुरु करण्यात यावे किंवा कसे ? याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र. ४६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. १९** **महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड, मुंबई यांचा शिर्डी येथे भक्तनिवासस्थान बांधणेसाठी संस्थानची दोन एकर जमीन मिळणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव -** **(अ)** मा. श्री. विष्णू गर्ग, उपाध्यक्ष, महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड, महिन्द्रा टॉवर्स, वरळी, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक ०३ मे, २०१० रोजीचे मा. अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या फॅक्स पत्राव्दारे त्यांचे कंपनीमार्फत शिर्डी येथे भक्तनिवासस्थान उभारणेसाठी संस्थानची दोन एकर जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

.. .. श्री. आनंद महिन्द्रा, उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक, महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड यांचा आपले संस्थानचे विश्वस्त श्री. अशोकजी खांबेकर यांचेशी झालेल्या संवादानुसार, आम्ही शिर्डी येथे २०-३० खोल्यांचे भक्तनिवास प्रकल्प उभारु इच्छितो. आम्हांस समजलेनुसार, अशा प्रकल्पांसाठी आपण काही संस्थांना बाओटी तत्वावर / त्या धर्तीवर जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी कृपया या संदर्भात सविस्तर चर्चा करणेसाठी, जागा निश्चित करणेसाठी शिर्डी येथे भेट देणेसाठी तसेच आम्ही गुंतवणूक करु इच्छित असल्याबाबत चर्चा करणेसाठी सोयीची तारीख व वेळ मिळावी.

**(ब)** यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीने अलोक इंडस्ट्रिज, मुंबई व साईग्रेस फौडेंशन, मुंबई, एमपीए फायनान्शील सव्हिसेस, कलकत्ता यांना शिर्डी येथे भक्तनिवासस्थान इमारत बांधणेसाठी मौजे निमगांव को-हाळे येथील भूसंपादनाचे माध्यमातून मिळालेली व संस्थान मालकीच्या जमिनीमध्ये अंदाजे दहा हजार चौरस फुट ते एक एकर जागा जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. तथापि, संस्थानने उपलब्ध करुन दिलेली जागा या हरित पट्टयात असून, त्याठिकाणी बांधकाम करणेस सक्षम शासकीय कार्यालये मंजूरी देत नाही. अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांचे भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकाम आराखडे मान्यतेस्तव नगररचना कार्यालयाकडे पाठविणेत आलेले आहेत, परंतु त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. तसेच सदरहू जमिनी हरित पट्टयातून निवासी पट्टयात समावेश करणेसाठी शासन स्तरावर संस्थानमार्फत प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, त्यावर कार्यवाही सुरु आहे.

अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांचेशी समझोता करारनामा करणेत आलेला असून, साईग्रेस फौडेंशन, मुंबई व एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस, कलकत्ता यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत मिळालेल्या मान्यतेनुसार समझोता करारनामा वगैरे करणेकामी कार्यवाही सुरु आहे. त्यास अनुसरुन, महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड, मुंबई यांना शिर्डी येथे भक्तनिवास प्रकल्प उभारणेसाठी मौजे निमगांव को-हाळे संस्थान मालकीच्या गट नंबर १८६ मधील जमिनींपैकी उचित ठिकाणी विहीत अटी शर्ती निश्चित करुन अंदाजे २०००० चौरस फुट जागा उपलब्ध करुन देता येईल. अथवा त्यांना दोन एकर जमिन उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास, गट नंबर २४९ किंवा २५० मध्ये उपलब्ध करुन देता येईल. याकामी कंपनीच्या प्रतिनिधींना आजचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविणेत आले असून, त्यांचेशी चर्चा करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र. ४६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. २०** **श्री. गणेश बापुराव बनकर व इतर ०२, रा. शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०५/६ क्षेत्र ६० आर व सर्व्हे नंबर १९८/४ मधील क्षेत्र ०९ आर जमिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव -** **(अ)** श्री. गणेश बापुराव बनकर व इतर ०२, रा. शिर्डी यांनी खाली नमूद केलेल्या जमिनी संस्थान विकत घ्याव्यात, म्हणून दिनांक २६ एप्रिल, २०१० रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. वरील दोन्ही जमिनींच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०५/६ | गणेश बापुराव बनकर<br>भगवान बापुराव बनकर<br>विजया बापुराव बनकर | ०० हे ५५ आर<br>०० हे ०५ आर पोख<br>**०० हे ६० आर** | ०१. इतर हक्कात शिर्डी वि. का. से. सोसायटी इ.प.क. घे.<br>०२. पिक पहाणीस स्वतः ऊस खोडवा नोंद आहे.<br>०३. अर्जदार सर्व जमीन खरेदी देऊ इच्छित आहेत. |
| ०२ | १९८/४ | मुरलीधर सोनाजी बनकर<br>नारायण त्र्यंबक बनकर<br>मयत वारस<br>गणेश बापुराव बनकर<br>भगवान बापुराव बनकर<br>लता चांगदेव गुजराथी<br>पुजा शिवाजी सोनवणे<br>सिंधु नानासाहेब धुंधारे<br>कलावती शंकर धुंधारे<br>विजया बापुराव बनकर | ०० हे ०७ आर<br>०० हे ०७ आर<br>०० हे ०८ आर<br>०० हे ०१ आर पोख<br>**०० हे ०९ आर**<br>**(एकूण क्षेत्र ०० हे २३ आर)** | ०१. इतर हक्कात शिर्डी वि. का. से.सोसायटी इ.प.क.घे.<br>०२. पिक पहाणीस स्वतः कडवळ नोंद आहे.<br>०३. अर्जदार त्यांच्या हिश्श्याची जमीन विकावयास तयार आहेत. |

उपरोक्त परिशिष्टातील, अ.नं. ०२ / सर्व्हे नंबर १९८/४ मध्ये नमूद केलेले गणेश बापुराव बनकर व इतर ०६ यांचे मालकीचे क्षेत्र ०० हे ०९ ही जमीन तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यामधील तरतुदीमुळे व त्याचे उल्लंघन होत असल्याने खरेदी करता येणार नाही.

**(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

सदरचे दोन्ही सर्व्हे नंबर पुर्वीचे बिरेगांवचे आहेत. बिरेगांव हे शिर्डी गांवात, शिर्डी नगरपंचायत हद्दीत समाविष्ट झालेले आहे. सदर जमीन साईश्रध्दा हौसिंग सोसायटीच्या पुर्वेस आहे. सदर जमीन श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरापासून अहमदनगर-मनमाड रस्त्याने साधारणत: ०१ किलोमीटर अंतरावर आहे. सध्या जमीन हरीत पट्टयात (शेती विभागात) आहे, त्यामुळे जोपर्यन्त सदर जमीन रहिवासी विभागात समाविष्ट होत नाहीत, तोपर्यन्त बिनशेती होणार नाही तसेच बांधकाम अनुज्ञेय नाही. त्याुळे सदर जमिनीचा उपयोग तात्काळ होणार नाही, परंतु भविष्यात योग्य त्या कारणासाठी उपयोग होण्याचा संभव आहे.

**(क) जमिनीच्या किंमतीबाबत :**

सन २०१० चे मुल्यांकन तक्त्यामध्ये पुर्वीचे बिरेगांव चे जे सर्व्हे नंबर आहेत, ते सामील केलेले नाहीत. त्यामुळे मुल्यांकन तक्त्यामध्ये सदर जमिनीच्या किंमती नमुद केलेल्या नाहीत.

मात्र, सदरचे जमिनीचे जवळपास असलेल्या शिर्डी गावांतील सर्व्हे नंबर १०१, १०२ चा मुल्यांकन तक्त्यामध्ये नाविकास विभागात दर रुपये २५००/- प्रति चौरस मीटर (झोन १/६२) असा दर्शविण्यांत आलेला आहे. त्यास अनुसरुन, जमिनीची किंमत प्रती आर रुपये २,५०,०००/- मात्र (रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) येत आहे. अर्जदाराची मागणी रुपये ४,००,०००/- मात्र प्रती आर मागणी केलेली आहे. याबाबत जमीनमालकाशी चर्चा वाटाघाटी करुन जमिनीची किंमत ठरविणे उचित राहील.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार, खालील बार्बीबाबत निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्री. गणेश बापुराव बनकर व इतर ०२ यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०५/६ क्षेत्र ०० हे ६० आर (पोटखराबासह) खरेदी करणेत यावी किंवा कसे ?

०२. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकाशी चर्चा-वाटाघाटीव्दारे जमिनीची प्रति आर किंमत निश्चित करणे.

०३. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमिनीचे खरेदीखताचे वेळेस जमिनीचे होणाऱ्या एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस मान्यता देणे.

०४. जमीन खरेदीसाठी जमिनीची किंमत आदा करणे, मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, सरकारी मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे तसेच इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र. ४६५ याबाबत व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्र.४४५ (१) अन्वये जमिन खरेदीकामी स्थापन झालेल्या समितीने पहाणी करुन अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. २१ श्री. सोन्याबापु बाबुराव काटकर, रा. शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०५/४ क्षेत्र ३० आर जमिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव - (अ)** श्री. सोन्याबापु बाबुराव काटकर, रा. शिर्डी यांनी खाली नमूद केलेली जमीन संस्थानने विकत घ्यावी, म्हणून दिनांक २६ एप्रिल, २०१० रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र व आकार | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०५/४ | सोन्याबापु बाबुराव काटकर | ०० हे ३० आर<br>आकार रु. १=४० | ०१. इतर हक्कात कोणतीही नोंद नाही.<br>०२. पिक पहाणीस स्वत: सोयाबीन, दु ाा गहू नोंद आहे.<br>०३. अर्जदार सर्व जमीन खरेदी देऊ इच्छित आहेत. |

**(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

सदरचे सर्व्हे नंबर पुर्वीचे बिरेगांवचे आहेत. बिरेगांव हे शिर्डी गांवात, शिर्डी नगरपंचायत हद्दीत समाविष्ट झालेले आहे. सदर जमीन साईश्रध्दा हौसिंग सोसायटीच्या पुर्वेस आहे. सदर जमीन श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरापासून अहमदनगर-मनमाड रस्त्याने साधारणत: ०१ किलोमीटर अंतरावर आहे. सध्या जमीन हरीत पट्टयात (शेती विभागात) आहे, त्यामुळे जोपर्यन्त सदर जमीन रहिवासी विभागात समाविष्ट होत नाहीत, तोपर्यन्त बिनशेती होणार नाही तसेच बांधकाम अनुज्ञेय नाही. त्याुळे सदर जमिनीचा उपयोग तात्काळ होणार नाही, परंतु भविष्यात योग्य त्या कारणासाठी उपयोग होण्याचा संभव आहे.

**(क) जमिनीच्या किंमतीबाबत :**

सन २०१० चे मुल्यांकन तक्त्यामध्ये पुर्वीचे बिरेगांव चे जे सर्व्हे नंबर आहेत, ते सामील केलेले नाहीत. त्यामुळे मुल्यांकन तक्त्यामध्ये सदर जमिनीच्या किंमती नमुद केलेल्या नाहीत.

मात्र, सदरचे जमिनीचे जवळपास असलेल्या शिर्डी गावांतील सर्व्हे नंबर १०१, १०२ चा मुल्यांकन तक्त्यामध्ये नाविकास विभागात दर रुपये २५००/- प्रति चौरस मीटर (झोन १/६२) असा दर्शविण्यांत आलेला आहे. त्यास अनुसरुन, जमिनीची किंमत प्रती आर रुपये २,५०,०००/- मात्र (रुपये

दोन लाख पन्नास हजार मात्र) येत आहे. अर्जदाराची मागणी रुपये ४,००,०००/- मात्र प्रती आर मागणी केलेली आहे. याबाबत जमीनमालकाशी चर्चा वाटाघाटी करुन जमिनीची किंमत ठरविणे उचित राहील.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार, खालील बाबींबाबत निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्री. सोन्याबापु बाबुराव काटकर यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०५/४ क्षेत्र ०० हे ३० आर (पोटखराबासह) खरेदी करणेत यावी किंवा कसे ?

०२. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकाशी चर्चा-वाटाघाटीव्दारे जमिनीची प्रति आर किंमत निश्चित करणे.

०३. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमिनीचे खरेदीखताचे वेळेस जमिनीचे होणाऱ्या एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस मान्यता देणे.

०४. जमीन खरेदीसाठी जमिनीची किंमत आदा करणे, मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, सरकारी मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे तसेच इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र. ४६६ याबाबत व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्र.४४५ (१) अन्वये जमिन खरेदीकामी स्थापन झालेल्या समितीने पहाणी करुन अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. २२ श्री. रामचंद्र मुरलीधर बनकर व इतर ०७, रा. शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०५/३ क्षेत्र २५ आर व सर्व्हे नंबर १९८/४ मधील क्षेत्र ०७ आर जमिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव -** **(अ)** श्री. रामचंद्र मुरलीधर बनकर व इतर ०७, रा. शिर्डी यांनी खाली नमूद केलेल्या जमिनी संस्थान विकत घ्याव्यात, म्हणून दिनांक २६ एप्रिल, २०१० रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. वरील दोन्ही जमिनींच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०५/३ | रामचंद्र मुरलीधर बनकर<br>अहिलाजी मुरलीधर बनकर<br>बारकु मुरलीधर बनकर<br>सोनाजी मुरलीधर बनकर<br>देवराम मुरलीधर बनकर<br>सुंदराबाई सोन्याबापू काटकर<br>लंकाबाई तानाजी काटकर<br>मुक्ताबाई पुंजा साबळे | **०० हे २४ आर** | ०१. इतर हक्कात शिर्डी वि. का. से. सोसायटी इ.प.क. घे.<br>०२. पिक पहाणीस स्वतः सोयाबीन, दु ाा गहू अशी नोंद आहे.<br>०३. अर्जदार त्यांचे हिश्श्याची सर्व २४ आर जमीन खरेदी देऊ इच्छित आहेत.<br>(गट नंबर २०५/६ चे एकूण क्षेत्र २५ आर आहे.) |
| | | लिलाबाई सावळेराम बनकर | **०० हे ०१ आर** | |
| ०२ | १९८/४ | मुरलीधर सोनाजी बनकर | ०० हे ०७ आर | ०१. इतर हक्कात शिर्डी वि. का. से.सोसायटी इ.प.क.घे.<br>०२. पिक पहाणीस स्वतः कडवळ नोंद आहे. |
| | | नारायण त्र्यंबक बनकर | ०० हे ०७ आर | |
| | | मयत वारस<br>गणेश बापुराव बनकर<br>भगवान बापुराव बनकर<br>लता चांगदेव गुजराथी<br>पुजा शिवाजी सोनवणे<br>सिंधु नानासाहेब धुंधारे<br>कलावती शंकर धुंधारे<br>विजया बापुराव बनकर | ०० हे ०८ आर<br>०० हे ०१ आर पोख<br>**०० हे ०९ आर**<br>**(एकूण क्षेत्र ०० हे २३ आर)** | |

**(०१)** उपरोक्त परिशिष्टातील, अ. नं. ०१ मध्ये नमूद केलेल्या सर्व्हे नंबर २०५/३ चे एकूण क्षेत्र ०० हे २५ आर आहे, त्यामध्ये अर्जदार श्री. रामचंद्र मुरलीधर बनकर व इतर ०७ यांचे क्षेत्र ०० हे २४ आर आहे. अर्जदार त्यांचे हिश्श्याचे संपूर्ण क्षेत्र विकावयास तयार आहेत, परंतु सदर जमीन बिनशेती नसल्यामुळे त्यांचे क्षेत्र विकत घेता येणार नाही. सदर सर्व्हे नंबर मधील दुसरे खातेदार श्रीमती लिलाबाई सावळेराम बनकर यांनी त्यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०१ आर संस्थानला विकण्याची तयारी दर्शविली तरच सदरचे संपूर्ण क्षेत्र २५ आर खरेदी करता येईल. अन्यथा तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यामधील तरतुदीमुळे व त्याचे उल्लंघन होत असल्याने खरेदी खत नोंदणी केले जाणार नाही.

**(०२)** तसेच अर्जदार श्री. रामचंद्र मुरलीधर बनकर व इतर ०७ यांनी सर्व्हे नंबर १९८/४ मधील क्षेत्र ०७ आर संस्थानला विकणेस तयार दर्शविली आहे. तथापि सर्व्हे नंबर १९८/४ चे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, अर्जदारांपैकी कोणाची ही नांवे सर्व्हे नंबर १९८/४ चे भोगवटादार सदरी नाहीत. तसेच या सर्व्हे नंबरचे एकूण क्षेत्र २३ आर आहे, त्यापैकी ०७ आर जमीन तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यामधील तरतुदीमुळे व त्याचे उल्लंघन होत असल्याने खरेदी खत नोंदणी केले जाणार नाही.

**(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

सदरचे दोन्ही सर्व्हे नंबर पुर्वीचे बिरेगांवचे आहेत. बिरेगांव हे शिर्डी गांवात, शिर्डी नगरपंचायत हद्दीत समाविष्ट झालेले आहे. सदर जमीन साईश्रध्दा हौसिंग सोसायटीच्या पुर्वेस आहे. सदर जमीन श्री साईबाबा

भक्तनिवासस्थान परिसरापासून अहमदनगर-मनमाड रस्त्याने साधारणतः ०१ किलोमीटर अंतरावर आहे. सध्या जमीन हरीत पट्ट्यात (शेती विभागात) आहे, त्यामुळे जोपर्यन्त सदर जमीन रहिवासी विभागात समाविष्ट होत नाहीत, तोपर्यन्त बिनशेती होणार नाही तसेच बांधकाम अनुज्ञेय नाही. त्याुळे सदर जमिनीचा उपयोग तात्काळ होणार नाही, परंतु भविष्यात योग्य त्या कारणासाठी उपयोग होण्याचा संभव आहे.

**(क) जमिनीच्या किंमतीबाबत :**

सन २०१० चे मुल्यांकन तक्त्यामध्ये पुर्वीचे बिरेगांव चे जे सर्व्हे नंबर आहेत, ते सामील केलेले नाहीत. त्यामुळे मुल्यांकन तक्त्यामध्ये सदर जमिनीच्या किंमती नमुद केलेल्या नाहीत.

मात्र, सदरचे जमिनीचे जवळपास असलेल्या शिर्डी गावांतील सर्व्हे नंबर १०१, १०२ चा मुल्यांकन तक्त्यामध्ये नाविकास विभागात दर रुपये २५००/- प्रति चौरस मीटर (झोन १/६२) असा दर्शविण्यांत आलेला आहे. त्यास अनुसरुन, जमिनीची किंमत प्रती आर रुपये २,५०,०००/- मात्र (रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) येत आहे. अर्जदाराची मागणी रुपये ४,००,०००/- मात्र प्रती आर मागणी केलेली आहे. याबाबत जमीनमालकाशी चर्चा वाटाघाटी करुन जमिनीची किंमत ठरविणे उचित राहील.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार,

०१. सर्व्हे नंबर १९८/४ मधील क्षेत्र ०० हे ०७ आर ही जमीन अर्जदार यांचेपैकी कोणाचेच नांवावर नसल्याने ती जमीन विकता घेता येणार नाही.

०२. श्री. रामचंद्र मुरलीधर बनकर व इतर ०८ यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०५/३ क्षेत्र ०० हे २४ आर ही जमीन तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द व्यवहार होत असल्याने खरेदी करता येणार नाही, तथापि याच सर्व्हे नंबरमधील दुसरे खातेदार श्रीमती लिलाबाई सावळेराम बनकर यांनी त्यांचे हिश्श्याची ०१ आर जमीन संस्थानला विकण्याची तयारी दर्शविल्यास जमीन खरेदी करता येईल. तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४६७ याबाबत व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० चे सभेतील निर्णय क्र.४४५ (१) अन्वये जमिन खरेदीकामी स्थापन झालेल्या समितीने पहाणी करुन अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२३ संस्थानच्या जमीनीवर (बांधाच्या कडेने ) वृक्ष लागवड करणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी शेती महामंडळाकडुन खरेदी केलेल्या आणि संपादीत केलेल्या जमिनीवर, बांधांच्या कडेने आंबा आणि नारळ या दोन प्रकारच्या फळझाडांची लागवड करुन संस्थानच्या झाडांच्या विशिष्ट असा पॅटर्न निर्माण करता येईल. शिर्डी परिसरातील त्या जमिनींच्या बांधावर आंबा व नारळ आहे असे क्षेत्र संस्थानचेच आहे हे दूरवरुन लक्षात येईल.

आंबा व नारळ या दोन्ही फळझाडांपासुन अल्प प्रमाणात उत्पादन मिळेल.या उत्पादनातुन वृक्ष रोपणाचा खर्चाची प्रतिपूर्ती हाऊ शकेल असे वाटते.

वृक्षारोपणासाठी १२ हजार मीटर लांबीचे क्षेत्र उपलब्ध असून या क्षेत्रात एकण ४००० नग आंबा आणि नारळांची रोपे लावता येतील. रोपे लागवडीसाठी ०३ बाय ३ फुट आकाराच्या ४००० नग खड्ड्यांची आवश्यकता असून पोटॅश खत ८० गोणी, शेणखत ३० ट्रेलर ,थायमेट २० कि. यानुसार खतांची आवश्यकता भासेल. रोपे लागवडीच्या खड्डेयांयसठी रु.८,००,०००/- खतांसाठी रु.९६,१००/- व रोपांसाठी रु.२,००,०००/- असा खर्च येईल. या रोपांना पाणी देण्यासाठी एका ट्रॅक्टरची टँकर सह आवश्यकता असून याकामी रु.८,००,०००/- पर्यत खर्च अपेक्षित आहे.

रोपांची दैनंदिन देखभाल करण्यासाठी दोन कर्मचारी आवश्यक असून या कर्मचाऱ्यांसह कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी झाडांची देखभाल करतील. दोन रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनासाठी रु. ९०००.०० खर्च अपेक्षित आहे.

**संक्षिप्त माहिती.**

| | | |
|---|---|---|
| ०१).वृक्षरोपणासाठी क्षेत्राचे गट नंबर | - | निमगांव कोऱ्हाळे ता .राहाता गट नं<br>८७ ८८ १७२<br>१८७ १९५ १९८<br>१९९ २०० २०१<br>२१८ २२१ २३४<br>२३८ २५० २४५<br>४०८ |
| ०२) वृक्ष रोपणासाठी क्षेत्राची एकुण लांबी | - | १२००० मीटर |
| ०३) वृक्षारोपण क्षेत्रातील एकुण रोपांची संख्या | - | ४००० नग |
| ०४) वृक्षरोपन करावयाची रोपे | - | १.आंबा - २००० नग<br>२.नारळ - २००० नग |
| ०५) वृक्षरोपणासाठी खर्च | - | |

| | | |
|---|---|---|
| अ) खड्डा | | |
| आकार | - | ( ३ बाय ३) फुट |
| खोदाई दर | - | रु.२० |
| नग | - | ४००० |
| खर्च | - | रु.८०,०००/- |

---

| | | |
|---|---|---|
| ब) खत | | |
| अ) पोटॅश | | |
| नग | - | ८० गोणी |
| दर | - | रु.२५०/- |
| खर्च | - | रु.२०,०००/- |
| ब) शेणखत | - | |
| नग | - | ३० ट्रेलर |
| दर | - | रु.२५००/- |
| खर्च | - | रु.७५,०००/- |
| क) थायमेट | | |
| नग | - | २० कि.ग्रॅ |
| दर | - | रु.५५/- |
| खर्च | - | रु.१,१००/- |
| खत एकुण खर्च | | रु.९६,१००/- |

---

| | | |
|---|---|---|
| क) रोपे खरेदी | | |
| १) आंबा | | |
| नग | - | २००० |
| दर | - | रु.६०/- ( संस्थान वाहतुक करणे) |
| खर्च | - | रु.१,२०,०००/- |
| २) नारळ | | |
| नग | - | २००० |
| दर | - | रु.४०/- |
| खर्च | - | रु.८०,०००/- |
| रोपे खरेदीसाठी एकुण खर्च | | रु.२,००,०००/- |

---

| | |
|---|---|
| ०६) रोपांना पाणी देणे | - यासाठी टँकरसह ट्रॅक्टरची आवश्यकता आहे. |
| टँकर ट्रॅक्टरसह नग | - प्रत्येकी एक |
| अंदाजे खर्च | रु.८,००,०००/- |

---

| | |
|---|---|
| ०७) देखभाल करणे | - दररोज दोन कर्मचारी |
| मासिक वेतनखर्च | - रु.९०००/- ( मासिक वेतन.दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांचे .रु.१५०/- प्रतिदिनी प्रमाणे ) |
| ३ वर्षासाठी वेतन खर्च | रु.३,२४,०००/- |

---

( रु. पंधरा लाख शंभर ) एकुण खर्च रु.१५,००,१००/-

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनती.

**निर्णय क्र. ४६८ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानच्या तारकंपाऊंड झालेल्या जमीनीवर (बांधाच्या कडेने ) आंबा व नारळ वृक्षाची लागवड करुन या वृक्षांना पाणी देणे, त्यांचे संरक्षण व संगोपन करणे ही कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात यावीत. त्यादृष्टीने २ वर्षे कालावधीसाठी टेंडर देणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.सदर वृक्षांची लागवड करण्यासाठी संस्थानमार्फत रोपे खरेदी करुन लागवडीसाठी पुरविण्यात यावीत असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२४ गावरान तूप उत्पादन करणाऱ्या कंपनीस भेट देणेबाबत**

**प्रस्ताव-** Sterling Agro Industries Ltd, Delhi या कंपनीने ई-मेल द्वार कळविले आहे की, त्यांची कंपनी नोव्हा, करमास, शरद आणि विवेक या ब्रॅन्डचे गावरान तुपाचे उत्पादन करत असून दररोज १२५

टन तुपाचे उत्पादन करुन मार्केटींग केले जाते. कंपनीचे भारतात मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश आणि हरीयाणा या राज्यात उत्पादन केंद्रे असून कंपनीच्या उत्पादीत ब्रॅन्डला ISO२२०००, HACCP, APEDA इ.मानंकन प्राप्त असून भारताबाहेरही मालाची निर्यात होते.

सध्या कंपनीचे Nestle India, Cadbury India Ltd, Britannia India, ITC Foods, Mother Dairy, Kerala Co-op, Punjab Milk Federation, Tripura Co-op इ. नामकिंत कंपन्या ग्राहक आहेत. ऑक्टोबर ते डिसेंबर २००९ अखेर मे.राहुल एन्टरप्रायझेस, नाशिक द्वारा संस्थाननेही त्यांचेकडून नोव्हा ब्रॅन्ड गावरान तुपाची खरेदी केलेली आहे.

नुकतीच कंपनीला तिरुपती तिरुमला देवस्थानचे प्रशासनाने भेट दिली असून १५०० टन गावरान तुप खरेदी करणेबाबतचा करार करण्यात आल्याबाबतचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

संस्थान प्रशासनाने भारतातील त्यांचे कोणत्याही उत्पादन केंद्रात भेट द्यावी अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली आहे. तरी पुढील निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र. ४६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे बाफणा बाजार, नाशिक यांना हटसन ब्रँडचे गावरान तुप पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२५ श्री साईबाबा रुग्णायातील नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरकरीता अतिरिक्त औषधे / सर्जिकल साहित्य इ.खरेदीबाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा रुग्णालयात सध्या एक कार्डीयाक ऑपरेशन थिएटर आहे. सदर ऑपरेशन मध्ये आपणाकडे सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येत असतात. या शस्त्रक्रिया करणेसाठी आपणाकडे तीन पूर्णवेळ व दोन मानद कार्डीयाक सर्जन आहेत. संस्थानकडे योग्य दरात शस्त्रक्रिया होत असल्यामुळे आजू बाजूच्या सर्व जिल्ह्यातून रुग्ण सदर सुविधाचा फायदा घेत असतात. तसेच आपणाकडे महाराष्ट्र शासनाची जिवनदायी योजना मंजूर असल्याने बरेच गरीब रुग्ण सुध्दा भरपूर येत असतात. उपरोक्त दोन्ही कारणांमुळे रुग्णांची संख्या ही दिवसेंदिवस वाढतच आहे. कार्डीयाक ऑपरेशन थिएटर कार्यान्वित झालेपासून शस्त्रक्रियेच्या वाढत्या संख्येची माहिती खालील प्रमाणे -

| अ. नं. | तपशिल | शस्त्रक्रियेची संख्या |
|---|---|---|
| १ | सन २००६-२००७<br>(०१.०४.०६ ते ३१.०३.०७) | ३०५ |
| २ | सन २००७-२००८<br>(०१.०४.०७ ते ३१.०३.०८) | ५८८ |
| ३ | सन २००८-२००९<br>(०१.०४.०८ ते ३१.०३.०९) | ७७६ |
| ४ | सन २००९ (१० महिने)<br>(०१.०४.०९ ते ०१.०१.१०) | ८३० |

उपरोक्त प्रमाणे शस्त्रक्रियेची संख्या सतत वाढतच असल्याने सध्या रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी कमीत कमी ३ महिने पर्यंत प्रतिक्षा करावी लागते. दरमहा साधारणत: ९० रुग्णांची शस्त्रक्रिया होत असते तर एका वर्षात साधारणत: ११०० रुग्णांवर शस्त्रक्रिया होत असतात. नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर तयार झाल्यास अजून साधारणत: ५०० ते ६०० शस्त्रक्रियेचे संख्येत वाढ होईल.

श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१०-२०११ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र. ११० अन्वये रु. २२,८६,८०,२२३/- चे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास मान्यता मिळालेली आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही चालु आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०३/२०१० चे सभेत श्री साईबाबा रुग्णालयात ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत करुन त्याजागी अजून एक नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर कार्यान्वित करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार सदर नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे / फर्निचर खरेदीकामीची पुढील कार्यवाही देखील चालू आहे.

परंतु नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर कार्यान्वित केल्यानंतर रुग्णांचे संख्येत जवळपास साधारणत: ५०० ते ६०० शस्त्रक्रियेचे संख्येत वाढ होणार आहे. त्यामुळे वार्षिक मागणीमध्ये कार्डीयाक ऑपरेशन थिएटर साठी लागणारी औषधे /सर्जिकल साहित्य /लॅब केमिकल्स /सुचर्स इ. ची मागणी देखील वाढवावी लागणार आहे. कारण वार्षिक मागणी अंतिम करतेवेळी नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर तयार करण्याचा निर्णय झालेला नव्हता.

तेंव्हा कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने साधारणत: अजून साधारणत: ५०० ते ६०० शस्त्रक्रियेचे संख्येत वाढ हिशोबात धरुन ६०% वाढ सूचविलेली आहे. परंतु कार्डीयाक ऑपरेशन थिएटर कार्डीयाक रिकव्हरी वार्डसाठी लागणारी औषधे /सर्जिकल साहित्य /लॅब केमिकल्स /सुचर्स /

लॅब केमिकल्स/ इजेक्शन इत्यादीचा खप व वार्षिक मागणी पाहून सोबत मागणीची यादी सोबत सादर केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रु.५,५६,९५,९००/- खर्च अपेक्षित आहे. सदरची अतिरिक्त मागणी हि सन २०१०-११ या वर्षातील मंजूर दराने खरेदी करता येईल.

तरी सदरचे अतिरिक्त मागणीस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.५,५६,९५,९००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४७० प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णायातील नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरकरीता अतिरिक्त औषधे / सर्जिकल साहित्य इ.खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,५६,९५,९००/- चे खर्चास मान्यता मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय न.२६ सन २००९-१० या वार्षिक निविदेतील मंजूर दराने Hospital H ५ Lit खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे सर्व वॉर्ड व विभागांकरीता दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या उपरोक्त लिक्वीड करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने M/s. S.P.Distributor, Pune यांना इकडील पत्र क्र. ५४०८ दि. ०५/०५/२००९ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | LIQ.Hospol H 5 LTR (JAR) | P.S.K. | 600 | 190.00 | 114000.00 |
| | | | | Total - | **114000.00** |

त्यानुसार M/s. S.P.Distributor's, Pune यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त लिक्वीडचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदर लिक्वीडचा औषध भांडारात साठा शिल्लक नसून ते दैनंदिन वापरासाठी अत्यंत आवश्यक असते.

सदर लिक्वीडचा दरमहा खप ५० असुन तुर्तास अंदाजे ४ महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | LIQ.Hospol H 5 LTR (JAR) | P.S.K. | 200 | 190.00 | 38000.00 |
| | | | | Total - | **38000.00** |

वरीलप्रमाणे M/s. S.P.Distributor's, Pune यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.३८,०००/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी M/s. S.P.Distributor's, Pune यांचेकडून वरीलप्रमाणे उपरोक्त लिक्वीड २०० नग वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात आले असुन सदर खरेदीकामी रु.३८,०००/- खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र. ४७१ उपरोक्त खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७ हेमोडायनॅमिक रेकॉर्डर सिस्टिमचे ECG cable (५ Lead set) बदलणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कॅथलॅब ओ. टी. विभागात रूग्णांचे अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बी.एम.व्ही. यासारख्या प्रोसिजर्स करताना ECG Monitoring करणेसाठी एक Haemodynamic Recorder System (Model: AXIOM SENSIS Lite System) हे मशिन मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून सन २००६ यावर्षी एकुण रू. १५,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे.

कंपनीने सदर मशीनकरीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. २२/०८/०७ रोजी संपला आहे. वॉरंटी कालावधी संपलेनंतर सदर मशीनसाठी कॅथलॅब मशिनसोबत Comprehensive Maintenance Contract कंपनीकडे करणेत येत आहे. सदर CMC कॉन्ट्रक्टमध्ये कंपनी दोन्ही मशिनचे सर्व Spare Parts बदलून देणार आहे. परंतु कंझ्युमेबल स्पेअर पार्ट हे संस्थानला स्वखर्चाने बदलावे लागणार आहेत.

रूग्णांचे ECG Monitoring करणेसाठी ECG Cable ही Haemodynamic Recorder System ला जोडलेली असते.सदर ECG Cable या कंझ्युमेबल ॲक्सेसरीजचे Trunk Cable व ECG Lead Set हे दोन पार्ट असतात.

सन २००८-२००९ मध्ये अंदाजे एकुण ४५०० पेशंटवर विविध प्रोसिजर्स झालेल्या आहेत. या कालावधीमध्ये ECG Lead Set खराब झाल्यामुळे कंपनीने दि.०२/०५/०८ रोजी बदलली आहे. तसेच सन

२००९-२०१० मध्ये अंदाजे एकुण ४७७५ पेशंटवर विविध प्रोसिजर्स झालेल्या आहेत. या कालावधीमध्ये पुन्हा एकदा ECG Lead Set खराब झाल्यामुळे कंपनीने दि.२३/०१/०९ रोजी बदलली आहे.

सध्या दि. १०/०२/२०१० रोजी कॅथलॅब विभागाने ECG Cable पुन्हा एकदा खराब झाल्याचे कळविले आहे.त्याकरीता कंपनीकडे संपर्क साधला असता कंपनीने दि.३१/०१/२००९ रोजीचे ईमेल द्वारे कळविले आहे की , ' यापूर्वी दोन वेळेस कंपनीने सदर ECG Lead Set सदिच्छेने मोफत बदलून दिलेले आहेत. परंतू यापुढे सदर केबल खराब झाल्यास मोफत बदलून देण्यात येणार नाही.'

कंपनी इंजिनीअरने सदर ECG Lead Set ची तपासणी करून त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट अन्वये सदर केबल व्यवस्थित न हाताळल्यामुळे खराब झाल्याचे सांगितले आहे.तसेच ECG Lead Set साठी कंपनीने सर्व करांसहीत एकूण रू. ४९,०२६/-इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे.सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. Haemodynamic Recorder System चे स्पेअर पार्ट हे मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी Haemodynamic Recorder System चे ECG Cable (५ Lead Set) मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून बदलून घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकूण रू. ४९,०२६/-चे खर्चास आणि सदर रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४७२ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Haemodynamic Recorder System चे ECG Cable (५ Lead Set) मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून बदलून घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकूण रू. ४९,०२६/-चे खर्चास आणि सदर रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये वाढीव ऑक्सीजन पाईप लाईनचे कामाबाबत.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक शस्त्रक्रियेची संख्या सतत वाढतच असल्याने सध्या रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी कमीत कमी ३ महिने पर्यंत प्रतिक्षा करावी लागते. या सर्व बाबींचा विचार करीता श्री साईबाबा रुग्णालयात आणखी एक ऑपरेशन थिएटर लवकरात लवकर सध्याचे ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर विभागात कार्यान्वित करणे, श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर, ओ.पी.डी., ई.एन.टी. ऑपरेशन थिएटर इत्यादी कार्यान्वीत करण्यासाठी लागणाऱ्या सर्व मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट/ फर्निचर इत्यादी खरेदी करण्याचे सर्व अधिकार वैद्यकिय संचालक व स्थानिक विश्वस्ताचे समितीस दि.०६/०३/२०१० चे मा. व्यवस्थापन समिती सभेत प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक आसणाऱ्या मशिनरी / उपकरणे / इन्स्ट्रुमेंट/ फर्निचर इ. ची कामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१७.०४.२०१० अखेर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरचे कार्डीयाक ओ.टी.मध्ये सहा ते आठ खाटांचे रिकव्हरी वार्ड तयार करावयाचे आहे.त्यामुळे तेथे ऑक्सीजन, सक्शन, एयर कॉम्प्रेसर इ. चे पॉईंट प्रत्येक खाटाजवळ बसवावे लागणार आहे. त्यासाठी सध्याच्या ऑक्सीजन पाईप लाईनमध्ये वाढीव काम करुन घ्यावे लागणार आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १९.०९.२००९ चे सभेतील निर्णयानुसार रु.११,४७,४१९.४७ इतक्या रकमेचा कार्यादेश जाम्बोटकर मेडीक्वीप प्राय. लि. मुंबई यांना आदेश देण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे त्यांनी नुकतेच काम देखील पूर्ण केलेले आहे. त्यांचेकडून प्रत्याक्षात मोजमापे घेण्यात आलेले असून त्यासाठी लागणारे मटेरियल व अंदाजे खर्चाची माहिती घेण्यात आलेली आहे. त्यांनी दिलेल्या मटेरियल व दरानुसार सदरचे वाढीव कामासाठी अंदाजे रु.१,५०,००० /- खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे वाढीव काम करुन घेणेकामी विहित पध्दतीने कोटेशन मागविणे व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,००० /- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४७३ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये वाढीव ऑक्सीजन पाईप लाईनचे वाढीव काम करुन घेणेकामी विहित पध्दतीने कोटेशन मागविणे व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,००० /- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन नष्ट करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे लिनन विभागाकडे जमा झाले आहेत. सदरचे लिनन हे २००८ साली खरेदी करण्यात आलेले असुन त्यास आता दोन वर्षाचा कालावधी झालेला आहे त्यामुळे ते वापरुन खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक २६/०९/२००९ च्या मंजुर टिपणीअन्वये सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन नष्ट केलेले आहे. दिनांक २७/०९/२००९ पासुन विविध वॉर्ड/ विभागातुन निकामी लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.१,४२,४०४/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्या परिस्थितीत त्याची किंमत शुल्क आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टर मधुन निर्लेखीत करणे गरजेचे आहे. सध्या सदरचे लिनन हे जाळून नष्ट करण्यात आलेले आहे.

माहितीसाठी व नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र. ४७४ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन वॉर्डमधील स्टॉक रजिष्टरमधुन निर्लेखीत करणेस मान्यता देण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षीका)

---

**विषय नं.३० श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी कोटेशन्स मागविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णायातील लिननचा साठा संपत आल्याने रु.५,७६,६००/- इतक्या रकमेचे नवीन लिनन खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २७/०१/२०१० चे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले होते, त्यानुसार सदरचे खरेदीकामी महाराष्ट्र टाइम्स,मुंबई व इंडियन एक्सप्रेस,मुंबई या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक १२/०३/२०१० अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील सदरची जाहिरात देण्यात आली होती. तसेच खालील पुरवठाधारक यांना देखील जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

१- मे.आदिनाथ टेक्सटाईल मील,सुरत २- मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे ३-मे.जगदगुरु कलेक्शन, येवला ४- मे. मोता गारमेंट,बारामती ५- मे. सारडा इंटेरियर,अहमदनगर ६-मे. बजाज हॅन्डलुम इंडस्ट्री, पानिपत.

परंतु जाहिरातीस अनुसरुन मे.वेदांत एंटरप्रायजेस,सोलापुर यांची एकमेव निविदा प्राप्त झाली आहे, आपणास कमीत कमी तिन निविदा आवश्यक असल्याने उपरोक्त पुरवठाधारकांना पुन्हा पत्र देऊन कोटेशन मागवता येईल असे मत आहे.

उपरोक्त खरेदीमध्ये एकुण ११०० नग बेडशीटचा समावेश होता परंतु आता सदर बेडशीट हे मे.बजाज हॅन्डलुम इंडस्ट्रि, पानिपत यांचेकडुन खरेदी करण्यात आल्यामुळे सदर बेडशीटची होणारी अंदाजे रक्कम रु.१,२१,५००/-वजा जाता उर्वरीत लिनन खरेदीकामी अंदाजे रु.४,५५,१००/-इतकाच खर्च येईल तेव्हा सदरचे लिनन खरेदीकामी फेरकोटेशन मागवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४७५ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी फेरकोटेशन्स मागविण्यात यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाची सन २०१०-११ वार्षिक कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील सर्व वार्ड / विभागात दैनंदिन वापरासाठी कार्यालयीन स्टेशनरी लागत असते. यापूर्वी खरेदी केलेली स्टेशनरी सध्या संपत आलेली असून दैनंदिन कार्यालयीन कामकाजात स्टेशनरी कमी पडू नये म्हणून पुढील वर्षाची सन २०१०-११ वार्षिक कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकरणे गरजेचे आहे. त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणाऱ्या अंदाजे स्टेशनरीची मागणी तयार केलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशिल | कंपनी | श्री साईबाबा हॉस्पिटल खरेदी नग | श्री साईनाथ रुग्णालय खरेदी नग | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय एकुण खरेदी नग | अंदाजे किंमत प्रति नग | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मार्कर पेन (मोठी साईज रंग काळा) | कॅमल / कोरेस | २४ नग | - | २४ नग | २५.०० | ६००.०० |
| २ | सी.डी. मार्कर पेन (लहान पॉईंट रंग काळा) | कॅमल / कोरेस | १०० नग | - | १०० नग | २०.०० | १२००.०० |
| ३ | एच.बी.पेन्सील (एका पॅकेटमध्ये १० नग) | नटराज - ६२१ | २०० नग | - | २०० नग | ३५.०० | ३५००.०० |
| ४ | खोडरबर लहान | नटराज - ६२१ प्लास्टो | ५० नग | - | ५० नग | २.०० | १००.०० |
| ६ | स्टॅपलर पीन लहान | कांगारु | १००० पॅकेट | १०० पॅकेट | ११०० पॅकेट | ५.०० | ५०००.०० |
| ७ | स्टॅपलर पीन मोठी | कांगारु | - | २० पॅकेट | २० पॅकेट | ८.०० | १६०.०० |
| ८ | व्हाईटनर पेन - १० ml | कॅमल / कोरेस | ५० नग | ०६ नग | ५६ नग | २५.०० | १४००.०० |
| ९ | रबर बॅण्ड - २ इंच | STANDARD | ५ किलो | - | ५ किलो | १५५.०० | ७७५.०० |
| १० | रबर बॅण्ड - ४ इंच | STANDARD | ३ किलो | - | ३ किलो | १५५.०० | ४६५.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | २ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रजत / ओसवाल | १२० नग | १० नग | १३० नग | ४५.०० | ५८५०.०० |
| १२ | ५ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रजत/ओसवाल | ९६ नग | १० नग | १०६ नग | ९०.०० | ९५४०.०० |
| १३ | स्टॅम्प पॅड इंक निळी बाटली २५ml | कॅमल / कोरेस | २४ नग | १५ नग | ३९ नग | १५.०० | ५८५.०० |
| १४ | स्टॅपलर लहान ( नं - १० ) | कांगारु | १२ नग | ०६ नग | १८ नग | २५.०० | ४५०.०० |
| १५ | स्टॅपलर मोठे (नं. ५५५) | कांगारु | १२ नग | ०६ नग | १८ नग | ७०.०० | १२६०.०० |
| १६ | टिस्को टेप | | ३६ नग | | ३६ नग | १५.०० | ५४०.०० |
| १७ | खाका टेप - २ इंच | | १०० नग | - | ६० नग | २०.०० | १२००.०० |
| १८ | पिन कुशन | | २४ नग | - | २४ नग | २०.०० | ४८०.०० |
| १९ | डिंक बाटली ३०० ml | कॅमल | २५ नग | - | २५ नग | ६०.०० | ७२०.०० |
| २० | डिंक बाटली ७०० ml | कॅमल | २५ नग | - | २५ नग | ९०.०० | १०८०.०० |
| २१ | बॉक्स फाईल (लॅमिनेशनसह) | JYOTI/STANDARD | ३०० नग | - | ३०० नग | १००.०० | २०,०००.०० |
| २२ | झेरॉक्स पेपर लिगल ३४५ mm x २१५ mm (FS) ७० Gsm मॅपलिथो | (जे. के. कॉपीयर) लाल रंगात पॅकींग | ५०० रिम | ३० रिम | ५३० रिम | १७०.०० | ९०,१००.०० |
| २३ | झेरॉक्स पेपर २९७ mm x २१० mm (A४ साईज) ७० Gsm मॅपलिथो | (जे. के. कॉपीयर) हिरव्या रंगात पॅकींग | ३०० रिम | २० रिम | ३२० रिम | १४०.०० | ४४,८००.०० |
| २४ | स्टॅम्प पॅड इंक (निळा रंग, २५ml.) | कॅमल / कोरेस | ३६ नग | - | ३६ नग | १५.०० | ५४०.०० |
| २५ | OPC DRUM FOR RICOH XEROX MACHIN NO. २०२० D | RICOH | ०२ नग | - | ०२ नग | ३५००.०० | ७,०००.०० |
| २६ | OPC DEVEPLOER FOR RICOH XEROX MACHIN NO. २०२० D | RICOH | ०२ नग | - | ०२ नग | २८००.०० | ५६००.०० |
| २७ | TONNER FOR RICOH XEROX MACHINE NO. २०२० D | RICOH- १२३० D, CODE NO. ८८८२१६ | १८ नग | - | १८ नग | २०००.०० | ३६,०००.०० |
| २८ | हाफ बॉक्स फाईल | | ५० नग | - | ५० नग | ४०.०० | २,०००.०० |
| २९ | फोर फ्लॅप पॅड | | १०० नग | - | १०० नग | ६०.०० | ६,०००.०० |
| ३० | निळी कार्बन बॉक्स २१०mm x ३३०mm | कॅमल IMPRESS | - | १० नग | १० नग | १२५.०० | १२५०.०० |
| ३१ | डबल साईड कार्बन बॉक्स काळी२१०mmx३३०mm | कॅमल IMPRESS | - | ०६ नग | ०६ नग | १५०.०० | ९००.०० |
| ३२ | प्लॅस्टीक पट्टी | कॅमल / कोरेस | - | ०६ नग | ०६ नग | १०.०० | ६०.०० |
| ३३ | टाचणी (६० Gm. पॅकेट) | कोरेस | - | ३० बॉक्स | ३० बॉक्स | २०.०० | ६००.०० |
| ३४ | १ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रजत / ओसवाल | - | १० नग | १० नग | २५.०० | २५०.०० |
| ३५ | ३ कॉयर रजिष्टर (फुल साईज) | रजत / ओसवाल | - | १० नग | १० नग | ५५.०० | ५५०.०० |
| ३६ | हजेरी मस्टर (२ कॉयर) | रजत / ओसवाल | - | १० नग | १० नग | १२०.०० | १२००.०० |
| ३७ | स्टॅम्प पॅड मोठी साईज | कॅमल | - | १० नग | १० नग | ५०.०० | ५००.०० |
| ३८ | पॅकिंग पट्टी | | १० किलो | - | १० किलो | १५०.०० | १५००.०० |
| ३९ | पॅकिंग क्लिप लोखंडी | | १० किलो | - | १० किलो | १००.०० | १०००.०० |
| | | | | | | **एकूण रक्कम रुपये** | **२,५४,९३०.००** |

उपरोक्तप्रमाणे कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजे रु. २,५४,९३० /- (अक्षरी रु.दोन लाख चोपन्न हजार नऊशे तीस ) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे खरेदी कामी येणाऱ्या अंदाजे रु. २,५४,९३० /- चे खर्चास व विहीत पध्दतीने खरेदी करुन घेणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र. ४७६ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाची सन २०१०-११ वार्षिक कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,५४,९३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२ तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग व प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरीयल, औषधे, केमीकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरीयल पुणे व नाशिक येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे / सर्जिकल साहित्य / केमीकल्स आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. कारण वार्षिक औषधे

खरेदीमधील औषधे उपलब्ध होणेस अजून २-३ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे सन २००९-१० या वर्षातील मंजूर दराने अतिरिक्त खरेदीचा रु. ९८,७८,३१३/- चा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नसल्याने तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी रु.८२,०७५/- मात्र खर्च आलेला आहे.

सदरची खरेदी ही माहे- मार्चमध्ये केलेली असून ती सन २००८- ०९ व २००९-१० या वर्षातील मंजूर दरानेच खरेदी केलेली आहे, त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Chemox Enterprises, Nashik | 815 | 01/03/2010 | 2912.00 |
| 2 | Yoga Enterprises, Pune | 2761 | 10/03/2010 | 12000.00 |
| 3 | Tirupati Enterprises, Pune | 1198 | 17/03/2010 | 8398.00 |
| 4 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 20587 | 18/03/2010 | 5062.00 |
| 5 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 20586 | 18/03/2010 | 5906.00 |
| 6 | Critical Care System, Pune | 3177 | 19/03/2010 | 10143.00 |
| 7 | Critical Care System, Pune | 3239 | 25/03/2010 | 1654.00 |
| 8 | Yoga Enterprises, Pune | 2896 | 25/03/2010 | 36000.00 |
| | **Total Amount in Rs.-** | | | **82075.00** |

Partywise Bill Summery

| Sr. No. | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Chemox Enterprises,Nashik | 2912.00 |
| 2 | Critical Care System, Pune | 11797.00 |
| 3 | Mahesh Surgical & Pharmaceuticals,Pune | 10968.00 |
| 4 | Tirupati Enterprises, Pune | 8398.00 |
| 5 | Yoga Enterprises, Pune | 48000.00 |
| | **Total Amount in Rs.-** | **82075.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.८२,०७५/- (रु. ब्याऐंशी हजार पंच्याहत्तर मात्र) खर्च आलेला आहे. सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र. ४७७ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३ श्री खैराद रविनाथ शामराव, नंदूरबार यांचे वैद्यकीय अर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**

**प्रस्ताव -** श्री खैराद रविनाथ शामराव,रा.नंदुरबार यांनी त्यांचा मुलगा चि.जिग्नेश याचे वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत संस्थानकडे अर्ज केलेला असुन सदरचा अर्ज दि.२३/०४/२०१० रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे दिलेली नाहीत.

चि.जिग्नेश हा Cochlear Implant या विकाराने आजारी असुन त्याचेवर P.D.Hinduja National Hospital & Medical Research Centre, Mumbai या रूग्णालयात दि.२९/०६/२०१० रोजी शस्त्रक्रिया करणार आहेत. त्यासाठी रु.५,३८,०००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र संबधीत रूग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार चि.जिग्नेश याच्या आजारासाठी अनुदान देता येत नाही.असे त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/६६४१/२०१० दि.२८/०४/२०१० अन्वये दिलगीरी पत्र देण्यात आलेले आहे.

चि.जिग्नेश यांस अनुदान देणेबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी दुरध्वनीव्दारे सुचना केलेली असुन सदरचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत कळविलेले आहे.

महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी दि.०५/०५/२००६ चे पत्रान्वये संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान योजणेस मान्यता दिलेली असून त्यामध्ये वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००५ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.१६, निर्णय क्र. ६६५ अन्वये फक्त संस्थान वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत बसणारे अर्ज परस्पर मा. कार्यकारी अधिकारी यांनी मान्य करावेत. नियमावलीत न बसणारे अर्ज मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत येऊ नयेत असे ठरलेले आहे.

**निर्णय क्र. ४७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. खैराद रविनाथ शामराव, रा.नंदुरबार यांनी त्यांचा मुलगा चि.जिग्नेश याचे वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४ कनकुरी साठवण तलावावरील १०० केव्हीए जनसेट दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव -** संस्थानचे कनकुरी साठवण तलावावर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.चा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी वीजपुरवठयासाठी १०० केव्हीए क्षमतेचा कमिन्स डिझेल इंजिन क्र.२५१५४५१४ मॉडेल एनटीए-४९५ जी पॉवरींग स्टँडबाय डिझेल जनरेटरसेट बसविण्यात आलेला आहे. कनकुरी हद्दीमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे दररोज १० ते १२ तासाचे भारनियमन असून त्यात कधीकधी इर्मजन्सी लोड शेडींग होत असते. त्यामुळे जनरेटर दररोज पाणीपुरवठयाकामी १४ ते १६ तास चालतो. या जनसेटला २३ वर्ष झाले असून एकदाही मेजर ओव्हरहॉलींग केलेले नव्हते. दिनांक २२-०४-२०१० रोजी जनरेटर चालू असतांना सकाळी ६.०० वाजता बंद पडल्यामुळे कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांना फोन केला व त्यानुसार त्यांचे इंजिनिअरने आल्यानंतर सदर जनरेटरसेट चेक करुन १०० केव्हीए जनरेटर हा २३ वर्षे पूर्वीचा असल्याने व सततच्या वापराने नादुरुस्त झालेला आहे. म्हणून जनरेटरचे मेजर ओव्हरहॉलींग करीता (दुरुस्ती) मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांचे औरंगाबाद येथील कार्यशाळेत नेऊन तातडीने दुरुस्तीसाठी नेणे गरजेचे असल्याचे सांगितले. त्याकरीता १० ते १५ दिवसाचा कालावधी लागेल असे सांगितले. मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी प्रत्यक्ष साठवण तलावावरील कामाच्या ठिकाणी तातडीने भेट देऊन पर्यायी व्यवस्थेकरीता भाडोत्री जनरेटर लावणे व नादुरुस्त जनरेटर त्वरीत दुरुस्तीसाठी पाठविणे याबाबत कार्यवाही करण्यास सांगितले. त्यानुसार कार्यवाही चालू केली. सदर जनरेटरसेट तातडीने दुरुस्त करणे गरजेचे असल्याने औरंगाबाद येथील कार्यशाळेमध्ये पाठविण्यात आलेला आहे.

जनरेटर औरंगाबाद येथे दुरुस्तीसाठी पाठविण्यात आल्याने उन्हाळयाच्या दिवसामध्ये पाणीपुरवठयात व्यत्यय येऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्थेकामी नाशिक येथील भाडोत्री जनरेटर तातडीने बोलावून घेऊन दिनांक २२-०४-२०१० रोजी दुपारी २.०० वाजता जनरेटर चालू करुन घेऊन पाणीपुरवठा सुरळीत चालू करुन घेतला.

तरी वरीलप्रमाणे साठवण तलाव १०० केव्हीए जनरेटर व इंजिन यांचे मेजर ओव्हरहॉलींग करुन घेण्यास रक्कम रु. ४१,२००/- + रु. १,९४,८२७/- मिळून एकुण रक्कम रुपये २,३६,०२७/- इतक्या खर्चाचे कोटेशन मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांचे औरंगाबाद यांनी सादर केले आहे.

तसेच याकाळामध्ये पाणीपुरवठा सुरळीत चालू राहावा यासाठी भाडोत्री जनरेटरची व्यवस्था करणे गरजेचे होते. त्यानुसार यापुर्वी भाडोत्री जनरेटर पुरविणेकामी मान्य दरानुसार प्रति दिन रु. ७,५००/- + रु. २,०००/- ट्रान्सपोर्ट चार्जेस असा संदर्भ क्र.०३ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. म्हणून प्रति दिन रु. ७,५००/- x १५ दिवस = एकुण रक्कम रु. १,१२,५००/- + ट्रान्सपोर्ट चार्जेस रु. २,०००/- मिळून रक्कम रु.१,१४,५००/- इतका खर्च भाडोत्री जनरेटर साठी आहे.

तरी साठवण तलावावरील १०० केव्हीए जनरेटरसेटचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस यांचे औरंगाबाद यांचेकडून करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,३६,०२७/- + भाडोत्री जनरेटर लावणेकामी येणा-या रक्कम रु.१,१४,५००/- मिळून रक्कम रु.३,५०,५२७/- इतका खर्च येणार आहे. प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४७९ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कनकुरी साठवण तलावावरील १०० केव्हीए जनसेट दुरुस्ती कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,३६,०२७/- + भाडोत्री जनरेटर लावणेकामी येणा-या रक्कम रु.१,१४,५००/- मिळून रक्कम रु.३,५०,५२७/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३५ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ग्रील बसविणे बाबत**

**प्रस्ताव -** दिनांक ०७-०४-२०१० रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्री साईनाथ हॉस्पीटलकडे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता सुरक्षिततेच्या दृष्टीने हॉस्पीटलमधील जिन्यामध्ये (तळमाळा ते टेरेसपर्यंत) ग्राऊंड फ्लोअर पासून टेरेसपर्यंत एम.एस.बार चे ग्रील तयार करुन बसवावे लागणार आहे. त्यानुसार सदरील ग्रील स्थानिक फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागवून तयार करुन बसवून घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.ॲंगल,<br>साईज :- ४० x ४० x ५ एम.एम. | ६०० कि.ग्रॅ. | रु. ४५.००<br>(प्रति कि.ग्रॅ.) | ५८,५००.०० |
| ०२) | एम.एस.स्क्वेअर बार,<br>साईज :- १० एम.एम. | १३०० कि.ग्रॅ. | रु. ४५.००<br>(प्रति कि.ग्रॅ.) | २७,०००.०० |

| | |
|---|---|
| एकुण :- | ८५,५००.०० |
| वॅट १२.५% | १०,६८८.०० |
| रक्कम :- | ९६,१८८.०० |
| लेबर+ट्रान्सपोर्ट चार्जेस ४०% मजुरी | ३८,४७५.०० |
| एकुण रक्कम :- | १,३४,६६३.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलकडील जिन्यामध्ये ग्रील तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,३४,६६३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४८० प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलकडील जिन्यामध्ये ग्रील तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,३४,६६३/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३६ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता चॅनेल (कोलॅप्सीबल गेट ) गेट तयार करुन बसविणे बाबत**

**प्रस्ताव -** दिनांक ०७-०४-२०१० रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्री साईनाथ हॉस्पीटलकडे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारत क्र.०२, पश्चिम बाजू जिन्यामध्ये प्रत्येक माळयावर कोलॅप्सीबल गेट बसवून देण्याचे ठरले आहे. त्यानुसार सदरील कॉलेप्सीबल गेट स्थानिक फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन बसवून घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविणे, साईज :- ६`x८` (०२ नग) | ९६ स्क्वेअर फूट | रु. २०५.०० (प्रति स्क्वे.फूट) | रु. १९,६८०.०० |
| ०२) | कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविणे, साईज :- ६`x११` (०१ नग) | ६६ स्क्वेअर फूट | रु. २०५.०० (प्रति स्क्वे.फूट) | रु. १३,५३०.०० |
| ०३) | कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविणे, साईज :- ८`x८` (०१ नग) | ६४ स्क्वेअर फूट | रु. २०५.०० (प्रति स्क्वे.फूट) | रु. १३,१२०.०० |
| | | | एकुण :- | रु. ४६,३३०.०० |
| | | | वॅट १२.५% | रु. ०५,७९१.०० |
| | | | एकुण रक्कम | रु. ५२,१२१.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ५२,१२१/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४८१ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कॉलेप्सीबल गेट तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५२,१२१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३७ श्री साईनाथ रुग्णालय बील भरणा, गोळया, औषधे वाटप व ओ.पी.डी केसपेपर येथे स्टेनलेस स्टिल रेलिंग तयार करणे बाबत.**

**प्रस्ताव -** उपरोक्त संदर्भीय विषयान्वये बील भरणा विभाग, औषध गोळया वाटप कक्ष, ओ.पी.डी. केसपेपर विभाग याठिकाणी नेहमी रुग्णांची गर्दी असते. गर्दीचे नियोजनाकरीता श्री साईनाथ रुग्णालयाने स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन मिळणेकामी मागणी केलेली आहे.

त्यानुसार सदरील स्टेनलेस स्टील रेलींगचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप, साईज :- ५० mm x १६ गेज | ४५० फूट | २०९.००(प्रति फूट) | ९४,०५०.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप, साईज :- २५mm x १६ गेज | ७५० फूट | ११०.०० (प्रति फूट) | ८२,५००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील U बेंड, साईज:-२५ एम.एम. | १२० नग. | ५५०.००(प्रति नग) | ६६,०००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील ९०° (काटकोनी) बेन्ड, साईज :- ५० एम.एम. | ०३० नग. | २२०.०० (प्रति नग) | ६,६००.०० |
| ०५) | कव्हर फ्लँज | ०४५ नग. | २२०.०० (प्रति नग) | ९,९००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६) | फ्लँज | ०४५ नग. | १३२.००<br>(प्रति नग) | ५,९४०.०० |
| ०७) | ग्राऊंटींग पाईप | ०४५ नग. | ५५०.००<br>(प्रति नग) | २४,७५०.०० |
| एकुण :-<br>वॅट १२.५% | | | | २,८९,७४०.००<br>३६,२१७.५० |
| रक्कम :-<br>लेबर + ट्रान्सपोर्ट चार्जेस ५०% मजुरी | | | | ३,२५,५९५.५०<br>१,६२,९७८.७५ |
| एकुण रक्कम :- | | | | ४,८८,९३६.२५ |
| **पुर्णांकित रक्कम :-** | | | | **४,८८,९३६.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकडे स्टेनलेस स्टील रेलींग बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,८८,९३६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४८२ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकडे स्टेनलेस स्टील रेलींग बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,८८,९३६/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३८ नवीन भक्तनिवासस्थान येथील रुममधील इलेक्ट्रीकल मेंटेनन्स करणेबाबत**

**प्रस्ताव -** मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे दिनांक २२-०३-२०१० रोजी राऊंड घेऊन कामाची पाहणी केली. सदर राऊंडच्या वेळी भक्तनिवासस्थान कार्यालयाच्या समोरील कॅनोपीमध्ये भक्तांच्या मोबाईल चार्जिगची सुविधा केलेली असल्याने व रुममध्ये मोबाईल चार्जिगची सुविधा उपलब्ध नसल्याने भक्तांची गर्दी जास्त प्रमाणावर झालेली होती. त्याकरीता सर्व रुममध्येच मोबाईल चार्जिग करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात यावी, जेणेकरुन भक्तांचे मोबाईल चोरीला जाण्याचे प्रमाण कमी होईल, अशी सुचना मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केली. तसेच सदरच्या राऊंडमध्ये सर्व रुममधील स्वीच बोर्डची जागा बदलून नविन ठिकाणी स्वीच बोर्ड बसवून सर्व प्लग, स्वीच नविन बसवून घेण्याची सुचना केलेली आहे. परंतू सदर रुममधील वायरींग ही कन्सिल्ड असल्याने स्वीच बोर्ड नविन जागेमध्ये हलविण्याकरीता भिंतीला पाईपच्या मापाची झरी घ्यावी लागेल. त्यानंतर पाईप कन्सिल्ड करुन झाल्यानंतर झरी बुजवून त्यावर कलर दयावा लागेल. सदरचे काम वेळखाऊ व खर्चीक असल्याने आहे त्याच जागेवर स्वीच बोर्ड ठेवून त्यावरील सर्व स्वीच व सॉकेट नविन बसविता येईल.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणेसाठी विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-7-2 | Supplying & erecting One/Two way piano type ISI mark switch. | 3500 Nos. | 030.45 | 1,06,575.00 |
| 02) | 2-7-10 | Supplying and erecting electronic type 600 W. dimmer. | 835 Nos. | 141.75 | 1,18,361.25 |
| 03) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A/10A. | 350 Nos. | 090.30 | 0,31,605.00 |
| 04) | 1-8-13 | Supplying and Erecting modular type 3 pin 6A socket | 050 Nos. | 107.10 | 0,05,355.00 |
| 05) | 1-8-25 | Supplying and Erecting modular type electronic 600W two module | 025 Nos. | 362.25 | 0,09,056.25 |
| 06) | 1-8-35 | Supplying and Erecting PVC Surface 6 modular switch box | 010 Nos. | 197.40 | 0,01,974.00 |
| 07) | 1-8-36 | Supplying and Erecting PVC Surface 8 modular switch box | 010 Nos. | 245.70 | 0,02,457.00 |
| 08) | 1-8-37 | Supplying and Erecting PVC Surface 12 modular switch box | 030 Nos. | 305.55 | 0,09,166.50 |
| 09) | NON C.S.R. | Supplying and Erecting PVC Surface 18 modular switch box | 010 Nos. | 331.80 | 0,03,318.00 |
| 10) | NON C.S.R. | Supplying and Erecting ISI mark recess type 6A /5 pin plug | 550 Nos. | 073.50 | 0,40,425.00 |
| 11) | NON C.S.R. | Supplying, Erecting and noteing concealed type 4”x6” 4 mm thick white Acrylic plate | 011 Nos. | 070.00 | 0,00,770.00 |
| 12) | NON | Supplying, Erecting and noteing | 61 | 075.00 | 0,04,575.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | C.S.R. | concealed type 6"x6" & 4mm thick white Acrylic plate | | | |
| 13) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 6"x8" & 4mm thick white Acrylic plate | 10 | 080.00 | 0,00,800.00 |
| 14) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 8"x10" & 4mm thick white Acrylic plate | 250 | 090.00 | 0,22,500.00 |
| 15) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 10"x10" & 4mm thick white Acrylic plate | 225 | 100.00 | 0,22,500.00 |
| 16) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 12"x12" & 4mm thick white Acrylic plate | 15 | 160.00 | 0,02,400.00 |
| 17) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 18"x18" & 4mm thick white Acrylic plate | 5 | 170.00 | 0,00,850.00 |
| 18) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 12"x18" & 4mm thick white Acrylic plate | 25 | 180.00 | 0,04,500.00 |
| 19) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 12"x24" & 4mm thick white Acrylic plate | 5 | 190.00 | 0,00,950.00 |
| 20) | NON C.S.R. | Supplying, Erecting and notehing concealed type 18"x30" & 4mm thick white Acrylic plate | 3 | 215.00 | 0,00,645.00 |
| | | | | **Total :-** | **3,78,783.00** |
| | | | | +Contigency 5% | 0,19,439.15 |
| | | | | Total Amount :- | 4,08,222.15 |
| | | | | **Round up :-** | **4,08,222.00** |

उपरोक्तप्रमाणे वायरींग काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,०८,२२२.०० इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४८३ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नवीन भक्तनिवासस्थान येथील रुममधील इलेक्ट्रीकल वायरींग काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,०८,२२२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३९ साईनगर / श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जनरेटरसेटच्या अल्टनेटरची बेअरींग बदलविण्यासाठी तेथे दुसरा जनरेटर बसविणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव -** साईनगर/ श्री साईबाबा हॉस्पीटल करीता ५०० केव्हीएचा जनरेटरसेट बसविण्यात आलेला आहे. सदर जनरेटरसेटची बेअरींग आवाज देत असल्याने जनरेसेटचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिलेले कंपनीचे अधिकृत सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांनी चेक केली असता ती तातडीने बदलावी लागेल असे त्यांचे इंजिनिअरने सांगितले. याकामास विलंब झाल्यास जनरेटसेट अल्टरनेटरची बेअरींग खराब होऊन जनरेटर बंद पडू शकतो. म्हणून त्याकरीता येणा-या अनुषंगिक खर्चाकरीता संदर्भ क्र.०१ नुसार विद्युत विभागामार्फत टिपणी सादर केली. याकामी भाडोत्री जनरेटर कामी संदर्भ क्र.०२ अन्वये रुपये २,१२,३०६/- इतका खर्च येईल असे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांनी कळविले होते. त्यानुसार संदर्भ क्र०४ नुसार दिनांक १८-०३-२०१० रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मिटींग आयोजित केली होती. त्यामध्ये उप कार्यकारी अधिकारी साहेब, विद्युत विभाग प्रमुख, वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल व मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स, नाशिकचे श्री.जाधव इत्यादि हजर होते.

या चर्चेत असे ठरले की, साईआश्रम करीता खरेदी करण्यात येणा-या जनरेटरपैकी एक जनरेटर साईनगर येथे उतरुन घेणे व तो जनरेटर बेअरींग खराब झालेल्या जनरेटरसेटच्या जागी बसविणे व तेथील जनरेटर बाहेर घेणे, ही कामे आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचेकडून कोटेशन घेऊन त्यांचेमार्फत तातडीने नवीन जनरेटर बसवून घ्यावा, असे ठरले. त्यानुसार मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी जुना जनसेट बाहेर काढण्यासाठी क्रेन, नवहानी (खलाशी) बाहेरुन भाडयाने आणावे लागतील व त्यासाठी रु.१०,०००/- इतका खर्च येईल म्हणून सांगितले. त्यानुसार त्यांना मा.वैद्यकिय संचालक यांचे समवेत झालेल्या चर्चेअंती

रविवार दि.२०-०३-२०१० रोजी रुग्णालयास सुट्टी असल्याने शनिवारी सायं ५.००वाजता काम करण्यास सांगितले व संदर्भ क्र.०३ नुसार वैद्यकीय संचालक यांना त्याविषयी कळविले.

दिनांक २०-०३-२०१० वार-शनिवार रोजी सायंकाळी ५.०० वाजण्यापुर्वी मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी नविन जनरेटर बसविण्यासाठी व जुना जनरेटर बाहेर काढण्यासाठी लागणारे अनुषंगिक साहित्य व कर्मचारी (क्रेन, जड बोजा उचलणारे कर्मचारी, फळया, दोर, बेल्ट, नटबोल्ट, पहारी इ.) तयार ठेवले. नाशिक येथून जनसेटचे सर्व्हिस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस यांचे इंजिनिअर व ए.एम.एफ.पॅनेल बनविणारे मे.पॉवरिका यांचेही इंजिनिअर त्याठिकाणी ५.०० वाजण्यापूर्वी हजर झाले. यानुसार विद्युत विभागामार्फत नियोजन करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा सप्लाय आल्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता प्रत्यक्ष कामास सुरुवात केली. रुग्णालयात अतिदक्षता सारखे महत्त्वाचे भाग असल्याने रुग्णालयातील कोणत्याही भागाचा सप्लाय बंद राहू नये व काम तातडीने पुर्ण व्हावे म्हणून विद्युत विभाग प्रमुख यांचे नियंत्रणाखाली विद्युत पर्यवेक्षक व कर्मचारी यांनी तातडीने केबल कनेक्शन खोलणे व जोडणे, इंधन टाकीचे कनेक्शन काढणे व जोडणे, जनरेटरचे पार्ट खोलणे इ. कामे केली.

मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक, विद्युत विभागातील कर्मचारी व मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक व पॉवरिका इंजिनिअर या सर्वांच्या समन्वयाने काम करुन श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कोणत्याही भागाचा एक सेकंदही सप्लाय बंद न ठेवता पहाटे ५.३० वाजेपर्यंत जुना जनरेटर काढून त्याठिकाणी नविन जनरेटर बसविण्याचे काम पुर्ण केले आहे.

बाहेर काढलेल्या साईनगर / श्री साईबाबा हॉस्पीटल जनरेटरसेटची अल्टरनेटरची बेअरींग बदलविण्यासाठी येणा-या खर्चाकरीता मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स् ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी कोटेशन सादर केले आहे.

तरी साईनगर/ श्री साईबाबा हॉस्पीटल जनरेटरसेटची अल्टरनेटरची बेअरींग बदलविण्यासाठी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून काम करुन घेणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १,१६,८७१.०० इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच साईनगर / श्री साईबाबा हॉस्पीटलचा खराब झालेला जनरेटर बाहेर काढणे व त्याजागी साईआश्रमकरीता आलेला जनरेटर बसविणेचे काम मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी पुर्ण करुन दिलेले आहे. तरी या कामासाठी आलेल्या खर्चास व बीलाची रक्कम रु. १०,०००/- मात्र मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना आदा होणेकामी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४८४ प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईनगर/ श्री साईबाबा हॉस्पीटल जनरेटरसेटची अल्टरनेटरची बेअरींग बदलविण्यासाठी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचेकडून काम करुन घेणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १,१६,८७१/- इतक्या खर्चास तसेच साईनगर / श्री साईबाबा हॉस्पीटलचा खराब झालेला जनरेटर बाहेर काढणे व त्याजागी साईआश्रमकरीता आलेला जनरेटर बसविणेचे काम मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी पुर्ण करुन दिलेले आहे. तरी या कामासाठी आलेल्या खर्चास व बीलाची रक्कम रु. १०,०००/- मात्र मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४०** **ग्रुप मोबाईल सेवेच्या सुविधेची व्याप्ती /कक्षा विस्तारीत करणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे दैनंदिन व्यवस्थापन व कामकाज सुरळीत पार पाडणेसाठी सध्या ३० विभाग मा.कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे प्रभावी नियंत्रण व व्यवस्थापनाखाली कार्यरत आहेत. या सर्व विभागांचे कामकाजात सुसुत्रता यावी, अंतर्गत दळणवळणाचे साधन प्रभावी असावे, कार्यालयीन कामकाजासाठी एकमेकांशी त्वरीत संपर्क साधता यावा बीएसएनएलची पूर्वीची ग्रुपमोबाईल सेवा बंद करुन उपरोक्त संदर्भान्वये आयडिया कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा माहे जुलै, २००९ पासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर ग्रुपमोबाईल सुविधेत एकूण ५० ग्रुपमोबाईल देणेस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. टप्याटप्याने आतापर्यंत ४९ सिमकार्ड पुरविण्यात आलेले आहे.

तथापि, खालील विभागांचे विभाग प्रमुख यांना ग्रुपमोबाईल सेवेत समाविष्ठ करण्यात आलेले नाही.

| अ.नं. | विभागाचे नाव | अ.नं. | विभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मिटींग विभाग | ५ | श्री साईप्रसाद निवासस्थान |
| २ | स्वच्छता विभाग | ६ | खरेदी विभाग |
| ३ | मंदिर विभाग | ७ | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान |
| ४ | व्दारावती भक्तनिवासस्थान | | |

माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक २५/०३/२०१० रोजीचे टिपणीनुसार उपरोक्त विभागाचे विभाग प्रमुख यांना ग्रुपमोबाईल सेवेत संस्थानमार्फत फक्त सिमकार्ड पुरवून ग्रुपमोबाईल सेवेत समाविष्ठ करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

परंतु, पूर्वी मान्यता असलेल्या ५० ग्रुपमोबाईलपैकी ४९ ग्रुपमोबाईल वापरात आहे. त्यापैकी फक्त एक मोबाईल देण्याची सुविधा उपलब्ध आहे. उपरोक्त ०७ विभागांचे विभाग प्रमुख यांना ग्रुपमोबाईल सेवेत समाविष्ठ करणेसाठी ग्रुप मोबाईल सेवेची व्याप्ती / कक्षा ५७ पर्यन्त वाढवावी लागणार आहे. तसेच त्यांचे ग्रुपमोबाईलचे मासिक बिलांपैकी रुपये ३००/- मात्र संस्थानमार्फत अदा करुन, बिलाची उर्वरित रक्कम संबंधीतांचे मासिक पगारातून वसूल करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे ग्रुप मोबाईल सेवेचे प्लॅन सतत बदलत असतात. संस्थानच्या हिताच्या दृष्टीने बदललेल्या सुधारीत प्लॅनमध्ये सुरु असलेली सेवा परावर्तीत करावे लागणार आहे.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे सदर सात विभागांचे विभाग प्रमुख यांना संस्थानमार्फत फक्त ग्रुपमोबाईलचे सिमकार्ड पूरवून ग्रुपमोबाईल सेवेत समाविष्ठ करणेस तसेच ग्रुपमोबाईल सेवेची व्याप्ती / कक्षा ५० वरुन ५७ पर्यन्त वाढविणेस व नियमाप्रमाणे सदर ग्रुपमोबाईलधारकांचे मोबाईलचे मासिक बिलांपैकी रुपये ३००/- मात्र संस्थानमार्फत अदा करुन, बिलाची उर्वरित रक्कम संबंधीतांचे मासिक पगारातून वसूल करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र. ४८५ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सदर सात विभागांचे विभाग प्रमुख यांना संस्थानमार्फत फक्त ग्रुपमोबाईलचे सिमकार्ड पूरवून ग्रुपमोबाईल सेवेत समाविष्ठ करणेस तसेच ग्रुपमोबाईल सेवेची व्याप्ती / कक्षा ५० वरुन ६० पर्यन्त वाढविणेस व नियमाप्रमाणे सदर ग्रुपमोबाईलधारकांचे मोबाईलचे मासिक बिलांपैकी रुपये ३००/- मात्र संस्थानमार्फत अदा करुन, बिलाची उर्वरित रक्कम संबंधीतांचे मासिक पगारातून वसूल करणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी श्री साईबाबा रुग्णालयातील जनसंपर्क व्यवस्थापक श्री.अशोक शंकरराव वाळुंज, स्वागतकक्ष, श्री साईबाबा हॉस्पिटल जनसंपर्क कार्यालय, मध्यवर्ती भांडार (स्टोअर) (वेअरहाऊस ) म्हणजेच एकूण मोबाईल वरुन ६० पर्यत वाढविण्यास मान्यता देण्यात आली. यांचा वरीलप्रमाणे ग्रुप मोबाईल सेवेत समावेश करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- आय.टी. विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४१ टिव्ही चॅनेलवर ऑनलाईन दर्शन - तथा आरती सुविधेचे वार्षिक दर निश्चित करणे बाबत**

**प्रस्ताव -** संस्थानमार्फत संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर, डिश टि.व्ही.वर व मोबाईलवर श्री साईभक्तांना श्रींचे घरबसल्या दर्शन-तथा-आरतीचा लाभ घेणेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. सदर सुविधांप्रमाणेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/०२/२००९ रोजीचे सभेत निर्णय क्र. १२२ नुसार टिव्ही चॅनेलवर दर्शन-तथा आरती सुविधा उपलब्ध करणेस व त्याबदल्यात चॅनेलकडून प्रति वर्षासाठी खालीलप्रमाणे रॉयल्टी घेणेचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रत्येक दिवशी फक्त १ तास लाईव्ह दर्शन | - | रुपये बारा लाख + टॅक्स. |
| २. | प्रत्येक दिवशीच्या चारही आरत्या लाईव्ह दर्शन | - | रुपये पंधरा लाख + टॅक्स. |
| ३. | संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) | - | रुपये वीस लाख + टॅक्स. |

उपरोक्त सुविधांपैकी Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV९) Hyderabad यांनी प्रत्येक दिवशीच्या चारही आरत्या लाईव्ह दर्शन हा प्लॅन स्विकारलेला आहे. सदर सुविधा सुरु करणेकामी त्यांचेशी दिनांक २१ ऑगस्ट, २००९ रोजी एक वर्षाचा करारानामा करण्यात आलेला असून, त्यांचेकडून वार्षिक रॉयल्टी रक्कम रुपये १५ लाख (Exclusive of taxes) घेण्यात येत आहे.

तथापि उपरोक्त पर्याय १ व २ ची सुविधा उपलब्ध करुन देतांना पुरविण्यात येणारे सिग्नल वेळोवेळी चालू बंद करावे लागतात. यामुळे त्यात वेळोवेळी तांत्रिक अडचणी येतात. सदर अडचणी दूर करणेसाठी फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी, असे ध्वनीक्षेपण (सीसीटीव्ही) विभाग प्रमुख यांनी दूरध्वनीव्दारे इकडील विभागास कळविलेले आहे. जेणेकरुन लाईव्ह दर्शन सिग्नल पुरविणे, रॉयल्टी ठरविणे, करारनामे करणे यात सुटसुटीतपणा येऊन, साईभक्तांना लाईव्ह दर्शन सुविधा विनाअडथळा उपलब्ध करुन देता येईल. टिव्ही चॅनेलवर फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या अर्थिक वर्षात सदर सुविधा पुरविणेस इच्छुक असणाऱ्या प्रति चॅनेलकडून सध्याचे रुपये २० लाख शुल्कात २०% वाढ करुन प्रतिवर्षी रुपये चोवीस लाख ((Exclusive of taxes) घेता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे टिव्ही चॅनेलवर पर्याय १ व २ ची सुविधा बंद करुन, फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) विविध चॅनेलमार्फत उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते दिनांक ३१/०३/२०११ या कालावधीत घ्यावयाची रॉयल्टी निश्चित करणेच्या निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र. ४८६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे टिव्ही चॅनेलवर पर्याय १ व २ ची सुविधा बंद करुन, फक्त संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) विविध चॅनेलमार्फत उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यास दिनांक ०१/०४/२०१० ते दिनांक ३१/०३/२०११ या कालावधीत रुपये वीस लाख + टॅक्स रॉयल्टी घेण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ वेबसाईटवरील Live Darshan सुविधे बाबत**

**प्रस्ताव -** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८५६ नुसार संस्थानच्या www.shrisaibabasansthan.org या अधिकृत वेबसाईटवर इंटरनेटव्दारे Tata Communications, Ltd., Mumbai (पूर्वीची VSNL) यांचेमार्फत श्रीसाईबाबांच्या समाधी मंदिराचे व व्दारकामाईचे थेट प्रक्षेपण पाहण्याची सुविधा संस्थानने मोफत सुरु केली आहे. याकामी Tata Communications, Ltd., Mumbai (पूर्वीची VSNL) यांचेशी दिनांक ०१/०१/२००७ पासून पुढे तीन वर्षे कालावधीसाठी करारनामा करण्यात आलेला होता. सदर करारनाम्याची मुदत दिनांक ३१/१२/२००९ रोजी संपलेली असून सदर सुविधा पूर्वीप्रमाणेच सुरु आहे. वेबसाईटवर इंटरनेटव्दारे Live Darshan पाहण्याची सुविधा सुरु ठेवणेसाठी Tata Communications, Ltd., Mumbai (पूर्वीची VSNL) यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्याचे पुढील तीन वर्षांसाठी नूतनिकरण करावे लागणार आहे. अन्यथा सदर सुविधा बंद होईल.

संस्थानच्या वेबसाईटवर Live Darshan सुविधा सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत Vistaas Digital Media Ltd. Mumbai यांनीही त्यांचे दि.०७/१०/२००९ रोजीचे ई-मेलव्दारे प्रस्ताव सादर केला होता. त्यात त्यांनी Live Darshan सुविधा ही अद्ययावत तंत्रज्ञानाव्दारे दाखविता येईल, असे नमुद केले आहे. Tata Communications Ltd. Mumbai यांचे तंत्रज्ञान हे Windows Platform वर आधारित असल्याने त्याव्दारे सर्वच साईभक्तांना Live Darshan चा लाभ घेता येत नाही. परंतु, Vistaas Digital Media Ltd. Mumbai यांचेमार्फत दोन्ही तंत्रज्ञानावर Live Darshan दिसण्याची सुविधा असल्याने, त्यांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास्तव दिनांक १०/०१/२०१० रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. परंतु, मा. व्यवस्थापन समितीने तो अमान्य केलेला आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, संस्थानच्या www.shrisaibabasansthan.org या अधिकृत वेबसाईटवर इंटरनेटव्दारे Tata Communications, Ltd., Mumbai (पूर्वीची VSNL) यांचेमार्फत सुरु असलेली Live Darshan सुविधा पुढील काळात सुरु ठेवणेच्या योग्य निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र. ४८७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संस्थानच्या www.shrisaibabasansthan.org या अधिकृत वेबसाईटवर इंटरनेटव्दारे Tata Communications, Ltd., Mumbai (पूर्वीची VSNL) यांचेमार्फत सुरु असलेली Live Darshan सुविधा पुढील काळात सुरु ठेवणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३ शालेय गणवेश खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष-२०१०-११ करीता नवीन प्रवेश घेणारे विद्यार्थी तसेच इयत्ता १ली, ५वी व ८वी व ११ वी तील विद्यार्थ्यांसाठी गणवेश उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| शाळा | अ. नं. | इयत्ता | गणवेश प्रकार | | विद्यार्थी संख्या | गणवेशासाठी विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुलांसाठी | मुलींसाठी | | |
| श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल | ०१ | ज्यु.के.जी. | हाफ पॅन्ट, हाफ शर्ट, स्वेटर | फ्रॉक, स्वेटर | ३०० | ३०० |
| | ०२ | सि.के.जी. | | | १४५ | विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार |
| | ०३ | इ. १ली | हाफ पॅन्ट, हाफ शर्ट, स्वेटर, पी.टी. ड्रेस | फ्रॉक, स्वेटर, पी.टी. ड्रेस | २२९ | २२९ |
| | ०४ | इ. २री | | | १६३ | विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार |
| | ०५ | इ. ३री | | | १२८ | |
| | ०६ | इ. ४थी | | | ११५ | |
| | ०७ | इ. ५वी | | | १०० | |
| | ०८ | इ. ६वी | | | ८१ | |
| | ०९ | इ. ७वी | | | ७८ | |
| | १० | इ. ८वी | फुल पॅन्ट, हाफ शर्ट, स्वेटर, पी.टी. ड्रेस | शर्ट, स्कर्ट डिव्हायडर, स्वेटर, पी.टी. ड्रेस | ९८ | ९८ |
| | ११ | इ. ९वी | | | ६६ | विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार |
| | १२ | इ. १०वी | | | ६४ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | ०१ | इ. ५वी | --- | पिनो फ्रॉक, स्वेटर, शुज | १३० | १३० |
| | ०२ | इ. ६वी | | | १०२ | विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार |
| | ०३ | इ. ७वी | | | ११० | |
| | ०४ | इ. ८वी | --- | सलवार-कमीज ओढणीसह, शुज व स्वेटर | १०८ | १०८ |
| | ०५ | इ. ९वी | | | ११० | विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार |
| | ०६ | इ. १०वी | | | ९३ | |
| श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | इ. ११वी | फुल पॅन्ट, हाफ शर्ट, शुज | सलवार-कमीज ओढणीसह, शुज | ४८० | ४८० |
| | ०२ | इ. १२वी | | | ४६४ | विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार |

उपरोक्तप्रमाणे विद्यार्थी संख्या व गणवेश प्रकार असून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलचे ज्यु. के.जी., इ.१ली व ८वी तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाच्या इ.५वी व इ.८वी, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे इ.११वी चे सर्व विद्यार्थी नवीन गणवेश घेतात. उर्वरित सर्व वर्गातील विद्यार्थी गणेवश फाटला अथवा खराब झाल्यास नवीन गणवेश घेतात.

गणवेश पुरवठाधारक शालेय परिसरात गणवेश विक्री करतात. सदर खरेदी विक्री मध्ये संस्थानचा कुठलाही आर्थिक सहभाग असत नाही. फक्त गणवेश पुरवठादार व पालक यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम संस्थानच्या मार्फत होते.

सन- २००९-१० मध्ये मे.आर.के. कलेक्शन, नाशिक यांनी गणवेश पुरवठा केला होता. सन २०१०-११ मध्ये त्यांनी इ.८वी ते १२वी मुलींच्या गणवेशाचे किंमतीत प्रति गणवेश रु.२०/- (रु.२६०/- ऐवजी रु.२८०/-) तसेच इ.११वी व इ.१२वी मुलांच्या गणवेशाचे किंमतीत प्रति गणवेश रु.३५/- रु.३१५/- ऐवजी रु.३५०/-) ने वाढ मागितली असून उर्वरित विद्यार्थ्यांचे गणवेशगेल्या वर्षीच्या किंमतीत देण्यात तयार आहेत. त्यांचेकडील गणवेशाचे कापड, शिलाई इत्यादी बाबत तक्रारी नसतात. तरी त्यांची विनंती मान्य करुन वाढ दिल्यास कोटेशन मागणी, चर्चा/ वाटाघाटी इ.चा वेळ वाचून वेळेवर पुरवठा होऊ शकेल अथवा नव्याने कोटेशन मागणी करुन गणवेश उपलब्ध करुन देता येतील.

**निर्णय क्र. ४८८ यावर सविस्तर चर्चा होऊन,शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांना गणवेश खरेदीकामी कोटेशन मागविण्यात यावेत, असें ठरलें.**

(कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल/कन्या विद्यामंदिर/ अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.४४ देणगी महिंद्रा मॅक्सिमो वाहनाबाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता दि.१६/०४/२०१० रोजी महिंद्रा & महिंद्रा कंपनी यांचेकडून एक नवीन महिंद्रा मॅक्सिमो (मालवाहतुक), वाहन क्रं. एम.एच.-१७/ए.जी.-२५३ हे देणगी मिळालेले आहे.

सदर वाहनाचे आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन, फिटनेस फी, टॅक्स तसेच विमा इ. बाबींची पुर्तता करून देणे कामी खालील प्रमाणे खर्च कंपनीने केलेला आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **रक्कम (रू.)** |
|---|---|---|
| ०१. | वाहनाची मुळ किंमत | २,३७,८६२.०० |
| ०२. | विमा रक्कम | १०,८७८.०० |
| ०३. | रजिस्ट्रेशन फी | ३००.०० |
| ०४. | फिटणेस फी | ३००.०० |
| ०५. | OT टॅक्स | १८,९००.०० |
| | **एकुण रक्कम रू.** | **२,६८,२४०.००** |

वरील प्रमाणे महिंद्रा & महिंद्रा कंपनी यांचेकडून स्विकारण्यात आलेल्या नवीन महिंद्रा मॅक्सिमो (मालवाहतुक) वाहनाची एकुण किंमत रू.२,६८,२४०/- (अक्षरी रक्कम रू.दोन लाख अडुसष्ट हजार दोनशे चाळीस) मात्र आहे.

तरी महिंद्रा & महिंद्रा कंपनी यांचेकडून सदर एक महिंद्रा मॅक्सिमो (मालवाहतुक), वाहन क्रं. एम.एच.-१७/ए.जी.-२५३ हे वाहन देणगी स्विकारले बाबतचा प्रस्ताव माहिती करीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र. ४८९ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५ दि.६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ३५४ बाबत चर्चा होऊन निर्णय होणे बाबत**

**प्रस्ताव -** दि.०६/०३/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.१९, निर्णय क्र.३५४ संमत झालेला आहे.

या निर्णयाच्या संदर्भात काही ग्रामस्थ शिरडी यांनी दि.०६/०५/२०१० रोजी लेखी निवेदन देवून निर्णय क्र.३५४ रद्द करणेबाबतची मागणी केलेली आहे. तसेच स्थानिक विश्वस्त मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनीही सदरचा ठराव रद्द करणेबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

याप्रकरणी संस्थानचे मा.अध्यक्ष श्री.ससाणे सो.व ग्रामस्थ यांची चर्चा होऊन सदरचा झालेला ठराव रद्द करणेबाबतचे आश्वासन मा.अध्यक्ष यांनी चर्चेअंती दिलेले आहे.

**निर्णय क्र. ४९० उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र. ३५४ रद्द करणेत यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.४६ प्रसादालय स्टीम बॉयलर व थर्मिक फ्लूड हिटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत**

**प्रस्ताव -** सन १९९९ पासून प्रसादालयात अन्न शिजविणेसाठी थरमॅक्स कंपनीच्या RXG-४ स्टीम बॉयलर वापरणेत येत आहे. माहे जानेवारी २००९ पासून नविन प्रसादालय सुरू करतांना थरमॅक्स कंपनीचा RXD ८५० स्टीम बॉयलर बसविणेत आलेला आहे. त्याशिवाय श्री साईप्रसादालयातील मोतीचूर लाडु प्रसाद बनविणेकामी थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी थरमॅक्स कंपनीचा थर्मिक फ्ल्युड हिटर (बॉयलर) कार्यन्वित करणेत आलेला आहे.

सन १९९९ पासुन RXG-४ स्टीम बॉयलर करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीसला देण्यात येत आहे. मागील चार वर्षापासून सदरचे कॉन्ट्रक्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे. सन २००९ - १० या वर्षाचे RXG-४ स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट हे ३१/०३/२०१० रोजी संपलेले आहे. त्याचप्रमाणे RXD ८५० स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरची फ्रि वार्षिक सर्व्हीसींगचा कालावधी संपलेला आहे.

मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी वार्षिक सर्व्हीसींगचे काम समाधानकारक व वेळेत पुर्ण करुन दिलेले आहे. त्याच प्रमाणे वेळोवेळी स्टीम बॉयलर दुरुस्तीबाबत संस्थानला तातडीने मदत केलेली आहे. मागील वर्षी खालील प्रमाणे तारखेस सर्व्हीसींग करुन दिलेल्या आहेत.

१) १ ली सर्व्हीसींग दि.१९/०५/२००९
२) २ री ---"--- दि. १०/०७/२००९
३) ३ री ---"--- दि. १७/०९/२००९
४) ४ थी ---"--- दि. १८/११/२००९
५) ५ वी ---"--- दि. ०२/०२/२०१०
६) ६ वी ---"--- दि. १९/०३/२०१०

मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २००९-२०१० या वर्षाकरीता RXG-४ हया स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टकामी फि रु १८,०००/- + सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे फी देण्यात आली होती. सन २०१०-२०११ करीता ०३ बॉयलर सुस्थितीत ठेऊन कार्यान्वित रोहणेसाठी वार्षिक सर्व्हीसींग कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे असल्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स औरंगाबाद यांना खर्चाचा अंदाज कळविणेसाठी सांगणेत आलेले होते. त्यानुसार संदर्भिय कोटेशनद्वारे सन २०१०-२०११ या वर्षासाठी RXG-४, RXD ८५० व थर्मिक फ्ल्युड हिटरसाठी खालीलप्रमाणे वार्षिक सर्व्हीसींगचे दर कळविलेले असून सर्व्हिसींग व्यतीरिक्त बॉयलरला स्पेअरपार्ट बसविल्यास त्याचा वेगळा आकार दयावा लागणार आहे. फी वाढीबाबत मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे प्रतिनिधीशी फोनवर चर्चा केली असता त्यांनी महागाई, एस.टी. भाडे, टेक्निशियनचे पगार वाढलेले असल्यामुळे दरवाढ करावी लागलेली असल्याचे सांगणेत आले आहे.

| अ.नं. | बॉयलरचे नाव | वार्षिक सर्व्हिसींगचे दर |
|---|---|---|
| १. | RXG-४ | २०,०००/- + सर्व्हिस टॅक्स |
| २. | RXD ८५० | २०,०००/- + सर्व्हिस टॅक्स |
| ३. | थर्मिक फ्ल्युड हिटर | १८,०००/- + सर्व्हिस टॅक्स |
| | **एकुण** | **५८,०००/- + सर्व्हिस टॅक्स** |

तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१०-२०११ या वर्षाकरीता स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु५८,०००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४९१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना सन २०१०-२०११ या वर्षाकरीता स्टीम बॉयलर व थर्मिक फ्ल्युड हिटरचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेस व त्याकामी सर्व्हीस फी रु५८,०००/- + सर्व्हीस टॅक्स (लागू असेल तो) चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.४७ श्री साई सच्चरित मराठी श्री दासगणू विरचित अर्वाचीन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबाचे चार अध्याय, श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र या संस्थानच्या अधिकृत प्रकाशनांची Audio Mp३ DVD ची संस्थानमार्फत निर्मीती करणे बाबत**

**प्रस्ताव -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.
"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

श्रीमती गिता गिरीष , दुबई यांचेकडील दि.०२.०३.२०१० चे पत्रात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.
१) श्री साईसच्चरित मराठी श्री दासगणू विरचित अर्वाचीन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय, श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र या संस्थानच्या अधिकृत प्रकाशनांची Audio Mp३ DVD बनविली आहे.
२) सदरचे Mp३ नामांकित पार्श्वगायक श्रीनिवास कशेळकर यांचे सुमधुर आवाजात तयार केली असून, पार्श्वसंगीत समीर म्हात्रे, संतोष मुळेकर व बॉबी श्रीवास्तव या नामांकित संगीतकारांकडून काम करुन घेण्यात आले आहेत.
३) सदरच्या Audio Mp३ DVD ते श्रीसाईबाबांची सेवा म्हणून साईबाबांना अर्पण करण्याची तयारी दर्शविली आहे.
४) सदरचे Audio DVD चे सर्व हक्क संस्थानला विनामोबदला देणार आहे. सदरच्या वरील Audio Mp३ DVD ची निर्मिती संस्थानमार्फत निर्मिती करणेबाबत विनंती केली आहे.
५) श्रीमती गिता गिरीष मेहता, दुबई यांचेकडील दि.२०.११.२००९ पत्राने Audio Mp३ DVD तयार करणेकामी रुपये १२ लाख मात्र खर्च आला असलेबाबत कळविले आहे.

ज्योत्स्ना गणपुले यांचे आवाजात गायलेली श्री साईसच्चरित मराठी ५३ अध्याची ऑडीओ सी.डी. संस्थानमार्फत निर्मिती करुन भक्तांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

संस्थानमार्फत श्री साई सच्चरित मराठी श्री दासगणू विरचित अर्वाचीन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय, श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र या संस्थानच्या अधिकृत प्रकाशनांची Audio Mp३ DVD ची संस्थानमार्फत निर्मिती करण्यात आलेली नाही.

उपरोक्त दोन्ही सी.डी. पैकी श्रीमती गिता गिरीष मेहता यांचे Audio Mp३ DVD मध्ये १) संस्थानचे साईसच्चरित मराठी २) साईबाबांचे चार अध्याय मराठी ३) श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र मराठी या संस्थानच्या अधिकृत प्रकाशनांचा समावेश करण्यात आला आहे. सदर Audio Mp३ DVD ही नामवंत गायकांकडून म्हणून घेतलेली आहे व ज्योत्स्ना गणपुले यांनी स्वत: साईसच्चरित ५३ अध्यायाचे गायन केलेले आहे. तथापी पारायण करतांना ज्याप्रमाणे साई सच्चरित वाचले जाते त्या प्रमाणे श्रीमती गीता गिरीष मेहता यांनी नामांकित पार्श्वगायक श्रीनिवास कशेळकर यांचे आवाजातील Audio Mp३ DVD C.D. तयार केलेली आहे. सदरची सी.डी. श्रवणीय/सुश्राव्य आहे.

श्रीमती गिता गिरीष मेहता यांनी सदर सीडीचे खालील प्रमाणे दोन प्रकारचे नमुना पॅकींग /कव्हर पाठविले आहे.
१) डिलक्स :- याप्रकारच्या पॅकींग/कव्हरच्या सीडीचीं किंमत अधिक असेल अशी सी.डी. विशेष आकर्षक स्वरुपात असल्याने सप्रेम भेट देणारास उपयुक्त होईल.
२) ऑर्डीनरी :- याप्रकारच्या पॅकींग/कव्हरच्या सीडीची किंमत डिलक्स पॅकींगच्या सीडी पेक्षा तुलनेत कमी असेल.

उपरोक्त पॅकींग/कव्हरचे नमुने सोबत सादर केले आहेत. सदर पॅकींग कव्हरवर संस्थानचा लोगो, संस्थानचे नाव, प्रकाशक म्हणून मा अध्यक्षांचे नांव,संगीतकार व गायक यांचे नाव वगैरे छपाई करता येईल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित सी.डी./व्हीसीडी उत्पादनासाठी सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रायव्हेट लि. कंपनी, मुंबई यांच्या सी.डी./व्हीसीडी निर्मितीच्या शर्ती/अटी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून वेळोवेळी कायम स्वरुपी संस्थान प्रकाशित सी.डी./व्हीसीडी चे निर्मितीचे कामे करुन घेणेस मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त प्रमाणे सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्वरींग इंडिया प्रायव्हेट लि. कंपनी, मुंबई यांचेकडून सदरचे Audio Mp३ DVD निर्मिती कामी दर पत्रक मागवून दरपत्रकातील किंमतीनुसार Deluxe DVD Mp३ व Ordinary DVD Mp३ ची विक्री किंमत ठरविता येईल.

सबब श्री साई सच्चरित मराठी, श्री दासगणू विरचित अर्वाचीन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबांचे चार अध्याय मराठी व श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र मराठी या संस्थानच्या अधिकृत प्रकाशनांची Audio Mp३ DVD संस्थानमार्फत निर्मिती करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्या संस्थान प्रकाशित सौ.जोस्ना गणपुले,पुणे यांची श्री साई सच्चरित मराठीची ऑडीओ सी.डी असल्याने श्री साई सच्चरित मराठी श्री दासगणू विरचित अर्वाचीन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबाचे चार अध्याय, श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्र या संस्थानच्या अधिकृत प्रकाशनांची Audio Mp३ DVD ची संस्थानमार्फत निर्मीती करण्यात येऊ नये असे ठरले.**

**(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४८** **मे.रिको कंपनीचे फोटो कॉपीअर मॉडेल नं. २०२० डी या तीन झेरॉक्स मशिनचे सन २०१०-११ चे सर्व्हिस कॉन्टॅक्ट करणे बाबत**

**प्रस्ताव -** मे. रिको कंपनी मॉडेल नं.२०२० डी फोटो कॉपीअर प्रती मिनीट २० कॉपीज् या स्पिडचे तीन झेरॉक्स मशीन खालील ठिकाणी चालु आहे.
१) प्रशासन शाखा २) श्री साईबाबा रुग्णालय ३) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल.

मागिल सन २००९-१० या आर्थिक वर्षात तीन्ही मशीनचे सर्व्हीस कॉन्ट्रक्ट रुपये १६५४६ (सर्व्हिस टॅक्ससह) x ३ = ४९,६३८/- इतक्या रक्कमेला केले होते.

दि.३१/०३/२०१० रोजी सदरच्या तीन्ही मशीनचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट संपलेले आहे. मे रिको कंपनीचे अधिकृत इंजिनिअर ``साई ॲटोमेशन अहमदनगर`` यांनी त्यांचे दि.२३/०२/२०१० चे पत्रान्वये, सन २०१०-२०११ या वर्षाचे एका मशीनचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची रक्कम रु.२०,४०५/- इतकी कळविली आहे परंतु श्री साईबाबा संस्थानला सवलतीचे दराने रु.१६,५४५/- (१०.३० सर्व्हिस टॅक्ससह) इतकी रक्कम कळविली आहे.

झेरॉक्स मशीनच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २०१०-२०११ चे बजेटमध्ये खर्चाची तरतुद केलेली आहे.

उपरोक्त तिन्ही झेरॉक्स मशीन चालु असून सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची मुदत दि.३१/०३/२०१० रोजी संपल्याने दि.०१/०४/२०१० ते दि.३१/०३/२०११ अखेर एक वर्षाचे सर्व्हिस कॉन्ट्रॅन्क्ट करणेस व त्याकामी रुपये १६,५४५ x ३ = ४९,६३५/- (रुपये एकोणपन्नास हजार सहाशे पस्तीस फक्त) येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ४९३ प्रस्तावात नमूद केलेल्या १) प्रशासन शाखा २) श्री साईबाबा रुग्णालय ३) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल. या तिन्ही झेरॉक्स मशीनचे दि.०१/०४/२०१० ते दि.३१/०३/२०११ अखेर एक वर्षाचे सर्व्हिस कॉन्ट्रॅन्क्ट करणेस व त्याकामी येणारे रुपये ४९,६३५/- खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-१२)

---

**विषय नं.४९ श्री.संदिप ज्ञा.शेळके,कंत्राटी पध्दतीने पंचकर्म तज्ञ आयुर्वेद विभाग, रुग्णालय यांना मुदतवाढ व मानधनवाढीबाबत.**

**प्रस्ताव -** वैद्यकीय संचालक, रुग्णलये यांनी दि. ०५/०४/२०१० रोजीचा प्रस्ताव इकडील कार्यालयास सादर करुन त्यात " डॉ.संदिप ज्ञानेश्वर शेळके यांची श्री साईनाथ रुग्णालयात आयुर्वेद विभागाकडे "पंचकर्म तज्ञ" म्हणून कंत्राटी पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी रु.१०,०००/- मानधनावर तात्पुरती नेमणूक करणेत आली आहे. डॉ.संदिप शेळके हे श्री साईनाथ रुग्णालयात दि.१९/०५/२००९ रोजी हजर झाले असून त्यांचे एक वर्ष नेमणूकीचा कालावधी दि.१८/०५/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे. डॉ.शेळके यांनी दि.०२/०४/२०१० रोजीचे अर्जान्वये एक वर्ष मुदतवाढ व मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. डॉ.एस.बी.गोंदकर, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी हे रजेवर असतांना त्यांनी आयुर्वेदीक विभाग व्यवस्थीत सांभाळला व पंचकर्म विभागही चालू केला. पंचकर्माचे दर महिन्याला साधारण २०० रुग्ण लाभ घेतात व डॉ. एस.बी.गोंदकर, व.वै.अ. हे माहे नोव्हेंबर २०१० अखेर सेवानिवृत्त होत आहेत. तरी आयुर्वेदीक विभागात जाणकार व्यक्तीची आपल्याला गरज आहे. तरी डॉ.शेळके, पंचकर्म तज्ञ यांची सेवा पुढे चालू ठेऊन एक वर्ष मुदतवाढ व मानधनात वाढ करणेत यावी. " अशी विनंती केली आहे.

वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ.संदिप शेळके, कंत्राटी पध्दतीने पंचकर्म तज्ञ यांना एक वर्ष मुदतवाढ तसेच मानधनात वाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.संदिप शेळके, कंत्राटी पध्दतीने पंचकर्म तज्ञ यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५० श्री अतूल एकनाथ वाघ, कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी व दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव -** श्री अतुल एकनाथ वाघ, कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांनी दि.०६/०५/२०१० रोजी अर्ज सादर करुन त्यात " बांधकाम, प्रसादालय या विभागातील कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांचे प्रमाणे मुदत व मानधनवाढ मिळावी." अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर वाहन विभाग प्रमुख यांनी श्री अतुल वाघ यांचे काम समाधानकारक आहे तरी त्यांना मुदतवाढ देणेस हरकत नाही. असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री अतुल एकनाथ वाघ यांची जा.नं.एसएसएस वशी ०१/१४८०/२००७ दि.०९/०६/२००७ अन्वये संस्थानचे वाहन विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर प्रथम एक वर्ष कालावधीसाठी प्रतिमहा रु.७०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून त्यानुसार ते दि.०९/०६/२००७ रोजी कामावर हजर झाले आहेत.

श्री वाघ यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वेळोवेळी मुदतवाढ व मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. त्यांना जा.नं. एसएसएस वशी ०१/१६९१/२००९ दि.२१/०५/२००९ अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि.०८/०६/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे, त्यांना सध्या रु.११०००/- मानधन देण्यात येत आहे.

संस्थानचे बांधकाम व प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या कनिष्ठ अभियंते यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०१/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार रु.११०००/- ऐवजी रु.१३०००/- इतकी मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.

श्री अतुल एकनाथ वाघ, कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (मशिनरी व दुरुस्ती देखभाल), वाहन विभाग यांचे अर्जातील विनंती व त्यांचेबाबत वाहन विभाग प्रमुख यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता त्यांना बांधकाम विभाग व प्रसादालय विभागाकडील कंत्राटी कनिष्ठ अभियंत्याप्रमाणेच एक वर्ष मुदतवाढ व दरमहा एकत्रित मानधन रु.११०००/- ऐवजी रु.१३०००/- देणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४९५ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री अतुल एकनाथ वाघ, कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (मशिनरी व दुरुस्ती देखभाल), वाहन विभाग यांना बांधकाम विभाग व प्रसादालय विभागाकडील कंत्राटी कनिष्ठ अभियंत्याप्रमाणेच एक वर्ष मुदतवाढ व दरमहा एकत्रित मानधन रु.११०००/- ऐवजी रु.१३०००/- देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५१ पदस्थापनेबाबत. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.**

**प्रस्ताव -** मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.०१/०४/२००६ च्या सभेतील विषय क्र.४६ निर्णय क्र.२२५ अन्वये सन १९९१ ते डिसेंबर २००० या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी संस्थानची कंत्राटी सेवा सोडून गेले व ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कोर्ट केसेस व अन्य चौकशी चालू आहे, अशा सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना वगळून उर्वरीत सन १९९१ ते २००० पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमीत कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर सलग हजर असणाऱ्या अशा सर्व कंत्राटी कामगारांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३ (४) मधील तरतूदीस अनुसरुन रु.२०००/- या एकत्रित मानधनावर विहीत शर्ती अटीस अधिन राहून डिसेंबर-२००६ मध्ये संस्थान सेवेत नियमीत नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय क्रमांक सासंवि २००६/४३२/(९१) का.सोळा.मंत्रालय मुंबई-४०० ०३२, दि.२१ ऑगस्ट, २००८ नुसार दि.०१ ऑगस्ट २००८ पासून एकत्रित मानधनावरील अकुशल दर्जाच्या कर्मचाऱ्यांना दरमहा रु.४५००/- व तांत्रिक तसेच इतर पदाचे कुशल कर्मचाऱ्यांना दरमहा रु.५५००/- इतके एकत्रित वेतन देणेत आलेले आहे.

आता शासन निर्णय क्र. सासंवि २००९/४३३/(३७/०९) का.सोळा.मंत्रालय मुंबई-४०० ०३२, दि.०७ ऑगस्ट, २००९ अन्वये संस्थानच्या आकृतीबंधास मान्यता मिळालेली असून एकूण प्रस्तावीत ४८२६ पदांपैकी २९०८ (१३४२ जुने वेतश्रेणीवरील + १०२६ नविन एकत्रित मानधनावरील + ५४० रिक्त पदे) स्थायी पदांना व उर्वरीत १९१८ कायमस्वरुपी कंत्राटी पदांना मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०९/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६८ अन्वये शासन निर्णयानुसार एकत्रित मानधनावरील १०२६ कर्मचाऱ्यांना दि.७ ऑगस्ट २००९ पासून वेतनश्रेणीवर नेमणूका देणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-१/३५०३/२००९ दि.०१ ऑक्टोबर २००९ च्या आदेशान्वये दि.०७ ऑगस्ट २००९ पासून वेतन बँड ४४४०-७४४० मध्ये मुळ वेतन ४४४० अधिक ग्रेड वेतन रु.१३०० अधिक अनुज्ञेय महागाई भत्ते याप्रमाणे वेतन देण्यात आलेले आहे. घ्सदर आदेशात १०२६ कर्मचाऱ्यांपैकी १४८ कुशलचे वेतन रु.५५००/- घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, आकृतीबंधानुसार रिक्त पदे व प्रत्यक्षात करण्यात येणारे काम तपासून नियमानुसार वेतनबँड तसेच अकुशल कर्मचाऱ्यांना स्थानापन्नतेचे आदेश यथावकाश देण्यात येतीलङङ असे नमूद करण्यात आलेले आहे.

वर्ग-४ च्या सेवाजेष्ठ जुन्या कर्मचाऱ्यांपैकी सौ.शोभा भाऊसाहेब बनकर व इतर २६ कर्मचाऱ्यांनी दि.१५/०९/२००९ रोजीच्या अर्जान्वये ते प्रत्यक्ष करत असलेल्या कामानुसार त्या पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे दि.०१/०२/२०१० व दि.१५/०२/२०१० रोजीचे पत्रामध्ये सेवाजेष्ठतेप्रमाणे कर्मचाऱ्यांना पदोन्नती न देता सन २००६ नंतरच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येत आहे व देणारच आहे. संघटनेला विचारात घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारची कुठल्याही कर्मचाऱ्यांची कोणतीही ऑर्डर काढू नये. प्रशासनाने कोणतेही वाद संघर्ष न्याय प्रविष्ठ न होईल याची काळजी घेऊन संस्थान प्रशासनाने सबंधित कर्मचारी वर्ग यांची सेवाजेष्ठता विचारात घेऊन सर्व कर्मचाऱ्यांना शासन मंजुर आकृतीबंधामधील पदावर पदोन्नती देण्यात यावी. अन्यथा श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी आपणाशी केव्हाही, कधीही संघर्ष करुन आंदोलन करण्याच्या तयारीत असून पुढे होणाऱ्या सर्व प्रसंगास आपण व प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील. संस्थान सेवेत कायम झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय मिळावा. कोणावरही अन्याय करु नये असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता आकृतीबंधानुसार १०२६ कर्मचाऱ्यांची पदस्थापना करण्यासाठी संस्थानमध्ये वर्ग -४ चे पदावर असलेल्या जुन्या व नव्या कर्मचाऱ्यांची एकत्रित सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात आली. एकत्रित मानधनावरील १०२६ कर्मचाऱ्यांची पदनिहाय

स्थानापन्नतेची कार्यवाही करत असतांना अकुशल ८७६ कर्मचाऱ्यांची तसेच जुन्या सेवाजेष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेची पडताळणी केल्यानंतर त्यातील वर्ग-४ च्या सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यांनी सुध्दा शैक्षणिक तसेच व्यवसायीक पात्रता पूर्ण केल्याचे निदर्शनास आले.

एकत्रित मानधनावरील तसेच जुन्या कर्मचाऱ्यांची एकत्रित यादी तयार करुन ती मा.अध्यक्ष साहेब यांचे निदर्शनास आणण्यात आली. सदरचे यादीतील जुन्या व नविन कर्मचाऱ्यांपैकी शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना समान न्याय देण्याचे दृष्टीने पात्रताधारक कर्मचाऱ्यांची त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार पदस्थापना खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

**अ)** वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना करतांना प्रस्तावीत सेवाप्रवेशातील नियम तसेच शासन निर्णयातील शर्ती-अटी व रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहेत.

| **Post Name & Pay Scale** | **By Nomination** | **By Promotion** |
|---|---|---|
| **Clerk-Typist**<br>5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) Graduate from any recognized University<br>3) MS-CIT or Govt. prescribed equivalant Computer Operating Course.<br>4) Govt.Commercial certificate of Typing with English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed | 1) Graduate from any recognized University<br>2) MS-CIT or Govt. prescribed equivalant Computer Operating Course.<br>3) Govt.Commercial certificate of Typing with English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed<br>4) Experience of 3 yrs.in Office work in Sansthan |

१) लिपीक-टंकलेखक पदासाठी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमातील पदवीधर, MS-CIT, इंग्रजी ४० व मराठी ३० श.प्र.मि. सर्व निकष पूर्ण करणाऱ्या **२६** कर्मचाऱ्यांची लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे.

२) पदवीधर आहेत परंतु MS-CIT, इंग्रजी ४० व मराठी ३० श.प्र.मि. यापैकी एक निकष अपूर्ण असणाऱ्या २२ कर्मचाऱ्यांची एक वर्षात निकष पूर्ण करण्याचे अटीवर लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे.

३) आवश्यक शैक्षणिक पात्रता पदवीधर, MS-CIT, इंग्रजी ४० व मराठी ३० श.प्र.मि. पैकी पदवीधर आहेत परंतु MS-CIT नसणारे व टायपिंग इंग्रजी ३० व मराठी ३० श.प्र.मि. असणाऱ्या ०५ कर्मचाऱ्यांना लिपीक-टंकलेखक पदावर पदस्थापना देण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमामध्ये केलेली तरतूद तसेच लिपीक-टंकलेखक पदासाठी दिलेली सवलत या सर्व बाबींचा विचार करता एकूण- ५३ कर्मचाऱ्यांची खालील तपशिलाप्रमाणे दि.७ ऑगस्ट २००९ पासून पदस्थापना करण्यात आलेली आहे.

| **अ.नं.** | **पदनाम** | **१०२६ पैकी पात्र कर्मचारी संख्या** | **वर्ग-४ चे जुन्या यादीतील पात्र कर्मचारी संख्या** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक-टंकलेखक | ४८ | ५ | **५३** |

उपरोक्त कार्यवाही केल्यानंतर वर्ग-४ च्या काही कर्मचाऱ्यांनी लिपीक - टंकलेखक पदाची शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता पुर्ण केल्याची प्रमाणपत्र सादर करून या पदावर पदस्थापना मिळणेबाबत विनंती अर्ज केलेली आहे. त्यांना तसेच येथून पुढे या पदासाठीची शैक्षणिक, व्यवसायिक पात्रता पुर्ण करणाऱ्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांना नियमानुसार लिपीक - टंकलेखक पदावर पदस्थापना देता येईल.

**ब)** वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची तांत्रिक पदावर पदस्थापना करतांना खालील प्रस्तावीत सेवाप्रवेशातील नियम तसेच शासन निर्णयातील शर्ती-अटी व रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहेत.

| Post Name & Pay Scale | By Nomination | By Promotion |
|---|---|---|
| A/c & Refrigeration Mechanic<br>5200-20200<br>Grade Pay –1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) I.T.I. Refrigeration and A/C + NCTVT<br>3) Experience min.3 yrs.in similar capacity | 1) I.T.I. Refrigeration and A/C + NCTVT<br>2) Experience of 5 yrs in Sansthan in concerned work. |
| Wireman<br>5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) Two years - Wireman Certificate Course from Govt. recognized I.T.I.<br>3) N.C.T.V.T. Exam pass.<br>4) Electrical Wireman License must<br>5) Knowlege of Maintenance of D.G.sets and Electrical Machinary, A.M.F. and Distribution Panel.<br>6) Knowledge of reading Electrical | 1) Two years - Wireman Certificate Course from Govt. recognized I.T.I.<br>2) N.C.T.V.T. Exam pass.<br>3) Electrical Wireman License must<br>4) Knowlege of Maintenance of D.G.sets and Electrical Machinary, A.M.F. and Distribution Panel.<br>5) Knowledge of reading Electrical drawings |

| | | |
|---|---|---|
| | drawings<br>7) Experience of 5 yrs in similar capacity | 6) Experience of 5 yrs in sansthan electrical department |
| **Welder**<br>5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) ITI Welder + NCTVT<br>3) Experience min.5 yrs. in Argon, Carbon Welding | 1) ITI Welder + NCTVT<br>2) Experience of 5 yrs in Sansthan in concerned work. |
| **Fitter**<br>5200-20200<br>Grade Pay –1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) I.T.I. Fitter + N.C.T.V.T.<br>3) Experience min.5 yrs.in similar capacity | -- |
| **Driver**<br>5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) H.S.C. Pass<br>3) Heavy Duty Motor Driving Licence must<br>4) Fitnes as per provisions of M.V. Act 1949.<br>5) Experience of min.5 yrs of motor driving | 1) S.S.C. Pass<br>2) Heavy Duty Motor Driving Licence must<br>3) Fitnes as per provisions of M.V. Act 1949.<br>4) Experience of min.5 yrs of motor driving in sansthan |
| **Plumber**<br>Pay Band 5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) H.S.C. Science + Plumber Trade Certificate from Govt. recognized I.T.I. / Institute<br>3) Exeperience min.5 yrs. | 1) H.S.C. Science and OR Plumber Trade Certificate from Govt. recognized I.T.I. / Institute<br>2) Exeperience min.5 yrs in sansthan similar work. |
| **Mali**<br>4440-7440<br>Grade Pay -1600 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) H.S.C. with 1 Year Agri Diploma<br>3) Experience of 5 yrs in gardening and nursary | 1) H.S.C. with 1 Year Agri Diploma<br>2) Experience of 5 yrs in gardening and nursery |
| **Achari**<br>4440-7440<br>Grade Pay -1600 | 1) S.S.C. + Catering Course Pass.<br>2) Minimum 05 Year Experience of large quantity cooking. | 1) H.S.C. Passed or Catering Course Pass.<br>or min. 05 yrs Experience in Sansthan kitchen Cooking. |
| **Tabalji**<br>5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) S.S.C. + Diploma of Tabala-Sangit Visharad from recognized Music School<br>3) Experience of 5 yrs of similar work. | 1) S.S.C. + Diploma of Tabala-Sangit Visharad from recognized Music School<br>2) Experience of 5 yrs of similar work in sansthan |
| **Motor Mechanic**<br>5200-20200<br>Grade Pay –1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) Diploma in Automobile / Motor Mechanic from Govt. recognized I.T.I.<br>3) Experience of min.5 yrs in Automobile repairing and maintenance | 1) Diploma in Automobile / Motor Mechanic from recognized I.T.I.<br>2) Experience of min.5 yrs in Automobile repairing and maintenance in sansthan. |
| **C.C.T.V. Operator**<br>5200-20200<br>Grade Pay -1900 | 1) Age not more than 28 yrs.<br>2) S.S.C.Pass<br>3) 6 month C.C.T.V.Operator course from Govt.recognized I.T.I. / Institute<br>4) MS-CIT or Govt. prescribed equivalant computer operating course.<br>5) Experience min.5 yrs. | 1) S.S.C.Pass<br>2) 6 month C.C.T.V.Operator course from Govt.recognized I.T.I. / Institute<br>3) MS-CIT or Govt. prescribed equivalant computer operating course.<br>4) Experience min.5 yrs.in sansthan |

१) वरीलप्रमाणे प्रस्तावीत सेवा प्रवेश नियमामधील आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता पुर्ण केलेल्या ६४ कर्मचाऱ्यांची संबंधीत पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे.

२) शासन निर्णय क्र.आय.टी.आय./१००४/१३८-अ/व्यशि-२ दि.१२/०४/२००५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत आर्टीझन टू टेक्नोक्रॅट या योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या वीजतंत्री तृतीय स्तर उत्तीर्ण झालेल्या ८ कर्मचाऱ्यांची तारतंत्री पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे.

३) शासन निर्णय क्र.आय.टी.आय./१००४/१३८-अ/व्यशि-२ दि.१२/०४/२००५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत आर्टीझन टू टेक्नोक्रॅट या योजने अंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्लंबर तृतीय स्तर उत्तीर्ण झालेल्या ६ कर्मचाऱ्यांची प्लंबर पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे एकूण ६४+८+६ = ७८ कर्मचाऱ्यांची त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार तांत्रिक पदावर दि.७ ऑगस्ट २००९ पासून पदस्थापना करण्यात आलेली आहे त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ. नं. | पदनाम | १०२६ पैकी वर्ग-३ पदासाठी पात्र कर्मचारी संख्या | वर्ग-४ चे जुन्या यादीतील वर्ग-३ पदासाठी पात्र कर्मचारी संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | मॅकॅनिक RAC | १ | | **१** |
| २ | वायरमन | ३७ | २ | **३९** |
| ३ | वेल्डर | ६ | १ | **७** |
| ४ | फिटर | २ | | **२** |
| ५ | वाहन चालक | १३ | १ | **१४** |
| ६ | प्लंबर | ६ | | **६** |
| ७ | माळी | १ | | **१** |
| ८ | आचारी | २ | | **२** |
| ९ | तबलजी | १ | १ | **२** |
| १० | मोटार मॅकॅनिक | १ | २ | **३** |
| ११ | सी.सी.टी.व्ही.ऑपरेटर | | १ | **१** |
| | **एकूण -** | **७०** | **८** | **७८** |

उपरोक्त कार्यवाही केल्यानंतर वर्ग-४ च्या काही कर्मचाऱ्यांनी तांत्रिक पदाची शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता पुर्ण केली असल्याची प्रमाणपत्र सादर करुन वर्ग-३ पदावर पदस्थापना मिळणेबाबत विनंती अर्ज केलेली आहे. त्यांना तसेच येथून पुढे या वरील पदासाठीची शैक्षणिक, व्यवसायिक पात्रता पुर्ण करणाऱ्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांना मंजुर आकृतीबंधातील रिक्त पदे विचारात घेऊन नियमानुसार तांत्रिक पदावर पदस्थापना देण्यात येतील.

१०२६ कर्मचाऱ्यांपैकी वरीलप्रमाणे ११८ कर्मचाऱ्यांची वर्ग-३ चे पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे. आकृतीबंधास मान्यता मिळाल्यानंतर १ कर्मचारी मयत व १ कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे. तसेच ४ कर्मचाऱ्यांची खातेचौकशी चालू असल्यामुळे त्यांची पदस्थापना करण्यात आलेली नाही. सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एकूण (१०२६) - (११८+२+४) = ९०२ वर्ग-४ कर्मचाऱ्यांची ज्या त्या विभागात मान्य आकृतीबंधानुसार रिक्त पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे.

मंजुर आकृतीबंधात कुपन विक्रेता पदास मान्यता मिळालेली आहे. कॅन्टीन विभाग - १३ व प्रसादालय विभागासाठी - १६ असे एकूण २९ पदे रिक्त आहेत. प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमांमध्ये H.S.C. Pass, MS-CIT, Typ.Eng.४० व Mar.३० श.प्र.मि. अशी शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता नमूद केलेली आहे. संस्थानमध्ये वर्ग-४ चे पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी कुपन विक्रेता पदासाठीची आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक पात्रतेची पडताळणी करुन पदस्थापना देणेची कार्यवाही करता येईल.

तसेच मंजुर आकृतीबंधात टेलीफोन ऑपरेटर, झेरॉक्स ऑपरेटर, फ्रॅकिंग मशिन ऑपरेटर, फायलर कम बाईंडर इ. पदांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. सदर पदासाठीची आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता व प्रत्यक्षात करण्यात येणारे काम तपासून कार्यवाही करता येईल.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या पदस्थापना कार्यवाहीचा अहवाल माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ४९६ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१. माहे मे-जून २०१० गुंतवणूकीबाबत.**

**प्रस्ताव - अ)** माहे मे, २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | आंध्र बँक, शिर्डी (NPAY) | ०२.०५.२०१० | २२,७७,१८४.०० |
| ०२. | आंध्र बँक, शिर्डी (NPAY) | ०२.०५.२०१० | १५,०७,९९०.०० |
| ०३. | विजया बँक, शिर्डीविजया बँक, शिर्डी | ०७.०५.२०१० | ७,०३,९६,९८६.०० |
| ०४. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | ०७.०५.२०१० | ६,२४,००,०००.०० |
| ०५. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १३.०५.२०१० | १,५०,६४,१७२.०० |
| ०६. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १५.०५.२०१० | २,०१,१३,४२५.०० |
| ०७. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १६.०५.२०१० | २,५८,११,८२९.०० |
| ०८. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | १६.०५.२०१० | २,००,००,०००.०० |
| ०९. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २५.०५.२०१० | २,००,००,०००.०० |
| १०. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २८.०५.२०१० | १,००,००,०००.०० |
| ११. | दैनंदिन खर्च वजा जाता माहे मे २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | एकूण रक्कम - | **२९,५७,७१,५८६.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. २९.७५ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. तथापि अ.नं. १ व २ यांचेकडे करण्यात आलेली गुंतवणूक ही नित्य प्रसादालय अन्नदान योंजनेतील असल्यामुळे या योजनेतील अटी नुसार सदरची रक्कम ही त्यांचेकडे पुन्हा प्रचलीत व्याजदराने गुंतवावी लागणार आहे. त्यामुळे ही रक्कम वजा जाता एकूण रक्कम रु.२९.३७ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत आहे.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते १० या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.२९.७५ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी व आंध्र बँक, शिर्डी नित्यप्रसाद अन्नदान योजनेतील मुदतपुर्तीची रक्कम ही त्यांचेकडेच या यांजनेतील अटी नुसार प्रचलीत व्याजदराने गुंतविण्यास निर्णयास्तव सादर.

**ब )** माहे जुन ,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | ४/६/२०१० | १,००,००,०००.०० |
| ०२. | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुन २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | **एकूण रक्कम -** | | **६,००,००,०००.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ६ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/ सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते १० या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु.६** कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र. ४९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे "अ" व "ब" अन्वये उपलब्ध होणारी रक्कम नेहमीप्रमाणे सेवा देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकाकडून व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकांकडे टप्प्या-टप्प्याने गुंतविण्यात यावी, तसेच नित्यप्रसाद अन्नदान योजना मधील रक्कम तेथेच प्रचलित व्याजदराने गुतवावी व परकीय चलन खात्यामधून केलेली गुंतवणूक मुदतपूर्तीनंतर परकीय चलन खात्यामध्ये वर्ग करावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**व्यवस्थापन समती सभा दिनांक २२.०५.२०१०**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२ सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव -** सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी मे.शरद एस.गायकवाड, चार्टर्ड, अकौंटट, मुंबई यांची नियुक्ती शासनपत्र क्र.सा.सं.वि.२००९/२५४/(१५) का.सोळा, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुबंई दि.१६ जुलै २००९ अन्वये करण्यात आली होती. त्यास अनुसरून त्यांनी सदर कामकाज पूर्ण केले असून, त्या संदर्भातील लेखापरिक्षणाचा अहवाल संस्थानकडे दि.२८/०९/२००९ रोजी सादर केला आहे. अधिनियम २००४ मधिल तरतुद १७ (२) क आणी २९(२) अन्वये सदर अहवालाची एक प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई व एक प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई. यांना सादर करण्यात आलेली आहे. तसेच सदरचा वार्षिक अहवाल माहे डिसेंबर-२००९ मध्ये झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर सादर झालेला आहे.

सदर लेखापरिक्षण अहवालातील मुद्या संदर्भातील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात येणा-या वैधानिक लेखापरिक्षक यांना उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. त्या अनुशंगाने उपरोक्त लेखापरिक्षण अहवालातील मुद्दांचा दोष दुरूस्ती अहवाल तयार करणे कामी, सदर अहवालाच्या प्रती संस्थानचे सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात आलेले अंतर्गत लेखापरिक्षक मे.अभय शास्त्री ॲण्ड असो.पुणे व पूर्व लेखापरिक्षक श्री.अे.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटटस्, कोपरगाव तसेच पुर्व लेखापरिक्षक रुग्णालये श्री. व्ही.व्ही.कोठारी, चार्टर्ड अकौंटंटस श्रीरामपुर यांना पाठविण्यात आल्या होत्या.

त्यास अनुसरून सदर अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल,उपरोक्त दोन्हीं सस्थांच्या मार्गदर्शनानुसार तयार करण्यात आलेला असून, अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे. तरी सदर दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेवून त्यास मान्यता मिळणेकामी, मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र. ४९८ सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या. याबाबत व्यवस्थापन समितीचे सदस्यांकडून येणाऱ्या सूचना व सुधारणा अंतर्भूत करुन अहवालाची नोंद घेण्याचे ठरले. तसेच त्याची प्रत शासनाकडे आणि आवश्यकतेप्रमाणे अधिनियमातील तरतूदीनुसार मागणी करणाऱ्यास देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३ प्रयोगशाळेतील Blood Gas with Electrolytes या टेस्टचे दर निश्चित करणे बाबत**

**प्रस्ताव -** श्री साईनाथ रुग्णालय, प्रयोगशाळा विभागातील BLOOD GAS WITH ELECTROLYTES ही तपासणी नव्याने सुरु करावयाची असल्याने, सदर तपासणीचे दर निश्चीत करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०१/२०१० रोजीचे सभेत विषय नं. २९ अन्वये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्यणार्थ सादर करावा असे ठरले.

सदर प्रस्तावावर श्री साईनाथ रुग्णालयाच्या पॅथोलॉजिस्ट, डॉ. इरा भारद्वाज व मा. उपकार्यकारी अधिकारी यांच्यात झालेल्या चर्चेप्रमाणे (१) सदर तपासणी ही Acute MI, Respirotory distress, ARDS, COPD, pneumonia या आजारासाठी केली जाते. (२) वर्षाला अंदाजे ३००-४०० पर्यंत सदर तपासण्या केल्या जातात. (३) या तपासणी ची फी ब-याच रुग्णांना पेलवत नसल्यामुळे अशा रुग्णांना उपरोक्त तपासणीसाठी इतर ठिकाणी रेफर केले जात नाही.

सदर टेस्टचे दराबाबत श्री साईबाबा हॉस्पीटल, प्रवरा रुरल हॉस्पीटल, लोणी व खाजगी लॅबमध्ये (डॉ. प-हे, श्रीरामपूर ) येथे सध्या आकारत असलेल्या दरांबाबत तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे दर्शविणेत आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलकडे इलेक्ट्रोलेटस् व ब्लड गॅस या तपासण्या वेगवेगळया करण्याची सुविधा असल्याने सदर तपासण्याचे दर वेगवेगळे दर्शविण्यात आलेले आहे.

- Blood gas & Electrolytes : -

| Sr.No. | Tests | Rate Rs. | | |
|---|---|---|---|---|
| | | Saibaba Hosp. | PMT | Pvt.Lab (Dr. Parhe) |
| 01 | Elctrolytes | 220 | 175 | 250 |
| 02 | Blood Gases | 265 | 420 | Not Done |
| | Total Rate - | **485** | **595** | **250** |

श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय असून, रुग्णालयातील सर्वच Procedure चे दर कमी आकारले जातात. या रुग्णालयात उपचार घेणारे रुग्ण हे परिस्थीतीने गरीब व दारीद्रय रेषेखालील असतात. या गोष्टींचा विचार करुन, श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु करावयाच्या BLOOD GAS WITH ELECTROLYTES तपासणीचे दर रु. ३३०/- याप्रमाणे आकारता येतील.

BLOOD GAS WITH ELECTROLYTES या दोन्ही तपासण्या श्री साईनाथ रुग्णालयाकडे उपलब्ध असलेल्या मशिनवर एकाच वेळी होतात. दोन्ही तपासण्या वेगवेगळया करण्याची सुविधा नसल्याने दोन्ही तपासण्याचे दर एकत्र दर्शविलेले आहे. सदरचे प्रस्तावीत दर हे श्री साईनाथ रुग्णालयात तपासणीसाठी श्री साईनाथ रुग्णालयास कार्टीज, सिरिंज यांच्या सध्या बाजारात असलेल्या किमती व रुग्णालयातील इतर खर्च विचारात घेता, सदर तपासणीकामी खालील प्रमाणे प्रस्तावीत दर श्री साईनाथ रुग्णालयात आकारण्यात यावेत असे मत आहे.

| **अ.नं.** | **सदर स्टेस्टसाठी लागणारे मटेरियल व इतर साहीत्य.** | **आवश्यक खर्च** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ०१ | Rate of Cartridge | रु. २९०/- | **रु. ३३०/-** |
| ०२ | Syringe, needle, etc. | रु. १०/- | |
| ०३ | Overheads Charge | रु. ३०/- | |

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळेत नव्याने सुरु करावयाचे BLOOD GAS WITH ELECTROLYTES या तपासणीकरीता रु. ३३०/- इतका एकत्रित दर आकारणी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ४९९** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळेत नव्याने सुरु करावयाचे BLOOD GAS WITH ELECTROLYTES या तपासणीकरीता रु. ३३०/- इतका एकत्रित दर आकारणी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षका/वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४** **मे सिमेंन्स कंपनीचे ५०० एमए एक्स-रे मशिनचे एक्स-रे ट्यूब बदलणेकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र. ५००** **सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५** **डिफीब्रीलेटर मशिनचे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा हॉस्पिटलचे अतिदक्षता विभाग व ऑपरेशन थिएटर्समध्ये अत्यवस्थ रुग्णांना डिफीब्रीलेशन करणेकामी वापरले जाणारे M/s. Medtronics Emergency Response Systems Inc. USA या उत्पादक कंपनीचे Life Pack २० डिफीब्रीलेटर्स -०५ नग सन २००६ या वर्षी कंपनीचे तेव्हाचे भारतातील अधिकृत विक्रेते मे. बी. पी. एल. लि., मुंबई यांचेकडुन खरेदी करणेत आले आहेत. सदर डिफीब्रीलेटर्सचा एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर सदर मशीनची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टसची आवश्यकता असल्यास मशीन कंपनीकडे पाठवुन अथवा स्पेअर पार्ट खरेदी करुन मशीन दुरुस्त केले जाते.

सध्या वरीलपैकी ०१ नग डिफ़ीब्रीलेटर मशीन नादुरुस्त झाले असुन तपासणी अंती मशीनचा पॉवर सप्लाय मॉडयुल रात्रीच्या वेळी वाढणाऱ्या विजेच्या दाबामुळे खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाबतीत डिफीब्रीलेटर मशीनचे पुरवठाधारक मे. बी. पी. एल. लि. मुंबई यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी पॉवर सप्लाय मॉडयुल ०१ नग करीता सर्व करांसहीत एकुण रु. ८४,३७५ /- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे.

परंतु डिफीब्रीलेटर मशीनच्या उत्पादक कंपनीचे भारतातील सध्याचे सर्व्हिस डीलर मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेशी संपर्क साधला असता कंपनीने सदरचा पॉवर सप्लाय बोर्ड बदलणेकामी येणाऱ्या खर्चाचे सर्व करांसहीत एकुण रु. ५५,०००/- (अक्षरी रु. पंचावन्न हजार मात्र)

इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. सदर पॉवर सप्लाय मॉडयुलसाठी कंपनी सहा महिन्याची वॉरंटी देत आहे.

तरी ०१ नग डिफीब्रीलेटर मशीनचा पॉवर सप्लाय मॉडयुल मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व सदर कामी येणाऱ्या एकुण रु. ५५,०००/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५०१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे डिफीब्रीलेटर मशीनचा पॉवर सप्लाय मॉडयुल मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व सदर कामी येणाऱ्या एकुण रु. ५५,०००/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६ शिर्डी शहरातील नगर-मनमाड या राजमार्गावरील दुभाजकाचे ५०० मीटर अंतरावर सुशोभिकरण करणे बाबत**

**प्रस्ताव -** अहमदनगर-मनमाड राजमार्गावरील शिर्डी शहरातुन जाणाऱ्या रस्त्याच्या मध्यावर वाहतुक सुरळीत होणेसाठी बनविण्यात आलेल्या दुभाजकाचे सुशोभिकरण (१४२५ मी.लांबीचा व १.४ मी.रुंदी) करण्यात आले आहे. या दुभाजकाचे वेळो-वेळी संस्थान मार्फत सुशोभिकरण करण्यात आलेले आहे.

शिर्डी गर्दीच्या काळात येणारे साईभक्तांची संख्या जास्त असते.त्यामुळे दुभाजका मधुन साईभक्त ये-जा करतात परिणामी दुभाजकातील झाडे/रोपे खराब होतात.या बाबत मा. अध्यक्ष सो.व मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे समावेत दि. ०१/०५/२०१०. रोजी सविस्तर चर्चा झाली. त्यामुळे सदर चर्चेत अहमदनगर-मनमाड राजमार्गावरील दुभाजक प्रायोगिक तक्तावर (outsource) पध्दतीने सुशोभिकरण व देखभाल करणे योग्य होईल असे ठरले.सदर दुभाजकामध्ये कन्हेर-४ कलर,बोगन वेल-३ कलर , बिट्टी ,भुजा या झाडांची लागवड करावयाची आहे.(उंची २ ते २ ।। फुट ) झाडांची लागवड करण, त्यांना पाणी देणे, खत देणे ,दुभाजकाची साफ-सफाई करणे,लागवड झालेल्या पैकी नाश होणाऱ्याझाडांची पुर्नलागवड करणे त्यांची सुरक्षा करणे,असे कामाचे स्वरुप ठेवता येईल.

एकुण १४२५ मी.लांबीचा दुभाजकामध्ये outsource पध्दतीने सुशोभिकरण करणेकामी अंदाजे रु.२.५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.पैकी प्रथम टप्प्यात ५०० मी लांबीत काम हाती घेता येईल. सदरची कार्यवाही त्वरीत सुरु करणेकामी जा.न.एसएसएस/वशी -बगीचा /७०८२/२०१०. दि.०७/०५/२०१० अन्वये कोटेशन मागविण्यात आलेले होते.त्याचा तपशिल खालील प्रमाणे .

| अ.न. | पार्टीचे नाव | आवक नंबर / दिनांक | रक्कम ५०० मी.साठी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री प्रशांत लक्ष्मण यलमाने,मनमाड | १२७८३/१०-५-२०१० | रु. १३६५००.०० |
| ०२ | श्री हरीचंद्र एकनाथ फापाळे,धुळे | १२७८४/१०-५-२०१० | रु. ९९९९९.०० |
| ०३ | श्री किशोर विजय पाटील,फागणे | १२७८५/१०-५-२०१० | रु. १३५०००.०० |

उघडण्यात आलेल्या कोटेशन मध्ये अ.क्र ०२ श्री हरीचंद्र एकनाथ फापाळे,धुळे यांचे दर रु.९९,९९९/-सर्वात न्युनत्तम असल्याने राज्यमार्ग क्र १० चे दुभाजका मध्ये सुशोभित झाडांची लागवड करण्याचे काम ५०० मीटर साठी (०१ महिना +०३ महिना )संगोपन करण्याचे श्री फापाळे त्यांना देण्यात आलेले आहे.

**निर्णय क्र. ५०२ उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७ गावरान तूप खरेदी बाबत**

**प्रस्ताव -** मा.व्यवस्थापन मंडळ सभा दि.२७.०१.२०१० निर्णय क्र.७१ अन्वये सन २०१०-११ करिता ८००० क्विंटल गावरान तुप खरेदी दोन टप्प्यात करणेस तत्वतः मान्यता देणेत आली होती, त्यानुसार पहिल्या सहामाही करिता (दि.०१.०४.२०१० ते दि.३०.०९.२०१०) निविदा विक्री करुन प्राप्त झालेल्या नमुन्यांपैकी मा.विश्वस्त मंडळ उपसमिती सभा दि.११.०३.२०१० रोजी सदर नमुन्यांमधून १. गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. ता. सह. दुध उत्पादक संघ यांचे गोदावरी ब्रॅण्डचे तुप, २. मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड यांचे शगुन ब्रॅण्डचे तुप तर ३. मे.बाफना बाजार यांचे अमुल, हटसन, कान्हा, महारतन असे चार ब्रॅण्डचे नमुने निवडलेले होते.

निवडलेल्या नमुनेधारकांना दि.०३.०४.२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळाचे उपसमितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. चर्चेअंती मा.विश्वस्तांनी असे सुचविले की, सर्व निवडलेले नमुने प्रसादालयात वापरण्यास देऊन प्रसादालयाच्या अभिप्रायानंतर तुप खरेदीबाबत योग्य तो निर्णय घेता येईल. सदर तुपाबाबतचा क्रमवारीनुसार अहवाल दि.१८.०४.२०१० रोजीचे मा.व्य.मं.सभेत सादर करण्यात आला व त्यावर सविस्तर चर्चा होऊन हटसन कंपनीचे गावरान तुप क्रमवारीनुसार प्रथम क्रमांकावर असल्याने सदर तुप खरेदी करावे असे ठरले. परंतू नंतर मा.विश्वतांनी

हटसन ब्रॅण्डची उत्पादक कंपनीस समक्ष भेट दिल्यानंतर अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. त्यानुसार दि.२७.०४.२०१० रोजी मा.विश्वस्त हटसन ब्रॅण्डची कंपनीस भेट देणेकामी चेन्नई येथे जाणार होते परंतू काही तांत्रिक कारणामुळे सदरचा दौरा रद्द झाला असून तो दि.१०.०५.२०१० नंतर करण्यात येईल असे कळविले आहे. त्यामुळे सन २०१०-११ साठी पहिल्या सहामाही करिता गावरान तुप खरेदीबाबतचा निर्णय प्रलंबित आहे.

सध्या उन्हाळी सुट्टयांमुळे साईभक्तांचे गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. परिणामी श्रींचा प्रसाद असलेल्या लाडूच्या विक्रीत देखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. लाडू तयार करण्यासाठी आवश्यक गावरान तुप खरेदी प्रलंबित असल्याने तुपाअभावी साईभक्तांना सेवा देण्यास अडचण निर्माण होऊ नये याकरिता सन २००९-१० चे दुसरे सहामाहीसाठी मे.बाफना बाजार, नाशिक यांचे कान्हा ब्रॅण्डचे गावरान तुप प्रती किलो रु.२४१/- (व्हॅटसह) खरेदी करण्यात आले होते, त्यांना पुढील निर्णय होऊपावेतो त्याच दराने गावरान तुपचा पुरवठा करणेबाबत विनंती केली असता, त्यांनी मागील मान्य दरातच गावरान तुपाचा पुरवठा करण्याचे मान्य केले.

त्यानंतर खरेदी विभागाकडील दि.२०.०४.२०१० चे मंजुर टिप्पणी नुसार व मा.अध्यक्ष सो. यांचे सुचनेनुसार मे.बाफना बाजार, नाशिक यांचे कडून कान्हा ब्रॅण्डचे गावरान तुप मागील मान्य दर प्रती किलो रु.२४१/- (व्हॅटसह) या दराने ९० क्विंटल व दि.०३.०५.२०१० रोजीचे मंजुर टिप्पणीनुसार ३६० क्विंटल तुप खरेदी करण्यात आले आहे.

तरी मे.बाफना बाजार, नाशिक यांचेकडून कान्हा ब्रॅण्डचे गावरान तुप मागील मान्य दर प्रती किलो रु. २४१/- (व्हॅटसह) या दराने उपरोक्त प्रमाणे ९०+३६०= ४५० क्विंटल खरेदीस व त्याकामी आलेल्या रक्कम रु.१,०८,४५,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यते मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र. ५०३ उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८ अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नविन बेंचेस खरेदीसाठी आलेले नमुन पहाणे व कोटेशन उघडणेबाबत.**

**प्रस्ताव -** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.१०.२००६ मधील निर्णय क्रमांक ८६४ नुसार अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना बसण्याकरिता आवश्यक असणारे ९१,०२२ नग बेंचेस खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१०,००,००,०००/- (दहा कोटी) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार याकामी दि.२८.०२.२०१० चे वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदांची विक्री शिर्डी व मुंबई कार्यालय येथून करण्यात आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | आवक क्रमांक /दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गोदरेज ॲण्ड बायो.लि. पुणे | ८२६४/२५.०३.२०१० |
| ०२. | फेदरलाईट ऑफिस सिस्टीम प्रा.लि, मुंबई | ८२६३/२५.०३.२०१० |
| ०३. | स्टील केस, मुंबई | ८२६२/२५.०३.२०१० |
| ०४. | मे.दुराणी इंडस्ट्रीज लि.मुंबई | मु.का.५३५/२५.०३.२०१० |

प्राप्त चार निविदा उघडणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० रोजीचे सभेत सादर केला होता. परंतू त्यावेळी सदर विषयावर चर्चा होऊन प्रथम नमुना पसंत करुन घ्यावा व नंतर पुढील कार्यवाही करावी असे ठरले. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा व बेंचेसचे नमुने यांचा तपशिल असलेले परिशिष्ठ सोबत जोडले आहे.

तरी प्राप्त नमुन्यांपैकी नमुना निवडून, निविदा उघडून निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र. ५०४ उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या बेंचेसच्या नमुन्याची पहाणी सदस्यांनी केली. याकामी प्राप्त झालेल्या निविदा व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे उघडून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/प्राचार्य,आय.टी.आय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९ बचत गटाकडून गोडा मसाला खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव -** प्रसादालयामध्ये प्रसादभोजनासाठी वापरणेत येणारे मसाला साहित्य उदा. मिरची, हळद, धने व कच्चा मसाला हा निर्भेळ व दर्जेदार असावा म्हणून पूर्वीपासून तयार पद्धतीचा मसाला न वापरता कच्चे साहित्य मागवून प्रसादालयातील ग्राईंडरमध्ये मसाला दळण्यात येतो व तयार करुन वापरण्यात येतो.

अहमदनगर जिल्यातील बचतगटांनी तयार केलेली उत्पादने संस्थानने प्राधान्याने खरेदी करावीत असे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कळविले आहे. तसेच मा.अध्यक्ष सो. यांनी देखील वेळोवेळी बचतगटांकडून तयार गोडा (गरम) मसाला खरेदी करावा असे कळविले आहे. त्यानुसार सध्या श्रीराम महिला बचत गट व विजयी महिला बचत गट, श्रीरामपुर या बचतगटांकडून गोडा मसाला खरेदी करणेत येतो.

प्रसादालय विभागाचे दि.०७.०५.२०१० चे मंजुर टिपणीनुसार त्यांनी कळविले आहे की, प्रसादालयास एका वर्षासाठी अंदाजे २६०० किलो मसाला आवश्यक आहे. प्रसादालयातील प्रसाद भोजनातील पदार्थाची चव, दर्जा एकसारखा व चांगला राहावा म्हणून, वर्षभरातील एकुण आवश्यक परिमाणाचे १/४ गोडा मसाला असावा व ३/४ परिमाण कच्चा मसाला साहित्य असे असावे. त्यानुसार २६०० किलोचे एक चर्तुथांश म्हणजे ६५० किलो गोडा मसाला हा बचत गटांकडून आवश्यकतेप्रमाणे खरेदी करण्यात यावा.

तरी उपरोक्त प्रमाणे ६५० किलो गोडा मसाला बचत गटांकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस अथवा सध्या ज्या बचत गटांकडून गोडा मसाला घेत आहोत त्यांचेकडून आवश्यकतेनुसारे रोटेशन पद्धतीने गोडा मसाला खरीदणेस व खरेदीकामी अंदाजे प्रती किलो रु.२५०/- दराने येणारे रुपये १,६२,५००/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ५०५ उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. प्रसादालयासाठी आवश्यक असणारा गोडा मसाला प्रसादालयातच तयार करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १० लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलर करिता इंधन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव -** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये निवासस्थाने, साईनाथ रुग्णालय, साईबाबा रुग्णालय, मंदिर, वाहन इ. विभागाकडील चादर,बेडशीट,रग,गादी कव्हर,उशीकव्हर,लिनन, ॲप्रन, बसेसचे शीट कव्हर,आदी कपडे धुवून इस्त्री करुन देण्यात येतात. याकामी लॉण्ड्रीकडे कामकाज दोन पाळयांमध्ये करण्यात येत आहे. सदरचे कपडे धुण्याचे कामी २ युनिट (दोन मशिनरी) कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्याद्वारे प्रतिदिवशी साधारणपणे १५०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात.

धुण्यासाठी येणा-या कपडयामध्ये प्रामुख्याने रुग्णालयाकडील रुग्णांचे गणवेश,ब्लॅकेट,सफेद रंगाचे ॲप्रन कपडे, बेडशीट हे जास्तीत जास्त प्रमाणात असतात त्यात बहुतेक कपडयावर रक्तांचे डाग पडलेले असतात. सदरचे डाग सहजासहजी एका धुण्यात निघत नाही म्हणुन वाशिंग मशिनमध्ये स्टिम बॉयलरव्दारे स्टिम सोडुन निरजंतुकीकरण करुन धुतले जातात पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी स्टीम बॉयलरव्दारे स्टीम देवून कपडे सुकविले जाते. धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडरींग मशिनचा दैनंदिन वापर केला जातो कपडे इस्त्रीकरणेसाठी कॅलेन्डरींग मशिनला स्टीम सोडावी लागते त्यानंतर कपडे सुकून इस्त्री होवून बाहेर पडतात यासर्व मशिनरीसाठी स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे. त्याकरीता डिझेल, आईल, ग्रीस शिर्डी परिसरातील श्री साई सर्व्हिस सेन्टर, सावळविहीर यांचे पेट्रोल पंपावरुन २६०० लिटर डिझेल आवश्यकते नुसार खरेदी करुन वापरण्यात आलेले आहे.

स्टीम बॉयलरसाठी दररोज सरासरी २५ लिटर डिझेल (दरमहा ७५० लि. डिझेल) लागते, एका वर्षाकरीता १२ लिटर ऑईल व ५ किलो ग्रीस लागते.

तरी माहे जुलै-२०१० ते माहे जुन-२०११ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ९२०० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी १२ लिटर ऑईल व लॉड्रीतील सर्व मशिनरीसाठी ५ किलो ग्रीस आवश्यकता असुन त्याकामी रु.४,२०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख वीस हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे डिझेल, आईल, ग्रीस शिर्डी व परीसरातील पेट्रोल पंपावरुन खरेदी करता येईल.

वरीलप्रमाणे इंधन खरेदीस अंदाजे रुपये ४,२०,०००/- (अक्षरी रु.चार लाख वीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सन २०१० - २०११ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये धुलाई व गणवेश खर्च याबाबीकरीता रुपये. ६,००,०००/- मात्रची तरतुद आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे शिर्डी व परिसरातील पेट्रोल पंपावरुन डिझेल खरेदी करण्यास आणि त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५०६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे माहे जुलै-२०१० ते माहे जुन-२०११ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ९२०० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी १२ लिटर ऑईल व लॉड्रीतील सर्व मशिनरीसाठी ५ किलो ग्रीस शिर्डी व परीसरातील पेट्रोल पंपावरुन खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,२०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११ पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर मनमाड रोडवरील दर्शन लाईन मंडपामध्ये विद्युतीकरण करणे बाबत**

**प्रस्ताव -** साईभक्तांची दर्शनव्यवस्था सुलभ व जलद व्हावी, त्यांचे ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण व्हावे याकरीता प्रवेशव्दार क्र.०२ च्या उत्तर बाजूस मनोजकुमार गोस्वामी मार्गावर (जुना पिंपळवाडी रोड)

पुर्व-पश्चिम असा रस्त्याचे मध्यापासून एका बाजूस १९० मीटर व तसेच प्रवेशव्दार क्र.०१ व ०५ च्या पश्चिम बाजूस फूटपाथवर उत्तर-दक्षिण असा ११४ मीटर कायमस्वरुपी मंडप बांधकाम विभागामार्फत उभारण्यात आलेला आहे.

मंडप उभारणीच्या कामामध्ये विद्युतीकरण कामाचा समावेश करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे सदरील मंडपामध्ये विद्युतीकरणाचे काम करुन घ्यावे लागणार आहे.

पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर-मनमाड रोडवरील दर्शन लाईन मंडपामध्ये विद्युतीकरण कामाची माहिती तसेच येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | NON CSR | Supplying & Erecting 3x2.5 Sq.mm. FR stranded Copper insulated wire for light/fan Point wiring. | 75 Nos. | 475.00 | 25,625.00 |
| 02) | CSR P.N.10 NOTE NO.1 | Supplying & Erecting 2x2.5 Sq.mm. and earth wire 2.5 sq.mm. | 1200 Mtr. | 47.50 | 57,000.00 |
| 03) | 1-1-4 | Supplying & laying ISI Mark rigid steel conduit 16 SWG, 25mm diameter. | 650 Mtr. | 123.90 | 80,535.00 |
| 04) | 2-1-47 | Supplying & Erecting compact Fluo. Lamps 65W | 75 Nos. | 640.50 | 48,037.50 |
| 05) | 9-1-2 | Supplying & Erecting copper earth plate size 30x30x06cm | 002 Nos. | 2,625.00 | 5,250.00 |
| 06) | 5-3-3 | Supplying, Erecting and marking SPMCB 6A to 32A C | 96 Nos. | 162.75 | 15,624.00 |
| 07) | 5-4-11 | Supplying & Erecting tripple pole and neutral distribution board (TPNDB) with door 8 ways D.B. | 001 Nos. | 6,381.90 | 6,381.90 |
| 08) | 5-4-12 | Supplying & Erecting tripple pole neutral distribution board (TPNDB) with door. 12 Way D.B. | 002 Nos. | 8,128.05 | 16,256.10 |
| 09) | 2-7-6 | Supplying and erecting 'B' grade G.I.pipe / M.S. pipe down rod. | 80 Mtr. | 119.70 | 9,576.00 |
| 10) | 9-2-2 | Supplying & Erecting copper strip of required size. | 012 Kg. | 526.05 | 6,312.60 |
| 11) | 5-6-7 | Providing erecting & commissioning 80 A. RCCB | 003 Nos. | 4,442.55 | 13,327.65 |
| 12) | 6-1-3 | G.I. sheet 1.6mm (16guage) to be used for fabrication of boxes. | 10Sq Mtr. | 1,634.85 | 16,348.50 |
| | | | Total :- | | 3,10,274.25 |
| | | | **Round Up Rs.** | | **3,10,274.00** |

उपरोक्तप्रमाणे पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर-मनमाड रोडवरील दर्शन लाईन मंडपामध्ये विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.३,१०,२७४/-इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ५०७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पिंपळवाडी रोडवरील तसेच नगर-मनमाड रोडवरील दर्शन लाईन मंडपामध्ये विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.३,१०,२७४/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२ एनर्जी ऑडिट बाबत.**

**प्रस्ताव -** सध्या वीजेच्या जाणवणाऱ्या वीज तुटवडा कमी करण्यासाठी केंद्र सरकारमार्फत एनर्जी कॉन्झर्व्हेशन ॲक्ट २००१ पास झाला आहे. वीजेचा वापर कमी करून वीजेची मागणी व वीजेचे उत्पादन यातील दरी कमी करू शकतो. यासाठी एनर्जी ऑडीट महत्त्वाचे आहे.

या एनर्जी ऑडीटमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

| | |
|---|---|
| ०१). योग्य क्षमतेच्या वीजेच्या दिव्यांचा वापर | ०२)झिरो पॉवर कन्झम्प्शन रेग्युलेटरचा वापर |
| ०३). लोड कन्ट्रोल करून मॅक्झीमम डिमांड कमी करणे | ०४)वापरलले युनिटस व मॅक्झीमम डिमांड यांचे गुणोत्तर |
| ०५). पॉवर फॅक्टर वाढविण्यासाठी कॅपॅसिटरचा उपयोग | ०६). इफिशिएन्ट स्ट्रीट लाईटचा उपयोग |
| ०७). ६० % पेक्षा जास्त लोडने चालणाऱ्या इलेक्ट्रिकल मोटारी | |

एनर्जी सेव्हींगजमध्ये इलेक्ट्रिकल सुपरवायझर, वायरमन व इतर टेक्नीकल स्टाफचा फार मोठा हातभार असतो कारण सेव्हींग्जची सुरुवात तळाच्या कर्मचाऱ्यापासून होते. याकरीता त्यांना प्रशिक्षण देणे हा केंद्र सरकारच्या ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिएन्ट मिनिस्ट्री ऑफ पॉवर यांच्या ध्येयधोरणातील एक भाग असून त्याकरीता खालीलप्रमाणे मुद्द्यांवर विचार करावा लागणार आहे.

०१). कर्मचाऱ्यांची वर्तमान क्षमता व त्यांची काम करण्याची पद्धत
०२). वर्किंग स्टाफच्या कामकाज जबाबदारीत सुधारणा / बदल
०३). एनर्जी सेव्हींग्जमध्ये त्यांची सजगता
०४). कामकाज पद्धतीमध्ये स्टिप्युलेशन
०५). सेफ्टि मेझरस वापर करण्यामध्ये त्यांची सजगता व ज्ञान
०६). पब्लिककरीता असणाऱ्या सेफ्टि मेझरससंबंधी त्यांची सजगता व ज्ञान
०७) ग्रीन बिल्डींगबाबत माहीती व कार्यवाही
०८) एको फ्रेंडली इन्स्टालेशन्स

एनर्जी ऑडीटमध्ये स्टाफकडून केल्या जाणाऱ्या कामामध्ये त्यांचे कामाबद्दलचे ज्ञान, कामात झोकून देण्याची प्रवृत्ती , नियमावली व कामातील जबाबदारी याचाही आढावा घेतला जातो. कारण जेव्हा स्टाफ स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखून काम करू लागेल व टेक्नीकली त्याचे ज्ञान वाढले जाईल तेव्हा एनर्जी सेव्हिंग्जचे लक्ष्य काही प्रमाणात आपोआप गाठले जाते.

एनर्जी ऑडीटमध्ये सध्याचा वीज वापर तपासून त्यानुसार एनर्जी सेव्हींग्जकरीता उपाययोजना केल्यास वीज वापर १५ % ते १६ % नी कमी होतो.

याकामी जगप्रसिद्ध मे. सिमेन्स लि. या कंपनीने संस्थानचे एनर्जी ऑडीट करून देण्याबाबत पत्र दिले असून त्यांच्या (१) श्री. सचिन भानुशाली- प्रमुख- कस्टमर केअर - सिमेन्स (२) श्री. रोहीत पटेल- प्रमुख- ऑपरेशन- सिमेन्स (३) श्री. आशिश देशपांडे - प्रमुख- मेन्टेनस - सिमेन्स या अत्यंत वरीष्ठ अधिकाऱ्यांनी संस्थानला दि. २ फेब्रुवारी २०१० ला भेट दिली होती. व पाहणी केली होती. काही दिवसानंतर त्यांच्या काही इंजिनिअर्सनी शिरडीस येऊन संस्थान इमारतींची व त्यात बसविण्यात आलेल्या इलेक्ट्रिक्ल इन्स्टालेशन्सची पाहणी केली. व माहिती घेतली.

आता मे. सिमेन्स लि.या कंपनीने याबाबत संस्थानचे एनर्जी ऑडीट करून देण्याबाबत प्रस्ताव सादर केला असून त्यानी रु.४,००,०००/- + सर्व्हिस टॅक्स इतका खर्च कळविला असून यासंबंधी मे. सिमेन्स लि.या कंपनीचे श्री. सचिन भानुशाली- प्रमुख- कस्टमर केअर - सिमेन्स यांना मा. व्यवस्थापन समितीच्या मा. सदस्यांना या कामाबाबत माहिती देणेसाठी शिर्डी येथे दि.२२ मे २०१० रोजी समक्ष बोलाविण्यात आलेले होते.

यानंतर सिमेन्स कंपनीचे श्री सचिन भानुशाली यांनी सिमेन्स कंपनीमार्फत श्री साईबाबांची सेवा व्हावी म्हणून एनर्जी ऑडीटसाठी कुठलीही फी सिमेन्स कंपनी घेणार नाही. परंतू एनर्जी ऑडीटचे काम चालू झाल्यानंतर सिमेन्स कंपनीचे इंजिनिअर्स, ऑडीटर्स हे ज्या ज्या वेळी वेळी एनर्जी ऑडीटचे कामासाठी शिर्डी येथे येतील त्या त्या वेळी त्यांना दोन ए.सी. रुम्स व प्रसादालयात व्ही.आयपी कक्षात जेवण संस्थानमार्फत विनामोबदला देण्यात यावे. हे तंत्रज्ञ, ऑडीटर्स शिर्डीत एनर्जी ऑडीटच्या कामासाठी सलग रहाणार नसून पंधरा दिवसातून दोन ते चार दिवस ते शिर्डीत रहाणार आहेत. या कालावधीत एनर्जी ऑडीटचे काम संपेपर्यत त्या त्या वेळी ए.सी. रुम्स व प्रसादालयात व्ही.आयपी कक्षात जेवण संस्थानमार्फत विनामोबदला मिळाव्यात अशी विनंती केली.

**निर्णय क्र. ५०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन सिमेन्स कंपनीचे श्री सचिन भानुशाली यांचे निवेदनाप्रमाणे सिमेन्स कंपनी ही एनर्जी ऑडीटचे काम मोफत करणार असल्याने एनर्जी ऑडीटचे काळात सिमेन्स कंपनीचे इंजिनिअर्स, ऑडीटर्स हे शिर्डीत ज्या ज्या वेळी येतील त्या त्या वेळी त्यांना दोन ए.सी रुम्स व प्रसादालयातील व्ही.आय.पी. कक्षात जेवण विनामोबदला संस्थानमार्फत देण्यात यावे एनर्जी ऑडीटचे काम पूर्ण होईपर्यतच ही सवलत देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख/अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १३** **समाधी मंदीरात सेंट्रल ए.सी.यंत्रणा बसविणे संदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत**

**प्रस्ताव -** समाधी मंदिरात दैनंदिन चार आरत्या होतात. प्रत्येक आरतीसाठी किमान अर्धा तास मंदिरात उभे रहावे लागते. समाधी चौथ-याजवळ अथवा चांदीचे खांबाजवळ व्ही.आय.पी.मान्यवर उभे असतात. तसेच नंदीगेट पासून सभामंडप ते गाभारा यामध्ये साईभक्त आरती तसेच दर्शनासाठी उभे असतात. यावेळी मंदिरात दमट वातावरण निर्माण होते. त्यामुळे भक्तांना चक्कर येणे, दम कोंदणे, घबराट होणे, तसेच दमा रोगाचे पेशंट असतील तर श्वास घ्यायला त्रास होतो.

मंदिरात सध्या बसविलेले स्प्लीट ए.सी.चा फारसा परिणाम जाणवत नसल्याने मंदिरात सध्या बसविलेले स्प्लीट ए.सी.चा काढून घेऊन त्याऐवजी सभामंडपाच्या टेरेसवर सेंट्रल ए.सी.मशिनरी बसवून तेथून योग्य त्या मापाची ए.सी.ची पाईप लाईन / डक्ट टाकणेकरीता मा.व्य.समितीचे दि.०९-०८-२००९ चे सभेतील विषय क्र. ४० निर्णय क्र. ६९६ अन्वये ,

(१) समाधी मंदिरात सेंट्रल ए.सी.बसविणेकामी मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांना कन्सल्टंट म्हणून नेमणेस ठरले. तसेच त्यांची होणारी कन्सल्टंट फी त्यांना आदा करणेस

(२) समाधी मंदिरात सेन्ट्रल ए.सी.बसविणेकामी लागणा-या योग्य खर्चास

(३) यासाठी साईभक्त श्री.राजीव खन्ना, मुंबई यांनी जर सर्व खर्च, देणगी म्हणून दिला तर तो स्विकारणेस अन्यथा नकार दिल्यास वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर बोलविणेस, मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार मे.डिझाईन इंजिनिअर्स,मुंबई यांना संस्थानने पत्र पाठवून टेंडर व ड्रॉईंग तयार करणेस सांगितले. त्यानुसार मे.डिझाईन इंजिनिअर्सचे श्री.रणदिवे यानी पाच ते सहा वेळा स्वत: येऊन त्यांनी पाहणी केली व त्यानंतर त्यांचे प्रतिनिधी यांनी वारंवार मंदिरात भेट देऊन इस्टिमेट व रिपोर्ट तयार करुन दिनांक ८ एप्रिल, २००९ रोजी सादर केले होते.

परंतू सदर रिपोर्टमध्ये ए.सी.यंत्रणेकरीता किती वीजेचा वापर होईल, याचा उल्लेख नव्हता. तसेच मंदिरामध्ये डक्ट टाकण्याचे ड्रॉईंग सोबत नसल्याने मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांना कळविले. त्यानुसार त्यांनी सुधारित इस्टिमेट व ड्रॉईंग तयार करुन आता पाठविलेले आहे.

रिपोर्टमध्ये वीजेचा २८० KW लोड दाखविलेला असून एवढा लोड सध्याच्या यंत्रणेतून जोडता येणे शक्य नाही. त्याकरीता वेगळे सबस्टेशन उभारावे लागेल. तसेच नविन जनसेट बसवावा लागेल. याकामी रक्कम रुपये ८०,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांनी या यंत्रणेकरीता रुपये १,८०,००,०००/- इतका खर्च कळविला आहे. एकुण अपेक्षित खर्च रुपये २,६०,००,०००/- (दोन कोटी साठ लाख) आहे.

यासंबंधी मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबईचे श्री. रणदिवे यांना मा. व्यवस्थापन समितीच्या मा. सदस्यांना या कामाबाबत माहिती देणेसाठी शिर्डी येथे दि.२२ मे २०१० रोजी समक्ष बोलाविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबईचे श्री. रणदिवे यांचेशी चर्चा करून त्यावर निर्णय होणेबाबत विनंती आहे.

**निर्णय क्र. ५०९ सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४ मध्यवर्ती भांडार व श्री साईनाथ रुग्णालय येथील दुरध्वनी विस्तारीकरणाबाबत**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा हॉस्पिटल येथील दूरध्वनी एक्सचेंजमधून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये संपर्कासाठी अंतर्गत दूरध्वनी देण्यात आलेले आहे. साईनाथ रुग्णालय-इमारतीचे तळमजल्यातील खोल्यांमध्ये दूरध्वनी केबल केसींग केपींग पध्दतीने सुव्यवस्थित टाकण्यात आलेली आहे. परंतु, वरील मजल्यांवर सदर केबलसाठी केसींग केपींग पध्दतीने न टाकता विविध ठिकाणी टांगती आहे. केबल टांगती ठेवल्याने तिचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य नुकसान टाळणेसाठी तसेच केबल सुव्यवस्थीत राहणेसाठी सदर केबल केसींग केपींग पध्दतीने टाकावी लागणार आहे. तसेच धर्मशाळेची समोरच्या इमारतीमध्ये रुग्णालयासाठी खोल्या तयार केलेल्या आहे. सदर इमारतीमध्ये काही ठिकाणी अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन दिलेले आहे. परंतु, काही ठिकाणी देणे बाकी आहे. साईनाथ रुग्णालयाने आणखी १५ कनेक्शनची मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीमधील केबल केसींग केपींग करणे तसेच नवीन अंतर्गत दूरध्वनी कनेक्शन देणे आदिंसाठी तेथील दूरध्वनी जाळ्याचे विस्तारिकरण करावे लागणार आहे. सदर विस्तारिकरणासाठी खालील तपशीलाप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे

| Sr. No | Description | Qty. | Approx Rate | Approx. Price | |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Supply & erection of telephone cable 2 pair (0.5mm Polly cap copper) in provided conduit | 1200 Mtr. | 16.80 per mtr. | 20160 | 00 |
| 02. | Supply & erection of telephone cable 10 pair Polly cap copper | 140 | 56.70 per Mtr. | 7938 | 00 |
| 03. | Supply & erection of telephone cable 20 pair Polly cap copper | 160 | 105.00 | 16800 | 00 |
| 04. | Telephone socket modular (Anchor) | 28 Nos. | 97.65 | 2734 | 20 |
| 05. | Modular surface 1 model switch box (Anchor) | 28 Nos. | 108.20 | 3028 | 20 |
| 06. | Casing capping 25 mm. | 500 mtr. | 34.65 | 17325 | 00 |
| 07. | Supply & erection of jelly field 10 pair telephone cable Polly cap copper | 500 mtr. | 93.45 | 46725 | 00 |
| 08. | Supply & erection of Junction box for 10 pair | 1 Nos. | 580.70 | 580 | 70 |
| 09. | Supply & erection of Junction box for 20 pair | 1 Nos. | 619.50 | 619 | 50 |
| | | | **TOTAL** | **115910** | **60** |

मध्यवर्ती भांडार व श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतींमधील दूरध्वनी केबल केसींग केपींग करणे विविध ठिकाणी अंतर्गत दूरध्वनी देणे आदिंसाठी उपरोक्त तपशीलाप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार असून, यासाठी अंदाजे रुपये १,१६,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. सदर साहित्य खरेदीची

कार्यवाही दूरध्वनी साहित्यांचे विविध अधिकृत पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून करता करता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, मध्यवर्ती भांडार व श्री साईनाथ रुग्णालय येथील दूरध्वनी विस्तरिकरणासाठी दूरध्वनी साहित्य खरेदी कामी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम दरपत्रकधारकाकडून सदर साहित्य खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१६,०००/- पर्यंतच्या खर्चाचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र. ५१० यावर सविस्तर चर्चा होऊन, मध्यवर्ती भांडारला ग्रुप मोबाईल देऊन साईनाथ रुग्णालयात अंतर्गत दुरध्वनी विस्तारीकरणासाठी रुपये ६९,०००/ - इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-आय.टी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १५ एलइडी टीव्ही खरेदीबाबत**

**प्रस्ताव -** श्री च्यां मंदिरात व परीसरात टिव्हीच्यां स्क्रीनवर श्रींचे दर्शन व्हावे यासाठी LCD टिव्ही बसवलेली आहेत.परंतू एल.सी.डी. टीव्हीचे दृष्य दिवसा व उन्हात दिसत नाही. हल्ली नविन टेक्नॉलॉजीचे एल.इ.डी टीव्ही वर चित्र दिवसा, उन्हात व सर्व ऋतुंमध्ये सुध्दा खुपच सुस्पष्ट दिसते.असे टीव्ही मोठया शहरातील रेल्वे स्टेशन, मोठे मॉलच्या जाहिरातीसाठी तसेच क्रीकेटच्या स्टेडीयममध्ये असतात.

एल.इ.डी. टीव्ही हैद्राबाद येथिल MIC इलेक्ट्रॉनीक्स लीमीटेड ह्या कंपनीत तयार करतात. या कंपनीकडून तिरूपती देवस्थानने टीव्ही खरेदि केलेले आहे सदर कंपनीचे प्रतिनीधी श्री व्ही.के.प्रसाद,श्री बी.व्ही.पिलाई यांनी श्री रामनवमी २०१० उत्सवात LED टिव्हीचे प्रात्याक्षीक दिले आहे. सदर टीव्हीवर दृष्य पहाताना प्रत्यक्ष मंदिरात श्रीच्या समोर उभे असल्यासारखे भासते.संस्थान परीसरात योग्य ठिकाणी LED टीव्ही असावे यासाठी MIC कंपनीकडून कोटेशन मागविले असता त्यांनी खालीलप्रमाणे कोटेशन दिले आहे.

१. स्टेडीयम हे समाधी मंदिराजवळ असल्याकारणाने तेथे नेहेमी श्रींचे दर्शन व आरतीकरीता भक्तांची सतत वर्दळ असते तेथे ६फुटX४.५फुट या साइजची इनडोअर स्क्रीन ०१ नग

२. गेट क्रमांक तीनमधून भक्त बाहेर पडून १६ गुंठे या परीसरातून द्वारकामाई व चावंडी मंदिराकडे जातात तसेच पिंपळवाडी रोडवरून मंदिर परीसरात ये-जा करणा-या भक्तांची गर्दी लक्षात घेता तेथे ९X१२ फुट या साइजची आउटडोअर स्क्रीन०१ नग बसवावी असे मत आहे.

MIC कंपनीतर्फे तयार करण्यात येणा-या इनडोअर व आउटडोअर स्क्रीनच्या किंमती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | टीव्हीची साइज व वर्णन | नग | प्रत्येकी किंमत |
|---|---|---|---|
| ०१ | एल.इ.डी. इनडोअर स्क्रीन टीव्ही ६X४.५ फुट | ०१ | २७,७५,०००/- |
| ०२ | वरील टीव्हीसाठी स्टील पत्र्याचे बॉक्स समोरून काच असलेला साइज ६.५X५ फुट स्टील पोल फिटींगसह | ०१ | ७५,०००/- |
| ०३ | एल.इ.डी.आउटडोअर स्क्रीन टीव्ही १२X९ फुट | ०१ | ६६,५०,०००/- |
| | | **एकुण** | **९५,००,०००/-** |

वरीलप्रमाणे ०२ नग टीव्ही व ०१ नग स्टील बॉक्स खरेदि करण्यासाठी सुमारे रू.९५,००,०००/- (अक्षरी रूपये- पंच्यान्नव लाख) खर्च अपेक्षीत आहे.तरी कृपया सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र. ५११ सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६ हेलिपॅडवर ॲम्ब्यूलन्स व फायर फायटर सुविधा देणे बाबत**

**प्रस्ताव -** मा.श्री.विजय चव्हाण, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर यांना पत्राव्दारे, "श्री क्षेत्र शिर्डी हे जागतिक किर्तीचे देवस्थान आहे. श्री साईबाबांचे दर्शनाकरीता असंख्य भाविक दररोज शिर्डी येथे येत असतात. तसेच महनिय व्यक्ती, सर्वोच्च न्यायालय, हायकोर्ट येथील न्यायाधीश, राजकीय नेते, मोठे व्यावसायीक, उद्योगपती, सिनेस्टार यांचे प्रमाण देखील वाढलेले आहे. त्यातच ब-याचशा व्यक्ती हया शिर्डी येथे हेलिकॉप्टरने येत असतात व श्री साईबाबा संस्थानचे निमगाव शिवारातील हेलिपॅडवर हेलिकॉप्टर लँडींग करतात. आपणाकडील कार्यालयाकडून इकडील कार्यालयास शिर्डी येथे हेलिकॉप्टर उतरविणेची परवानगीबाबत पत्र व्यवहार वेळोवेळी होत असतो व त्यावरुन इकडील कार्यालयाकडून परवानगी दिली जाते. परंतु आमचे असे निदर्शनास आले आहे की, हेलिकॉप्टर उतरविणेची परवानगी देताना हेलिपॅडवर ॲम्ब्युलन्स, फायर फायटर व सुरक्षा कर्मचारी असणे आवश्यक आहे. याबाबतचा उल्लेख इकडील कार्यालयाकडून दिलेल्या परवानगी पत्रामध्ये केलेला असतो. परंतु पत्रातील मसुदयानूसार गांभीर्य घेतले जात नाही. त्यानूसार संस्थानच्या हेलिपॅडवर

कोणतीही सुविधा उपलब्ध नसते व संस्थान परस्पर हेलिकॉप्टर हेलिपॅडवर उतरविणेचे भाडे आकारुन परस्परच त्यांचे जनसंपर्क अधिकारी यांचेकडून परवानगी घेतलेबाबत शिर्डी पो.स्टे.ला कळवितात. काही वेळेस एकाच हेलिपॅडवर दोन ते तीन हेलिकॉप्टर लँडींग होतात व इकडील कार्यालयाकडून दिलेल्या परवानगीच्या अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने भविष्यात मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरची बाब ही गंभीर असल्याने वरील त्रुटींबाबत शिर्डी संस्थानला आपले मार्फतीने योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, " असे कळविलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ नूसार मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २४.०५.२००८ रोजीच्या सभेतील विषय नं.१६, निर्णय क्र.४२९ (ब) अन्वये संस्थान मालकीच्या हेलिपॅडचा वापर खाजगी संस्था/ व्यक्ती/ सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनूसार सशुल्क करुन देण्यात यावा. एका दिवसातील एका उड्डाणासाठी/लॅंडींगसाठी रक्कम रुपये २,०००/- मात्र इतका दर आकारण्यात यावा. सरकारी/ निमसरकारी हेलिकॉप्टरच्या उड्डाणासाठी/लॅंडींगसाठी शुल्क आकारणेबाबत परिस्थितीनुरुप निर्णय मा.कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावा. तसेच यासाठीची नियमावली कार्यकारी अधिकारी यांनी तयार करावी. हेलिपॅड वापरु देणेबाबतचे कामकाज जनसंपर्क कार्यालय, प्रशासन शाखा यांचेमार्फत करण्यात यावे असे ठरलेले आहे. त्यानूसार विविध एव्हिशन कंपन्याकडून लँडींग परवानगीसाठी आलेल्या पत्रांना मान्यता देताना खालीलप्रमाणे शर्ती/अटीनूसार हेलिकॉप्टर लँडींगला मान्यता देणेत येते.

**१)** Necessary permission from the concerned Local/ Government authorities shall be obtained by you. Similarly necessary arrangements of security, fire fighting, ambulance shall be made by you.

**२) Rs.२,०००/-** towards the charges of one day helicopter landing/take-off use of helipad should be paid in Public Relation Office of the Sansthan.

तसेच हेलिपॅडवर सुरक्षा म्हणून संस्थानच्या संरक्षण विभागाव्दारे सुरक्षारक्षकही नेमला जातो.

श्री.विजय चव्हाण यांनी त्यांचे पत्रात हेलिकॉप्टर उतरविण्याची परवानगी देताना हेलिपॅडवर ॲम्ब्युलन्स, फायर फायटर व सुरक्षा कर्मचारी असणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी हेलीपॅडवरील सुरक्षा, ॲम्ब्युलन्स, फायर फायटर इ.व्यवस्थेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ५१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, हेलीपॅडवर संस्थानमार्फत सुरक्षा रक्षक, ॲम्ब्यूलन्स व शिर्डी नगरपालिकेकडून फायर फायटर घेऊन व्यवस्था करण्यात यावी. या सर्व व्यवस्थेसाठी योग्य तो आकार ठरवून घेऊन, संबधितांकडून वसूल करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७ सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास जिल्हा सैनिक कार्यालय,अहमदनगर यांना दिलेल्या आर्थिक मदतीबाबत**

**प्रस्ताव -** मा.डॉ.अन्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे दि.१३/०२/२००९ चे पत्रास अनुसरुन दि.०५/१२/२००९ रोजी मा.अध्यक्ष, श्री. ससाणे साहेब यांचेशी झालेल्या चर्चेत कर्मचाऱ्यांकडून अंदाजे रु.२,६१,०००/- रक्कम जमा होऊ शकेल, उर्वरित निधी रु.२,३९,०००/-संस्थानचा हिस्सा असे एकूण रुपये ५,००,०००/- (रु.पाच लाख) रक्कम सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी देण्यात यावे, असे ठरले आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस,वशी-३/१४९३६/२००९, दि. ०६/१२/२००९ अन्वये रु.५ लाख मात्रचा धनादेश जिल्हा सैनिक कार्यालय अहमदनगर यांना दिलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० चे सभेत निर्णय क्र.३१६ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र. १७ (६) च्या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीला सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास निधी देणेचा अधिकार आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नसल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० चे सभेतील निर्णय क्र.३१६ मध्ये दुरुस्ती होणेस विनंती.

**निर्णय क्र. ५१३ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १८ श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१० साजरा करणेस व त्यास येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव -** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव शनिवार दिनांक २४/०७/२०१० ते सोमवार दिनांक २६/०७/२०१० ( आषाढ शुध्द १४ शके १९३२ ते आषाढ शुध्द १५/कृ.१ शके १९३२) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस रविवार दिनांक २५/०७/२०१० आहे.

**<u>या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.</u>**

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | **उत्सव निमंत्रण पत्रिका** | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ६० हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज अॅटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ०२. | **उत्सव व्यवस्था-** | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | **शनिवार,<br>दिनांक-<br>२४/०७/२०१०<br>( प्रारंभ दिवस)** | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम<br>साईनगर मैदान स्टेजवर |
| | **रविवार<br>दिनांक<br>२५/०७/२०१०<br>( मुख्य दिवस)** | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (२६/०७/२०१०)कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | **सोमवार,<br>दिनांक २६/०७/२०१०<br>( सांगता दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत. इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल. |
| | **ब) कीर्तन कार्यक्रम** | श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. ह.भ.प. मंदार गंगाधरबुवा व्यास डोंबिवली यांचे पत्र आलले आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. किर्तनकार निश्चीती करावयाची आहे. |
| ०३. | **श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा** | उत्सवकाळात दि. २४/०७/२०१० ते दि. २६/०७/२०१० अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा चालू राहतील. |
| ०४. | **अखंड पारायण व्यवस्था** | उत्सव काळात दिनांक २४/०७/२०१० रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक २५/०७/२०१० रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक २३/०७/२०१० रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.विश्वस्तांची नांवे ठरविणे आहेत. सोबत कोरा तक्ता जोडलेला आहे. तसेच श्री रामनवमी उत्सव सन २०१० मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. विश्वस्तांचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. विश्वस्त सहभाग या सभेत निश्चित करणे आहे. |
| ०५) | **पालखी व रथ मिरवणूक** | उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार दिनांक २४/०७/२०१० रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, रविवार दिनांक २५/०७/२०१० रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ०६) | **विद्युत रोषणाई** | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात येणार आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. (विद्युत विभाग) |
| ०७) | **संरक्षण व्यवस्था** | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. (संरक्षण विभाग) |

| | | |
|---|---|---|
| ०८) | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे. (प्रसादालय व कॅंटीन विभाग)<br>श्री रामनवमी उत्सवात सन २०१० तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस - जिलेबी (०३) सांगता दिन - बुंदी<br>या उत्सवाचे तीन मिष्टांन्न पदार्थ ठरवावयाचे आहेत.<br>०१) प्रथम दिवस - (०२) मुख्य दिवस - (०३) सांगता दिन - |
| ०९) | लिलाव | श्रीना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. (लेखाशाखा) |
| १०) | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. (लेखाशाखा) |
| ११) | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील.(कामगार विभाग) |
| १२) | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, साईऊदयान , मंगलकार्यालय, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, साईप्रसाद निवासस्थान व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनंसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. (बांधकाम विभाग) |
| १३) | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. (दोन्ही रुग्णालय) |
| १४) | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे मोकळ्या जागेत मंडप/शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. यावर्षी कडक उन्हाळा असल्याने पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टॅंकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. त्या संबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करतील. तसेच दोन-तीन वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| १७) | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल.<br>नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८) | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १९) | खर्चाचे अंदाज पत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव - २००९ मध्ये अंदाजपत्रकीय रुपये ४२,७५,०००(अक्षरी रु. रू. बेचाळीस लाख पंच्याहत्तर मात्र) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये २५,१६,५९५/-(अक्षरी रु. पंचवीस लाख सोळा हजार पाचशे पंच्याण्णव मात्र) इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१० करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३९,३०,०००.०० (अक्षरी रु. एकोणचाळीस लाख तीस हजार मात्र) मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ३९,३०,०००.०० (अक्षरी रू. एकोणचाळीस लाख तीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ५१४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ३९,३०,०००/- (अक्षरी रू. एकोणचाळीस लाख तीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १९ शिर्डी येथील जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्याबदल्यात जलसंपदा विभागास मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील जागा आवश्यक त्या बांधकामासह देणेबाबत.**

**प्रस्ताव** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९१ नुसार, जलसंपदा विभागाची मौजे शिर्डी येथील ३२ आर जागा संस्थानला प्राप्त करुन घेऊन, त्याठिकाणी साईभक्तांसाठी मध्यवर्ती खोली वाटप व माहिती केंद्रासाठी इमारतीचे बांधकाम करावे व त्याबदल्यात जलसंपदा विभागास आहे त्या ठिकाणीच आवश्यक ते बांधकाम करुन देणेत यावे. याकामी वास्तुविशारदांकडून प्राथमिक स्वरुपाचे बांधकाम आराखडे व बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन घेऊन त्याबाबत उचित कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली होती.

तद्नंतर, सदरहू प्रस्तावाबाबत जलसंपदा विभागांशी वेळोवेळी चर्चा व पत्रव्यवहार होऊन, शिर्डी येथील जलसंपदा विभागाचे जागेच्या मोबदल्यात संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील जागा आवश्यक त्या बांधकामासह उपलब्ध करुन देणेबाबत चर्चा झाली. त्यानुसार मा.

व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ सप्टेंबर, २००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७७७ खालीलप्रमाणे घेणेत आला :

"... .. यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांना त्यांचे मौजे शिर्डी येथील ३२ आर जागेच्या मोबदल्यात संस्थानची मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर ८० पैकी / गट नंबर ८५ पैकी मधील ०० हे ६० आर पर्यन्त जमीन व त्यावर सिंचन विभागाचे कार्यालयाचे व निवासस्थानांचे आवश्यक बांधकाम करुन देणेत यावे. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. "

**(ब)** सदर निर्णयानुसार, जलसंपदा विभागाच्या व संस्थानच्या अधिका-यांनी संयुक्त मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर ८० व ८५ मधील जागेची पाहणी केली, तथापि सदर गट नंबर मध्ये संस्थानचे नवीन श्री साई प्रसादालय व त्या अनुषंगिक सुविधा उपलब्ध करुन देणेत येत असल्याने तसेच या सुविधांमध्ये भविष्यात वाढ होण्याची शक्यता असल्याने, या गट नंबरमधील जागा जलसंपदा विभागास उपलब्ध करुन दिल्यास जलसंपदा विभागाचे स्वतंत्र अस्तित्वात लक्षात येणार नाही तसेच संस्थानला ही भविष्यात प्रसादालय सुविधांमध्ये वाढ करावयाची झाल्यास अडचण येण्याची शक्यता असल्याने, गट नंबर ८० व ८५ मधील उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही.

त्यामुळे दिनांक १९ सप्टेंबर, २००९ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे गट नंबर ८७ पैकी व ८८ पैकी मधील उपलब्ध होणा-या जागेपैकी ३२ आर जागा जलसंपदा विभागास आवश्यक त्या बांधकामासह उपलब्ध करुन देणे योग्य राहील, असे अधिका-यांच्या संयुक्त पाहणीत ठरले व तसे मा.कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, नाशिक यांना इकडील दिनांक ०३ नोव्हेंबर, २००९ रोजीचे पत्राने कळविणेत आले व त्यानुसार इकडील दिनांक ०३ एप्रिल, २०१० रोजीचे पत्राने अंदाजित बांधकाम आराखडे तयार करुन जलसंपदा विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आले.

तरी जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील जागेच्या मोबदल्यात उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेनुसार, मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर ८७ पै व ८८ पै क्षेत्र ०० हे ३२ आर मात्र आवश्यक त्या बांधकामासह उपलब्ध करुन देणेस व वर नमुद केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला.

**निर्णय क्र.५१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील ३२ आर जागेच्या मोबदल्यात संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर ८७ पै व ८८ पै मधील ४० आर जागा कार्यालय, कर्मचारी निवासस्थाने आदि आवश्यक बांधकाम करुन देऊन हस्तांतरीत करण्यात यावी. याकामी करण्यात आलेल्या प्राथमिक कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच शासनाच्या मान्यतेसाठी जलसंपदा विभागाचे मान्यतेसह विहीत पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

## दिनांक २२.०५.२०१० रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-

**विषय नं.२०** **अहमदनगर जिल्हा पोलीस कल्याण निधीचे अखत्यारितील शिरडी येथील पेट्रोल पंप संस्थानने चालविणेस घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हा पोलीस कल्याण निधीचे अखत्यारीत नगर-मनमाड हायवेवर श्री साईंचे मंदिरापासून सुमारे एक कि.मी. अंतरावर शिरडी येथे मौजे निमगाव को-हाळे शिवारात पेट्रोलपंप सुरु करण्यात आलेला आहे. दि.२५.०४.२०१० रोजी मा.नामदार श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, परिवहन, बंदरे विकास, विधी व न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सदर पेट्रोलपंपास संस्थानचे मा.अध्यक्ष यांचे समवेत सदिच्छा भेट दिली. सदर भेटीप्रसंगी हा पेट्रोलपंप संस्थानला चालविण्यास घेणेबाबत चर्चा झालेली आहे.

सद्य परिस्थितीत संस्थानकडे विविध प्रकारची एकुण ५४ वाहने आहेत, ज्यामध्ये कार, जीप्स, रुग्णवाहीका, प्रवासी बसेस, स्कूल बसेस, मालवाहतुक वाहने, दुचाकी आदि वाहनांचा समावेश आहे. त्याबरोबर मंदीर परिसरासह संस्थान परिसरात विनाखंडीत वीजपुरवठा व्हावा म्हणून संस्थानमार्फत उच्च क्षमतेचे १० विद्युत जनित्रे ठिकठिकाणी बसविणेत आलेली आहेत. या वाहनांना व विद्युत जनित्रांना दरमहा सुमारे ६० हजार लिटर एवढया इंधनाची (बहुतांशी डिझेलची) आवश्यकता असते.

संस्थानकडे स्वतःची इंधन साठवणुकीची सोय उपलब्ध नसल्याने सदर इंधनाची उपलब्धता शिर्डी पासून सुमारे ०५ कि.मी. अंतरावर असलेल्या पेट्रोल पंपावरुन खरेदी करुन करावी लागते. हे विचारात घेता शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डीचे जागेत (मौजे निमगाव को-हाळे शिवारात) जिल्हा पोलीस कल्याण कार्यालय, अहमदनगर यांचे अखत्यारीत चालू झालेला ०१ कि.मी. अंतरावरील पेट्रोल पंप श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना चालविणेसाठी उपलब्ध करुन मिळाल्यास संस्थानला चांगल्या दर्जाचे (भेसळमुक्त) इंधन उपलब्ध होईल व इंधन आणणे करीता जा-ये करणेकामी लागणारा इंधन खर्चही वाचेल, तसेच इंधनाचा साठा करण्याचा प्रश्न आपोआप सुटेल. संस्थानकरीता आवश्यक तेवढे इंधन उपलब्ध झालेनंतर, उर्वरित इंधन केंद्र शासनाचे संबंधीत विभागाचे (पेट्रोलियम मंत्रालयाचे)

मान्यतेने सर्वसामान्य नागरीकांना वाजवी दरात/ ना नफा ना तोटा या तत्वावर उपलब्ध करुन देता येईल. असा प्रस्ताव प्रशासनाने मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला होता.

**निर्णय क्र.५१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा पेट्रोलपंप संस्थानने चालविण्यास घ्यावा व त्या बदल्यात जिल्हा पोलीस कल्याण निधी करीता संस्थानकडून दरमहा रु.एक लाख मात्र देण्यात यावे, अशी तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच, याप्रकरणी मान्यतेसाठी मा.नामदार श्री.आर.आर. पाटील, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे लेखी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २१ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. ५१७ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

०१) संरक्षण विभागात ठेकेदारामार्फत नेमणूक करण्यात आलेल्या स्त्री सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या प्रसादालयात बदल्या करण्यात येऊन त्यांचेऐवजी कायम स्त्रीयांच्या नेमणूका करण्यात याव्यात. (कार्यवाही-कामगार अधिकारी/ अधिक्षक, आस्थापना विभाग )

०२) प्रसादालयात अन्न शिजविणेकामी बसविण्यात आलेल्या सोलर एनर्जी सिस्टीमवर ए.सी.बसविण्यात येणार असलेबाबत वर्तमानपत्रात बातमी देण्यात आलेली आहे. सदरची बातमी कोणी व कोणाच्या अधिकारात दिली याबाबत चौकशी करुन संबधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. (कार्यवाही-कामगार अधिकारी )

०३). संस्थानने टाटा -४०७ वाहन खरेदी करुन त्यावर क्रेन बसविलेले आहे. सदरचे क्रेन पोलिस स्टेशनला त्यांचे वापरासाठी देण्यात यावे व भाडोत्री क्रेन बंद करण्यात यावे. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

०४) मंदिरातील आरत्या व इतर कार्यक्रम प्रसंगी व्यवस्थीत गाण्यासाठी गायकाची नेमणूक होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात यावेत. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०५) मा.व्यवस्थापन समितीने दि.०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ३०७ नुसार ५०% पेक्षा जास्त दिवस गैरहजेरीच्या कारणास्तव कामावरुन बंद केलेल्या कंत्राटी कामगारांना एक वेळ सुधारणेची संधी म्हणून त्यांचे रेकॉर्ड पाहून कामावर हजर करुन घेण्यात यावे. (कार्यवाही-कामगार अधिकारी )

०६) संस्थान मा.विश्वस्त, कार्यकारी अधिकारी अथवा उपकार्यकारी अधिकारी व बांधकाम अभियंता यांनी सिंगापूर येथील हायटेक गार्डन पहाण्याचा अभ्यासदौरा करावा. संस्थान अधिकाऱ्यांचा प्रवास व इतर खर्च संस्थानमार्फत करावा तसेच या अभ्यासदौऱ्यासाठी जे विश्वस्त स्वखर्चाने जाऊ इच्छित असतील त्यांना या अभ्यास दौऱ्यात सामिल करुन घेण्यात यावे. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र ४४६ ते ५१७ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर रा.मोरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) |